|| विद्या विनयेन शोभते ||
Mob.: 8669244522
JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA'S POI'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
(Affiliated to Mumbai University)
Mumbai University Affiliation No. Aff / Recog. /6403 of 2008 dt. 17th Oct. 2008
Govt. of Maharashatra Order No. NGC 2008 / (218 / 08) MS - 3, dt. 16/6/2008
At. Khardi (E), Tal. Shahapur, Dist. Thane Pin 421 601. ● Website : www.jsspcollegekhardi.in ● Email: jeevandeepkhardi@gmail.com

Ref. : JSSP/ACSCK /____/ Date : ____________

3.3.1 Number of research papers published per teacher in the Journals notified on UGC CARE list during the last five years

INDEX

| Title of paper | Name of the author | Department of the teacher | Name of journal | Calendar Year of publication | ISSN number |
|---|---|---|---|---|---|
| SEZ Ya kadambaritun badalatya paryavarnache jhalele chitran. | Asst. Prof. Harendra Soshte | Marathi | An international multilingual quartely peer review research journal | 2023 | 2320-4494 |
| Badalate Samajvastav aani kathalekhikanchya lekhnatil stripratima | Asst.Prof. Kailas Kalkate | Marathi | Vidyavarta | 2022 | 2349-638X |
| Bhane jilhyatil gramin loksankhech vitaran aani ghanta, ek gaugolik abhyas | Asst. Prof. Vishal Bhosale | Geography | Educreator research journal | 2022 | 2455-0515 |
| Samkalin katha lekhikanchya lekhanatil stri pratima | Asst.Prof. Kailas Kalkate | Marathi | An international multilingual E-research journal | 2020 | 2348-7143 |
| Rashtra sant tukdoji maharaj yanchya gramkavitetil paryavarniy janiv | Asst. Prof. Kailas kalkate | Marathi | Ajanta (Impact Factor) | 2020 | 2277-5730 |

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Sci. Khardi, Tal Shahapur, Dist. Thane.

|| विद्या विनयेन शोभते ||
Mob.: 8669244522
JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA'S POI'S
ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
(Affiliated to Mumbai University)
Mumbai University Affiliation No. Aff / Recog. /6403 of 2008 dt. 17th Oct. 2008
Govt. of Maharashatra Order No. NGC 2008 / (218 / 08) MS - 3, dt. 16/6/2008
At. Khardi (E), Tal. Shahapur, Dist. Thane Pin 421 601. ● Website : www.jsspcollegekhardi.in ● Email: jeevandeepkhardi@gmail.com

Ref. : JSSP/ACSCK /_____/ Date : ___________

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Mumbai Shaharatil mithi nadichya purachi karane , tyache parinam aani purvyavasthapan - Ek Bhaugolik abhays | Asst. Prof. Vishal Bhosale | Geography | Ajanta (Impact Factor) | 2020 | 2277-5730 |
| Gramin vikasat 'Nabard' chi bhumika ; ek aakalan | Asst. Prof. D.M Bhutale | Sociology | Peer Reviewed refereed and UGC listed journal no. 40776 | 2020 | 2277-5730 |
| G ovelithakur padhyatil aadivashi samudayachi shaishnik stiti- ek chikisak abhyas | Asst.prof. Bhagyashree pagar | Sociology | Vidyavarta | 2019 | 2319-9318 |
| Nakshalwad ek samajik samsya :Samajshastriya abhyas | Asst. Prof.D.M.Bhutale | Sociology | International multidisciplinary E- Research journal | 2019 | 2348-7143 |
| gtikikarnacha Bhartiya aadivasi samudayavar padlela prabhav | Asst.Prof.D.M.Bhutale | Sociology | Vidyavarta | 2019 | 2319-9319 |
| Shahapur talukyatil aadivasi jaminivar jagtikikarnacha jhalela parinam. | Asst. Prof. Vishal Bhosale | Geography | Peer Reviewed international publication | 2019 | 2319-9318 |
| Jagtikikaran aani aadivasi marathi kavita | Asst. Prof. Kailas kalkate | Marathi | Vidyavarta | 2019 | 2319-9318 |
| Sahityachi Samajikata | Asst.Prof. Kailas Kalkate | Marathi | International multidisciplinary E- Research journal | 2019 | 2348-7143 |

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Commerce & Science College. Khardi, Tal. Shahpur, Dist. Thane, 421601

JEEVANDEEP SHAIKSHANIK SANSTHA'S POI'S

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE

(Affiliated to Mumbai University)

Mumbai University Affiliation No. Aff / Recog. /6403 of 2008 dt. 17th Oct. 2008
Govt. of Maharashatra Order No. NGC 2008 / (218 / 08) MS - 3, dt. 16/6/2008

At. Khardi (E), Tal. Shahapur, Dist. Thane Pin 421 601. ● Website : www.jsspcollegekhardi.in ● Email: jeevandeepkhardi@gmail.com

Ref. : JSSP/ACSCK /_____/ Date : ____________

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Aadivasi jamatichya shashvat vikasat aadivasi loksanskrutichi bhumika | Asst. Prof. Kailas kalkate | Marathi | International multidisciplinary E- Research journal | 2019 | 2348-7143 |
| Samaj sanskrutitil [illegible]ana mandhnara ktha lekhak rangnath pathare | Asst. Prof. Kailas kalkate | Marathi | Saksham samiksha | 2019 | 2231-4377 |

Jeevandeep Shaikshanik Sanstha's Arts, Commerce & Science College, Khardi, Tal. Shahpur, Dist. Thane, 421601

Principal
Jeevandeep Shaikshanik Sanstha Poi's
Art's, Commerce & Science College Khardi
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane 421 601.

ISSN-2320-449
RNI No.MAHAUL03008/13/2012-T
Impact Factor : 3.728

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journa

## SPECIAL ISSUE MARCH 2023

### कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, गढी

राष्ट्रीय चर्चासत्र

### समकालीन मराठी साहित्यातील जाणिवा

दि.१६ मार्च २०२३

भाग दोन




ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com

Chief Editor
Principal Prof.Dr.Sadashiv H. Sarkate
Editor
Prof.Ramesh B. Ringne

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

# अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | गरुड' झेप एक ध्येयवेडा प्रवासया ' आत्मकथनातून यशाचे शिखर गाठण्यासाठी व्यक्त झालेल्या जाज्वल्य जाणिवा | प्रा. खैरनार सुनिल त्र्यंबक | ०१ |
| २. | आंबेडकरी ओवीगीते आकलन आणि आस्वाद | डॉ. दिलीप सावंत | ०५ |
| ३. | समकालीन साहित्य समीक्षा :-'पाय आणि वाटा' मधील सामाजिक जाणिवा | श्री.भारत चिंतामणी बंडगर | १० |
| ४. | स्त्रीवादी जाणीवांच्या कविता | प्रा. डॉ. मुंढे केशर जगन्नाथ | १५ |
| ५. | समकालीन मराठी साहित्य आणि स्त्रीवादी साहित्यातील जीवन जाणिवा | प्रा. डॉ. सदाशिव हरिभाऊ सरकटे<br>मिनाक्षी मोतीराम इंगळे | १९ |
| ६. | आदिवासी सामाजिक जीवन, जाणिवा | प्रा. संदीप भागु चपटे | २४ |
| ७. | 2001 ते 2005 या काळातील ग्रामीण कादंबरीतील स्त्री – चित्रण (विशेष संदर्भ : बारोमास 2002) सदानंद देशमुख | प्रा.डॉ. माधव बसवंते<br>फुले रागिणी बाबुराव | २८ |
| ८. | समकालीन मराठी बालसाहित्यातील मूल्यात्मक जाणिवा (विशेष संदर्भ: आबा महाजन यांचे बालसाहित्य) | श्री.सोमेश्वर बबन ढगे | ३० |
| ९. | "वसंत फेणे लिखित 'मावळतीचे मृद्‌गंध' या कथासंग्रहातील समकालीन जीवनजाणीवा" | डॉ. संजय मेस्त्री<br>कु. सीमा अशोक कदम | ३४ |
| १०. | शेतकऱ्यांचे बारामाही दुःख अभिव्यक्त करणारी कादंबरी 'बारोमास' | प्रा. डॉ. वैशाली धनविजय | ३८ |
| ११. | समकालीन मराठी साहित्यातील ग्रामीण जाणिवा | डॉ. वनिता बापू शिंदे | ४२ |
| १२. | २००० नंतरच्या ग्रामीण कथेतील परिवर्तने | प्रा.वडितके शंकर गोरक्ष | ४६ |
| १३. | ललितलेखिका मंगला गोडबोले यांच्या ललितलेखातील स्त्रीजीवनदर्शन- | वर्षाराणी प्रदीप ढोरे | ५० |
| १४. | समकालीन ग्रामीण कादंबरी वाड्मयातून अभिव्यक्त झालेल्या जाणिवा | अभिता बाजीराव निकम<br>डॉ.डोंगेपद्माकर तामगा . | ५५ |
| १५. | 'एसईझेड' या कादंबरीतून बदलत्या पर्यावरणाचे झालेले चित्रण | प्रा.हरेंद्र सोष्टे | ६० |
| १६. | समकालीन मराठी आदिवासी कवितेतील वेदना व विद्रोह | प्रा.डॉ.एकनाथ वैजनाथ भिंगोले | ६४ |
| १७. | वंग्रामगीता :राष्ट्रसंत तुकडोजी महाराज . | ज्ञानेश्वर बाबाराव बोहरूपी | ६९ |





[redacted]

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

# 'एसईझेड' या कादंबरीतून बदलत्या पर्यावरणाचे झालेले चित्रण

प्रा.हरेंद्र सोष्टे
मराठी विभाग प्रमुख,
कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, ता.कल्याण, जि.ठाणे

मराठीतील ग्रामीण साहित्यिक प्रा.शंकर सखाराम पाटील यांची सप्टेंबर २००७ मध्ये प्रकाशित झालेली 'एसईझेड' (सेझ) ही एक समकालिन वास्तवाचा वेध घेणारी महत्वाची कादंबरी आहे. साहित्यात नाविन्यपूर्ण विषयावर लिहिलेली ही कादंबरी विशेष चर्चेत राहिली तसेच वाचकप्रिय ठरलेली आहे. एसईझेड (विशेष आर्थिक क्षेत्र Special Economic Zone) ही विकास योजना भारतासारख्या विकसनशील देशात विकास व्हावा, म्हणून आणली परंतू भारतासारख्या कृषिप्रधान देशात येऊ घातलेल्या या सेझ मुळे इथली ग्रामसंस्कृती, कृषीसंस्कृती आणि पर्यायाने येथील सुजलाम, सुफलाम पर्यावरण उध्वस्त होत आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि आर्थिक उदारीकरणाच्या नावाखाली वर्षानुवर्ष उत्पादन देणाऱ्या सुपिक शेतजमिनी बळकावून, शेतकऱ्यांना देशोधडीला लावून ही भांडवलदारी आधुनिक संस्कृती येथील नैसर्गिक जीवन संपविण्याचा प्रयत्न करते आहे. सेझमुळे महाराष्ट्रातील कोकणसारख्या निसर्गाने सर्वसंपन्न असणाऱ्या भूप्रदेशात कोणकोणते प्रश्न निर्माण होवू शकतात याचे यथार्थ वास्तववादी दर्शन घडविणारी 'सेझ' ही एक महत्वाची कादंबरी आहे. या कादंबरीतील आशयसूत्रांचा बदलत्या पर्यावरणीय परिणामाचा आढावा घेण्यापूर्वी सेझ विषयक भूमिकेची पार्श्वभूमी पाहणे महत्वाचे ठरते.

साधारणतः १९९० नंतर भारताच्या अर्थकारणात राजकारणात आमूलाग्र बदल झाले. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यामुळे विविध क्षेत्रात लक्षणीय परिवर्तने झाली. देशाचे एकूणच राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने बहुराष्ट्रीय कंपन्या, मोठ मोठे उदयोगपती, परकिय व्यापारी यांना मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावावर सवलत देणे सुरु झाले हे होत असतांना मात्र पर्यावरणीय निर्बंधांना शिथील करण्यात आल्याचे दिसते. सेझच्या या रेट्यात येथील जंगले, समुद्र किनारपट्टी, नदया, तसेच अन्न धान्यात अधिक सुपिक असणारे भूप्रदेशही सुटले नाहीत.

विशेषतः ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या जगण्याचा आधार असलेल्या शेतजमिनी हया सेझमुळे धोक्यात आल्या. सन २००५ मध्ये हा कायदा अधिकृतरित्या संमत करण्यात आला. सन २००६ पासून या कायदयाची अंमलबजावणी सुरु झाली. जगात महासत्ता बनण्याच्या प्रयत्नात निसर्गाशी नाते सांगणाऱ्या मानवा भोवतीच्या पर्यावरणावर मोठे अरिष्ठ उभे राहीले. देशातील राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशातील हजारो एकर जमिनी हस्तांतरित करुन 'सेझ' आणण्याचे प्रयत्न होवू लागले. यामध्ये उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल तसेच महाराष्ट्रातील कोकण प्रांतातील मुंबई जवळ असणाऱ्या अनेक जमिनी हस्तांतरित करण्याचे सुरु झाले. यामुळे विस्थापितांचे अनेक प्रश्न निर्माणही झाले आहेत. छत्तीसगड भागात असंख्य आदिवासींना आपला देश सोडून विस्थापित व्हावे





लागले आहे. महाराष्ट्रात मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्याने रायगड जिल्हयातील नवी मुंबई, पेण, पनवेल, उरण या भागातील अनेक भूभाग सेझखाली संपादित करण्याचा प्रस्ताव मंजूर झाला आहे. याला विरोध म्हणून अनेक आंदोलने तीव्र विरोधात उभी आहेत. मात्र मुक्त बाजारपेठ आणि विकासाच्या नावाखाली सर्व सामान्य शेतकऱ्यांचं, सामाजिक कार्यकर्त्यांचं हे बंड थोपविण्याचे अनेक साम, दाम, दंड प्रयत्न व्यवस्थेकडून केले जात आहे.

यासर्व बदलांच्या पार्श्वभूमीवर शंकर सखाराम पाटील यांची एसईझेड ही कादंबरी वास्तववादी नोंदीची साक्ष देते. सेझच्या अनुषंगाने बदलत्या पर्यावरणाचा वेध घेते त्याबरोबरच जीवनाच्या सर्व क्षेत्रात त्याचे होणारे परिणामही अधोरेखित करते. मराठी साहित्यात विशेषतः ग्रामीण साहित्यात येथील कृषीसंस्कृती आणि पर्यावरण यांच्या होत जाणाऱ्या ऱ्हासाचे आणि तद्अनुषंगाने बदलांचे चित्रण अनेक कथा कादंबरी आदी कथात्म साहित्यातून झालेले पहावयास मिळते. विशेषतः मराठीतील प्रादेशिक वळणाच्या कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीऱ्यांतून पर्यावरण संस्कृती बदलांचा आढावा घेतलेला दिसतो. मराठीत ग्रामीण जीवन जाणीवा व्यक्त करणाऱ्या ज्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्यात पर्यावरण विषयक विचार प्रामुख्याने आढळून येतो. यामध्ये बा.सी.मर्ढेकर यांची 'तांबडी माती' (१९४३), पाणी (१९४८), व्यंकटेश माडगुळकर यांची 'बनगरवाडी'(१९५५) आदी कादंबऱ्यांमध्ये लोकजीवन, लोकसंस्कृती आणि निसर्गदत्त पर्यावरण याचे यथार्थ चित्रण येते.

१९६० नंतर मनोहर तल्हार, रणजित देसाई, शंकर पाटील, रा.रं.बोराडे, आनंद यादव, ना.धों.महानोर अशा सारख्या साहित्यिकांनी आपल्या कादंबऱ्यांतून सामाजिक वास्तव समर्थपणे चित्रित केले आहे. यंत्र संस्कृतीचा ग्रामीण जीवनावरील परिणाम (गोतावळा), औद्योगिकरणामुळे खेडी ओस पडणे, आधुनिकीकरणामुळे ढासळलेला पर्यावरणाचा समतोल यातुन शेतकऱ्यांच्या पदरी आलेले नैराश्य आदी रखरखीत वास्तव या काळातील कादंबऱ्यांतून येते.

२००६ पासुन विशेष चर्चेत असणारा कृषीसंस्कृतीच्या मुळावर उठलेला, शेतकऱ्यांना उध्वस्त करणारा, पर्यावरणाचा ऱ्हास करु बघणारा विशेष आर्थिक क्षेत्र मध्यप्रदेश, बंगाल आणि विशेषतः महामुंबई प्रकल्पाच्या माध्यमातून रायगड येथील उरण, पनवेल, अलिबाग या भागात आला. येथील भूमिपुत्र शेतकरी, पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते यांनी सेझ विरोधात लढा उभारला. प्रा.शंकर सखाराम हे स्वतः सेझग्रस्त असल्याने 'सेझ' मधुन आलेल्या विविध अनुभवांना सामोरे गेले आहेत. 'सेझ' मध्ये शेतकऱ्यांच्या सुपिक जमिनी जाणार आहेत, शेतकऱ्यांच्या जमिनी भांडवलदारांच्या हाती जातील, खारेपाटातील निसर्ग संपन्न गावे उध्वस्त होतील या अस्वस्थ जाणीवेने शंकर सखाराम पाटील यांनी 'एसईझेड' ही कादंबरी लिहिली आहे.

'चंद्रकांत थळे' हया कृषीसंस्कृतीत वाढलेल्या शेतकरी कुटूंबातून वर आलेल्या पदवीधर, शिक्षीत, बेरोजगार तरुणांच्या संघर्षाची ही कथा आणि या निमित्तमात्रे उध्वस्त



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane. 421 601

होत जाणारी कृषी संस्कृती अन् कोकणातील समृध्द पर्यावरणाच्या ऱ्हासाची ही कथा आहे. शेतकरी कुटूंबाच्या पार्श्वभूमिवर आर्थिक उत्कर्षाची स्वप्ने बघणारा हा धडपडया तरुण शेती आई वडीलांवर सोपवून नोकरी करु बघतो. पण भ्रष्टाचार, वशिलेबाजपणा पाहून तो नाऊमेद होतो. पुढे तो शेतीपूरक कुक्कुटपालन व्यवसाय करण्याचा निर्णय घेतो. पण 'बर्ड फ्ल्यु' या साथीच्या आजाराने हा व्यवसाय बंद होतो. पुढे 'सेझ' चे संकट उभे राहताच त्याचा संघर्ष परिसिमा गाठतो.

'सेझ' विरोधात प्रत्यक्ष लढा देत असतांना कादंबरीतून 'सेझ' हा विषय अत्यंत परिणाम कारकरित्या सविस्तरपणे मांडला आहे. या कादंबरीत आलेली एसईझेड ग्रस्त गावे, येथील प्रादेशिकता, निसर्ग, सण, उत्सव, ग्रामसंस्कृती ही वास्तवीकच आहेत. यातील कुटूंबाची गुजरान शेतीशी निगडीत आहे. शेळया, बकऱ्या पाळून उदरनिर्वाह करणारी कुटूंबे आहेत. सेझच्या भूसंपादनात शेतीच नष्ट होणार आहे असे जाणवल्यावर हे पशुधन नष्ट होणार आणि परिणामत: उदरहनिर्वाहाचे प्रश्न उभे राहणार याची जाणीव नायकाला प्रकर्षाने होते. कादंबरीच्या प्रारंभीच नायक चंदु याला स्वप्नावस्थेतून जागा होतांनाच्या प्रसंगातून उभे करतांना त्याची शेतजमीन, बकरी, कोंबडी यांचा संदर्भ आला आहे. आधुनिक काळात छोटया मोठया गोष्टींमुळे गरीब शेतकऱ्यांच्या पोटावर कसा पाय येतो हे लेखकाने काही प्रसंगात दाखवून दिले आहे. हल्ली दुधाच्या तर, अगदी दही, तुपाच्या पिशव्या विक्रीला आल्याने शेतकऱ्यांनी कष्टांनी पाळलेल्या गाईगुरांच्या दुधाला कुणी विचारत नाही.

कोकणातील पाणी समस्येवरही ही कादंबरी भाष्य करते ''कोकणात देशापेक्षाही जास्ती पाऊस पडतो, पण इथं ना पाणी अडवणं, ना पाणी जिरवणं, ना मोठी धरण, ना विहिरी, सगळी धरणे तिकडं देशावर, इथ कोकणात नुसत्या नदया'' चंदुच्या या बोलण्यावर कासार तात्या म्हणतात, ''कोन रं लक्ष देतंय कोकनाकडं. आपली खुर्ची सांभाळावी बस'' राजकिय स्वार्थापोटी खुर्ची सांभाळणाऱ्या पण विकासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या राजकिय स्थितीवर कादंबरीत भाष्य येते.

विविध घटनाप्रसंगातून वास्तवाच्या पातळीवर विविध स्तरांचा वेध ही कादंबरी घेत जाते. सेझच्या परीक्षेत्रात येणाऱ्या कंपन्याचे घातक परिणाम, वाढती महागाई, लोडशेडींगचा ज्वलंत प्रश्न, शहरी चंगळवादी, भोगवादी जीवनशैलीचे अनुकरण, कोयनाप्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन, वाढती मॉलसंस्कृती, गावगाडयात होत असलेले बदल, मच्छिमारांच्या उद्योगधंदयावर लादलेले निर्बंध अशा अनेक प्रश्नांवर या कादंबरीत परखडपणे भाष्य केले आहे. कारखानदारीने वाढत चाललेले प्रदुषण यामुळे शेतीवर होणारे परिणाम ''हल्ली या कारखान्यांचे धुरान सगळा भाजीपाल्याचा वाटोळा व्हईत चाललाय'' ही जाणीव कादंबरीतील पात्रांना होते. सदाफुली आणि तत्सम फुलझाडांवर सातत्याने येणाऱ्या किडी, दिवसें दिवस नविन येणारे रोग हे प्रदुषणाने आले आहेत थळच्या आर.सी.एफ, धरमतरची निप्पॉन कंपनी सकाळ संध्याकाळ काळडोम धुर ओकतात त्यामुळेच हिरवा पट्टा काळा पडत चालल्याचे नमूद केले आहे.





या भागात पारंपरिक चालत आलेली मिठागरे बंद पाडण्याचा कावा या लोकांच्या लक्षात येतो. ''एवढी वर्षे पिढयांनपिढया लोक आगारातील मिठागरात पिकवलेले मीठ खात, कुणी मिठाच्या विकाराने मेला नाही, मग आताच आयोडिन युक्त मीठ कशाला पाहिजे'' या संवादातून त्यांना झालेली जाणीव दिसून येते.

ग्रामीण जीवनातील सण, उत्सव, रुढी, परंपरा आणि त्यांचं निसर्गाशी असलेलं नातं याची अनेक वर्णने या कादंबरीत येतात. वैशाखी पौर्णिमेला भरणारी गावची जत्रा, पिठोरी अमावस्या, गटारी अमावस्या, गणेशोत्सव, दिवाळी आदी सण, शेत लावणीच्या वेळी म्हटली जाणारी गाणी, भारुडं, लग्नातील धवळे, शेतकऱ्याच्या आरोग्याची काळजी घेवून झाडपाल्याचे औषध देणारे वैदू, इर्जिकसारख्या सहकार्याच्या प्रथा, शेतकऱ्याच्या भोवतीचा गोतावळा(पशुधन) हे सर्व 'सेझ' आल्याने कसे नष्ट होत गेले याचे वास्तववादी चित्रण ही कादंबरी करते.

एकुणच या कादंबरीचा पर्यावरणीय बदलांच्या दृष्टीने अभ्यास करता पुढील निष्कर्ष हाती येतात :

शंकर सखाराम पाटील यांची 'सेझ' कादंबरी बदलत्या पर्यावरणाचा आणि जागतिकीकरणाच्या प्रभावातून निर्माण झाली आहे.

विशेष आर्थिक क्षेत्राच्या निमित्ताने ग्रामीण भागातील लोकांचे जनजीवन बदलते आणि त्यांच्या जगण्याचा धारणाही बदलल्या.

सेझ पुर्वीच्या कादंबऱ्यात निसर्गाची वर्णने येतात तर सेझ मधुन निसर्गाचे बदलते स्वरुप पहावयास मिळते.

सेझच्या माध्यमातून उध्वस्त होणारी ग्रामसंस्कृती आणि पर्यावरणाच्या होणाऱ्या ऱ्हासावर कादंबरी भाष्य करते.

SPECIAL ISSUE No. 105

ISSN 2349-638x
Impact Factor 7.149

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY
RESEARCH JOURNAL
PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

# गेल्या दोन दशकांतील मराठी कथालेखन

Chief Editor
Shri. Pramod Tandale

Executive Editor
Prof. Dr. Sunita Shinde

Co-Editor
Prof. Dr. Ramchandra Kalunkhe

Shaikshnik Sanstha's Arts, Commerce & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

| Sr. No. | Name of the Author | Title of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 17. | डॉ. ज्ञानेश्वर खिल्लारी<br>प्रा. बाळासाहेब गायके | समकालीन स्त्रीवादी कथालेखन | 72 |
| 18. | प्रा. सुनिल रामराव काकडे | जागतिकीकरण आणि स्त्रियांचे कथालेखन | 76 |
| 19. | स्वाती संतोषराव भोजने | नव्वदोत्तर स्त्रीलिखित कथालेखन : काही निरीक्षणे | 79 |
| 20. | दिपक रायभान कारके | समकालीन दलित कथेतील सामाजिक वास्तव | 83 |
| 21. | डॉ. गणेश मोहिते | मराठी ग्रामीण कथेतील स्थित्यंतरे | 88 |
| 22. | डॉ. सखाराम डाखोरे | समकालीन आदिवासी कथा | 98 |
| 23. | डॉ. सरला गोरे | भटक्या विमुक्तांचे कथात्मलेखन | 103 |
| 24. | विनोद पांडुरंग सिनकर | बबन शिंदे यांची बालकथा | 106 |
| 25. | स्वामी दत्तात्रय बोबडे | समकालीन काही ग्रामीण कथालेखक | 110 |
| 26. | डॉ. लिंगप्पा गुळाळे | गेल्या दोन दशकातील लक्ष्यणीय कथालेखक | 114 |
| 27. | प्रा. डॉ. जनार्दन काटकर | समकालीन कथाकार : सदानंद देशमुख | 12 |
| 28. | डॉ. प्रवीण घारपुरे | कथाकार सदानंद देशमुख | 12 |
| 29. | डॉ. बी. जी. श्रीरामे | आसाराम लोमटे : विलक्षण कथालेखक | 12 |
| 30. | डॉ. रामचंद्र झाडे | आसाराम लोमटे : समकालीन ग्रामवास्तव टिपणारा कथाकार | 1 |
| 31. | प्रा. डॉ. युवराज धबडगे | समकालीन मराठी दलित कथा | |
| 32. | प्रा. कैलास कळकटे | बदलते समाजवास्तव आणि कथालेखिकांच्या लेखनातील स्त्रीप्रतिमा | |
| 33. | डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर | 'भूप' : कथासंग्रहाचा वाङ्मयीन अभ्यास | |
| 34. | डॉ. समिता जाधव | समकालीन ... आणि पिवळा पिवळा पाचोळा | |


Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

# बदलते समाजवास्तव आणि कथालेखिकांच्या लेखनातील स्त्रीप्रतिमा

- प्रा. कैलास कळकटे
मराठी विभाग प्रमुख
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी
ता. शहापूर जि. ठाणे

मराठी कथा वाङ्मयाच्या वाटचालीत स्त्रीलेखिकांनी दिलेले योगदानाबद्दल महत्त्वपूर्ण आहे. शांताबाई या लेखिकेने लिहिलेली 'बिचारी आनंदीबाई ' ही पहिली उपलब्ध स्त्रीलेखिकेची कथा तर १९१५ साली लक्ष्मीबाई अभ्यंकर यांचा 'सद्य स्थिती' हा पहिला कथासंग्रह. ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर स्त्री कथालेखिकांच्या लेखनाने शतक पार केले आहे. या शतकभरातील तिच्या कथेने मराठी कथेला समृध्द केले. प्रारंभीच्या कालखंडात बाळबोध किंवा उपदेशपर असलेली कथा. आता मात्र तिचे खास अनुभव मांडताना दिसत आहे. कारण ही 'तिची' कथा आहे. ह्या 'ती' चं कोणतंही एक विशिष्ट नाव नाही. 'स्त्री' हीच तिची ओळख. आयुष्यभर तिला सोबत फक्त नानाविध दु:खांची ! धर्माच्या नावाखाली तिचा छळ मांडणाऱ्या जाचक परंपरा खंडित झाल्या खऱ्या, पण प्रश्न संपले नाहीत. जगण्याच्या नव्या पद्धतीतून तिच्यासाठी नवे प्रश्न निर्माण होतच राहिले. यातनांचे, पीडेचे प्रकार बदलले पण दु:खाची जात तीच - जीवघेणी ! तिचं शिक्षण, तिचं आर्थिक स्वावलंबन, तिचं कर्तृत्व - सगळं खोटं ! खरं फक्त तिचं 'स्त्री ' असणं. ती अडाणी कामकरी असो अथवा वकील, डॉक्टर, इंजीनियर असो, तिच्या तिच्या स्तरात तिला भेटणारा पुरुष आणि त्याचा समाज तिची छळणूक करीतच राहिला. स्त्रीच्या जगण्याचा गेल्या शंभर वर्षांचा हा साहित्यिक इतिहास म्हणजे खरं तर प्रत्येकीची कथा."१ कारण प्रत्येक लेखिकेने आपल्या अनुभव विश्वाच्या माध्यमातून मराठी कथेला समृध्द केले. कथालेखिकांच्या स्त्रीप्रतिमा अतिशय आशयगर्भ आहेत. त्यामुळेच समकालीन कथालेखिकांच्या लेखनातील स्त्री प्रतिमा व त्यातून व्यक्त झाले स्त्री जीवन यांचा शोध प्रस्तुत लेखातून घेतला जाणार आहे. हा शोध घेत असताना पुढीलप्रमाणे निवडक समकालीन कथालेखिकांच्या कथा अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत. कमल देसाई (रंग ),सानिया ( एक पाऊल पुढे !), गौरी देशपांडे (आता कुठं जाशील टोळंभट्टा ?), ऊर्मिला पवार( शल्य), प्रिया तेंडुलकर (नवा गडी), मेघना पेठे (कॉलनी).

कमल देसाई यांच्या रंग या कथात्रयी मधून भेटणारी सुमित्रा जोशी ही नोकरी करते. वडील वारल्याच्या नंतर संपुर्ण घरादाराची जबाबदारी तिने उचलेली आहे. ही प्रतिमा स्वत्व जपणारी आहे. "रंग या कथात्रयीत कमल देसाई यांनी एकाच व्यक्तीमत्त्वातील व्दिधाभावाचा ताण कथानिष्ठ केला आहे. या कथेतील सुमित्रा आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर घरातल्या कर्तेपणाची जबाबदारी स्वीकारणे. ही जबाबदारी तिच्या इतकी अंगवळणी पडते की चहू अंगांनी उसळून येणारे सारे रंग उडून जातात. आयुष्याशी तडजोड करून सुमित्रा एक वेगळाच मुखवटा धारण करते. नाकावर बोट ठेवून तिच्यात वावरणाऱ्या या वेगळ्या सुमित्रेने तिला खाऊन टाकले आहे.या वेगळ्या सुमित्रेचा खरी सुमित्रा चमत्कारिक तऱ्हेने द्वेष करते. सुमित्रेला आपल्यातल्या स्वच्छ नितळ अशा मुखवट्यापलीकडच्या ' ती ' ला शोधून काढायचे असते."२ केशव साठे, अण्णा मामा इ. व्यक्तिरेखांच्या माध्यमातून ती स्वत ला शोधत जाते. जगण्याविषयीच्या तिच्या काही धारणा आहेत. परिस्थितीने तिला खूप काही शिकवले आहे. माणसांच्या मुखवट्या मागे लपलेले खरे चेहरे तिला त्रासदायक वाटतात त्याबरोबरच लग्न व्यवस्थेविषयीची चीड आहे.

"तुझ्या बहिणीचं लग्न झालं आहे. निदान आता तरी तू विचार करावास."
"पुन्हा नव्यानं मला आता कशालाही सुरुवात करायची नाही.विश्रांती हवी आहे मला."
"तुला विश्रांती मिळावी म्हणूनच बोलतो आहे मी!"
" एखाद्या कादंबरीचा शेवट करायला हे वाक्य बरं आहे.प्र... विश्रांती नव्हे.फक्त दगदग आहे."३

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

सानिया यांच्या एक पाऊल पुढे! या कथेतील ऊर्मिला उच्च शिक्षित असून लग्न होण्याच्या अगोदर, ती एक स्त्री म्हणून तिला नोकरी नाकारली जाते त्यावेळी ती तिथे जाऊन भांडते आणि नोकरी मिळवते पण नंतर तिचा बॉस असलेल्या विश्वा मध्ये गुंतते आणि त्याच्याशी नंतर लग्नही करते. ती संसारात गुंतत जाते. कालांतराने मुलं, संसार घरदार यांत ती एवढी गुंतून की तिला स्वत:च्या करिअरचा तिला विसर पडतो. आयुष्यात घडणाऱ्या अनेक घटनातून तिला याची सतत जाणीव व्हायला की, ती घरीच असते त्यामुळे तिला दुय्यम स्थान दिल्या जाते किंवा तिच्या कडे दुर्लक्ष केल्या जाते. घरात प्राची (सून) आल्या नंतर तो तिला पुन्हा तिच्या गतकाळातील हुशारीची आठवण करून देते आणि ती उतारवयात निर्भय होते. "तुम्हाला मा आहे का ममी .... तुम्ही फार हुशार होतात म्हणून तुमचं असं झालं. मला बरोबर कल्पना आली आहे. बायकोनं गृहिणी व करिअर करून स्वतंत्र बनू नये असं वाटणारे नवरे असतातच. पण तुमचं तसं नाही झालं... तुम्ही हुशार होतात. त्या क्षेत्रात करीत राहिला असतात ना. तर त्यांच्याशीच कदाचित स्पर्धा केली असतील... म्हणून ... म्हणून तिला आठवलं. त्या काळी पंचवीस - सव्वीस वर्षांपूर्वी नव्हतो का आपण धीटपणे विश्वासच्या पुढ्यात कागद टाकून कि काय कमी आहे सांगा यात ? मग आताच काय फरक पडला आहे ? केवळ वर्ष, वय ...की नात्याचा ? स्वत: आता निर्भय बनली.४

गौरी देशपांडे यांच्या आता कुठं जाशील टोळंभट्टा ? या कथेतील निवेदनातील प्रथम पुरुषी नायिका मी ही व्यक्तिमत्त्वाचो आहे. आवडीने संपादकीय क्षेत्रात काम करते स्वत:च्या अस्तित्वाविषयीच्या तिच्या ठाम भूमिका आहेत या स्त्रीवादी वाचनातून तयार झालेल्या आहेत. " .... तर ' मॉडर्न' नवऱ्याला साजेशा औदार्यानं त्यानं मला "एकच खातं काढून दोघांचे पैसे ठेवू. असं सांगितलं. मग माझ्या मनात आलं की आपलचं वेगळं खातं काढावं. हे मात्र मी चटकन म्हटलं. पण नाही. जराशाच आश्चर्यानं बघून " जा बँकेत ,आणि माझा रेफरन्स दे " असं म्हटलं. मला खूप बरं वाटलं. स्वतंत्र, निर्भीड मिळवती झाल्यासारखं वाटलं."५ धनाबरोबर तिचे लग्न झालेले असून ही, त्याच्या बरोबरचा संसार व्यवस्थित असतानाही ती, ती एका कादंबरीकाराच्या प्रेमात पडते आणि त्याबरोबर तिला वेळ घालवावा असे वाटते त्यात तिला काही वाटत नाही, ही तिला मनाची अवस्था वाटते.

"आपण करतोय हे बरोबर आहे नाही, असं करायचं नसतं, वगैरे विचार माझ्या मनात आले की नाही असं कुणी वि तर मी ठाम सांगू शकेन की खरोखरच ते प्रश्न मी कधी स्वत: विचारले नाही. कारण....हे सर्व 'माझ्या मला'. होतंय. "६

अशाप्रकारे ती मनाला प्राधान्य देते.उर्मिला पवार यांच्या 'शल्य' या कथेत ज्योतीला पाचही मुली असतात. सहाव्या आपल्याला मुलगीच होणार याची तिला खात्री होते. कारण मगील वेळेस जो त्रास बाळंतपणात होतो तसाच यावेळी असतो. पाच मुली आहे म्हणून संसारी तिला त्रास देतात. नवरा देखील दुसरे लग्न करण्याची जाहीर भाषा करत असतो. त्रासा तून तिला बाहेर पडायचे असते. या दु :खा तून बाहेर पडण्यासाठीची धडपड सुरू असते त्यावेळी तिला तशी संधी येत. त्या संधीचा उपयोग ती माईला हाताशी धरून बाळ बदलून घेते. त्यानंतर तिच्या मनाची होणारी घालमेल व अपराध भावना या कथेतून व्यक्त झाली आहे.

प्रिया तेंडुलकर यांच्या 'नवा गडी' याकथेतील 'मी' ही घटस्फोटीत आहे. असिफ बरोबर तिचा प्रेमविवाह होतो. मुलगाही आहे. तिचा आयुष्यात पुन्हा सुरेश येतो दुसऱ्या लग्नासाठी तिच्या मनाची तयारी झालेली नसताना देखील ती करण्यासाठी तयार करतो. आणि तिने त्याच्या अमेरिकेहून आलेल्या बहीणाला भेटण्याचा आग्रह करतो ती ही द्विधा मनस्थि त्याच्या घरी जाते. तिला घेऊन जाण्यासाठी सुरेश आल्यापासून व त्याच्या घरी जे प्रसंग घडतात त्यावरून तिला या गोष्टीची व्हायला लागते की, आपण हा नवा मांडूच नये कारण तिला कुणाच्याही उपकारा खाली जगायचे नाही तसेच आपल्या व्यक्तिमत्वाला तडाही जाऊ द्याचा नाही"... उद्या सुरेशने माझा धंदा बंद करायचा, हट्टच धरला तर माझी आणि दिपूची जबाबदारीही त्याच्यावरच. हट्टाला पेटून पोटगी आणि दिपूचा खर्च नाकारला मी कारण माझी आर्थिक बाजू बरी होती उपकारावर मला जगायचं नव्हतं. सुरेशशी लग्न झाल्यावर धंदा बंद करून जगायचं ते त्याच्या उपकारावरच ना ?"७

मेघना पेठे यांच्या 'कॉलनी' या कथेतील 'मी' एकटीच राहाते. ती दिसायला सुंदर नाही. नि:संकोचपणे ती शरीराच्या गरजा मान्य करते. "... इतक्या [illegible] ओळखीच्या आणि अनोळखी लोकांविषयी पासून ते कादंबरीतल्या पात्रांपर्यंत [illegible] आणि वेगवेगळ्या कालमर्यादे [illegible]



Shaikshanik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

अपरिहार्य नैसर्गिकतेनं. मनाचं कौमार्य वगैरे काही पाहण्यात नसतं. शरीराचं होतं, नाही नाइलाज म्हणून त्यांना ही पुरुषाप्रमाणे शरीराची गरज आहे. तिला ही कोणत्याही पाशात न अडकता ही गरज पूर्ण करावी वाटते. ती ही गरज नवऱ्याविषयीच्या आकर्षणातून व्यक्त केली आहे. या बरोबरच एकटेपणाचे दु:खही व्यक्त केले आहे.

**कथालेखिकांच्या स्त्रीप्रतिमा ठळक वैशिष्ट्ये :**

१) उच्च शिक्षीत स्त्रीप्रतिमा, २) द्विधा मनस्थिती दिसून येते. ३) स्वावलंबी तरीच , निर्णय,
४) लग्न व्यवस्था, वैधव्य, घटस्फोट याकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन, ५) लग्नसंस्थसंबंधीची बंडखोरी भूमिका,
६) सांसारिकेतपलिकडचे संबंध. ७) शारिरिक संबंधाकडे गरज म्हणून बघण्याची भूमिका.
८) दडपलेल्या भावजीवनाचे ठळक प्रतिबिंब. ९) जगण्याविषयीचा ठामपणा.

या सारखी अनेक वैशिष्ट्ये नोंदविता येतील.

**संदर्भ:**


१) आठवलेकर मंगला, प्रस्तावना, तिची कथा ,आवृत्ती तिसरी ऑगस्ट २००९ पृ.१ ,राजहंस प्रकाशन,पुणे
२) वरखेडे मंगला,स्त्रीयांचे कथालेखन ,दु .आवृत्ती २००५,पृ१८३., साकेत प्रकाशन ,औरंगाबाद
३) आठवलेकर मंगला, संपादन तिची कथा ,आवृत्ती तिसरी ऑगस्ट २००९ पृ.३ ,राजहंस प्रकाशन,पुणे
४) उनि पृ १३८
५) उनि पृ १४१
६) उनि पृ १४३
७) उनि पृ १६३


Shaikshnik Sanstha's Arts,Com.& Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601 ★ Jeevandeep

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

OPEN ACCESS

# EDUCREATOR RESEARCH JOURNAL

A PEER REVIEWED REFERRED JOURNAL

# "Population, Society, Development and Environmental Sustainability"

VOLUME-IX, SPECIAL ISSUES-I
MARCH- APRIL 2022
SJIF IMPACT FACTOR: 7.717

CHIEF EDITORS
DR. DEEPAK S. NARKHEDE
DR. RAJENDRA D. PARMAR

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com & Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

OPEN ACCESS

# EDUCREATOR RESEARCH JOURNAL

A PEER REVIEWED REFERRED JOURNAL

# "Population, Society, Development and Environmental Sustainability"

VOLUME–IX, SPECIAL ISSUES–I
MARCH– APRIL 2022
SJIF IMPACT FACTOR: 7.717

CHIEF EDITORS
DR. DEEPAK S. NARKHEDE
DR. RAJENDRA G. PARMAR

Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

| | | |
|---|---|---|
| 35 | *Preparation of Mixed Ligand Complexes of Lanthanide Metal, their Characterization and Antibacterial Study*<br>***Digambar K. Patil & Jitendra M. Pawara*** | 183 |
| 36 | *Extrapolating Data By Using Polynomials: A Case Study on Panvel Tahsil Population*<br>***Sagar Lahanu Khairnar*** | 188 |
| 37 | *Role of Vloggers in Enhancing Environmental Awareness and Sustainability – A Case Study of Sindhudurg District of Maharashtra*<br>***Mr. Shivaji Vishnu Naik*** | 194 |
| 38 | *Analysis of Local Perceptions about Tourism Activity: A Case of Kangra District in Himachal Pradesh*<br>***Ms. Neetu Sharma & Dr. Savitsmita Vilasrao Chawan*** | 199 |
| 39 | *Surface Runoff Estimation of Amravati River Basin Using Integrated SCS-CN, RS And GIS Techniques*<br>***Dr. Satish P. Patil*** | 207 |
| 40 | *Rivers - Lifelines For Economic Growth*<br>***Mr. Haribhau Sama Kharat*** | 216 |
| 41 | *A Study of Saltpans in Mira-Bhayandar City*<br>***Lekha Thakar & Dr. Moushumi Datta*** | 220 |
| 42 | *Physico-Chemical Investigation of Drinking Water Samples of Adjacent Villages of Panvel*<br>***V.S. Kamble, B.D. Aghav, J.M.Pawara & S.T. Salunkhe*** | 230 |
| 43 | *Awareness about Aquaponics and its Social, Economic and Environmental Benefits and Demand in Coming Times*<br>***Mrs. Sneha, T. Bandal, & Mrs. Michel Jancy Arul Kumar*** | 235 |
| 44 | *A Study the Impact of Effective Customer Relationship Management Adopted by Banking Industry*<br>***Dr. Vinod Chandwani*** | 241 |
| 45 | *Assessment of Maps as a Means of Educational Tool for Environmental Awareness*<br>***Mr. D. D. Bombe*** | 246 |
| 46 | *Opportunities and Status of Tourism Activity in Junnar Tehsil for Rural Upliftment*<br>***Mr. D. D. Bombe & Dr. Prakash Dongre*** | 251 |
| 47 | *Urabanisation and Micro Climate-Case Study of Pune*<br>***Dr. Prakash Dongre & Miss. Mewada Yamini B.*** | 259 |
| 48 | *Synthesis and Characterization of Some Ternary cerium (III) Complexes with 1, 5-dimethyl-2-phenyl-4 [(2-thienylmethylene) amino]-1, 2-dihydro-3H-pyrazol-3-one Schiff Base and Heterocyclic Ligands*<br>***B.D. Aghav*** | 267 |
| 49 | ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण आणि घनता: एक भौगोलीक अभ्यास<br>**प्रा. विशाल संपत भोसले & डॉ. राजेंद्र ओंकार परमार** | 273 |
| 50 | आधुनिक काळातील सेंद्रिय आणि रासायनिक शेतीचा अभ्यास<br>**डॉ. अनिल निवृत्ती शिंदे** | 278 |


Sanstha's Arts, Com. & S... Khardi, ... 421 601 ... College

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

A Peer Reviewed Referred Journal

OPEN ACCESS

Volume–IX, Special Issues–I
March – April 2022

Original Research Article

# ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण आणि घनता: एक भौगोलीक अभ्यास

***प्रा. विशाल संपत भोसले & ** डॉ. राजेंद्र ओंकार परमार**

* जीवनदीप महाविद्यालय, खर्डी, ता. शहापूर, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र.

** भूगोल विभाग, चांगु काना ठाकूर आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज ,न्यू पनवेल, रायगड, महाराष्ट्र.

**सारांश :**

*ग्रामीण लोकसंख्या हा नागरीकरण प्रक्रयेतील अविभाज्य भाग आहे. ग्रामीण प्रदेशाचे अनुकूल घटकांच्या उपलब्धतेमुळे विकसित नगरात, नगराचे शहरात व शहराचे महानगरात रूपांतर होते. नागरीकरणाची प्रक्रिया हि खेड्यापासूनच सुरु होते. त्यामुळे ग्रामीण प्रदेशाच्या विकास प्रक्रियेत ग्रामीण भागातील लोकसंख्या, लोकसंख्येचे वितरण व घणता यांना फार महत्व आहे. परंतु सर्वच ग्रामीण प्रदेशाचे शहरात रूपांतरण होतेच असे नाही. प्रदेशातील भौगोलीक, आर्थिक, सामाजिक व राजकीय घटकांचा नागरीकरण प्रक्रियेवर मोठा प्रभाव पडतो. यातही भौगिलीक घटक हे तुलनेने जास्त प्रभावी ठरतात. देशातील अशी अनेक उदाहरणे देता येतील कि ज्या प्रदेशात भौगोलीक घटकाच्या परिणाम स्वरूपी आजही ते प्रदेश ग्रामीण प्रदेश म्हणून ओळखले जातात. ठाणे जिल्हा हे त्याचे उत्तम उदाहरण होय. फार मोठा प्राचीन इतिहास, अमूल्य सांस्कृतिक वारसा, मुंबई उपनगरीय विभाग, आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्टया देशपातळीवर महत्व अशा अनेक अनुकूल बाजू असूनही आजही हा जिल्हा ग्रामीण आदिवासी विभाग म्हणूनच ओळखला जातो. जिल्ह्यातील सात तालुक्यांपैकी ठाणे व उल्हास नगर पूर्णतः शहरी, कल्याण, भिवंडी, अंबरनाथ हे तुलनेने कमी ग्रामीण लोकवस्ती असलेले विकसित प्रदेश तर शहापूर, मुरबाड हे जवळपास पूर्णतः ग्रामीण लोकवस्ती असलेले प्रदेश आहेत.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

*मुंबई, पुणे व नाशिक या सारख्या विकसित प्रदेशांपासून अगदी काही तासांच्या अंतरावर असलेल्या ठाणे जिल्ह्यात आढळणारी हि विषमता विचार करण्यास भाग पाडणारी आहे. या विषमतेची कारणे अभ्यासली असता प्रदेशाचे भौगोलीक स्थान, सह्याद्री पर्वत श्रेणींचा उतार, उंच-सखल पठारी प्रदेश, अरबी समुद्र किनारा, खाडी प्रदेश अशा वैविध्यपूर्ण प्राकृतिक रचनेमुळे प्रदेशात ग्रामीण वसाहतींच्या विकासावर अर्थात नागरीकरण प्रक्रियेवर मोठा परिणाम झालेला आढळतो. ठाणे जिल्ह्यातील सण 1991 ते 2011 या दोन दशकातील लोकसंख्या विषयक आकडेवारीच्या अध्ययनावरून हि बाब विशेषतः ग्रामीण लोकसंख्येच्या संदर्भात मुख्यत्वेकरून स्पष्ट होते. असे असले तरी 2011 नंतरच्या दशकात या स्थतीत बदल होत असल्याचे दिसून येते. उपनगरीय प्रदेशांचे वाढते महत्व, नवनवीन विकास प्रकल्प, राजकीय इच्छाशक्ती अशा अनेक अनुकूल बाबींमुळे वर्तमान काळात प्रदेशातील नागरीकरणाचा वेग वाढलेला आढळतो.*

**प्रस्तावना :**

ठाणे महाराष्ट्र राज्यातील एक महत्वपूर्ण जिल्हा. फार मोठा ऐतिहासीक वारसा ठाणे जिल्ह्यास लाभला आहे. इटालियन प्रवासी मार्को पोलोने 1290 मध्ये ठाण्याला भेट दिली होती. पोर्तुगीज ठाण्यात 1530 मध्ये आले आणि त्यांनी शहरावर 1739 पर्यंत सुमारे 200 वर्षे राज्य केले. मराठ्यांनी शहरावर 1739 ते 1784 राज्य केले. 1784 पासून स्वातंत्र्यापर्यंत शहर इंग्रजांच्या ताब्यात होते. ब्रिटिश काळात एक व्यापारी बंदर, मिठागर व प्रशासकीय प्रदेश म्हणून जिल्ह्यास महत्व होते. देशातील पहिली रेल्वे 1853 मध्ये मुंबई ( बोरीबंदर ) ते ठाणे या दोन स्थानकादर्म्यान सुरु झाली होती. त्यामुळे प्राचीन काळापासूनच ठाणे जिल्ह्यास आर्थिक दृष्ट्या फार महत्व आहे. मुंबई, नाशिक व पुणे या सारख्या विकसित प्रदेशांच्या

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Commerce & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

सानिध्यामुळे जिल्ह्याचे महत्व आणखीनच वाढते. सामाजिक -सांस्कृतिक दृष्टया ठाणे जिल्ह्यात मोठी कमालीची विविधता आढळते. वारली, कातकरी, आग्री, भिल्ल, पारधी, महादेव कोळी अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक सांस्कृतिक वारसा असलेल्या आदिम जमाती या जिल्यात मोठ्या संख्येने आढळतात. भादसा, तानसा, वैतरणा या सारखी मोठी धरणे, पवई, तुळशी व विहार यासारखे महत्वपूर्ण तलाव, तानसा, वैतरणा अभयारण्य, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यामुळे जिल्यास विशेष आकर्षण आहे. या खैरीज माहुली गड, दुर्गाडी किल्ला, हाजी मलंग गड, टिटवाळा मंदिर, शिव शंकर मंदिर, माणस मंदिर, वज्रेश्वरी व माळशेज घाट या सारख्या प्रेक्षणीय स्थळांमुळे पर्यटक या ठिकाणी मोठ्यासंख्येने आकर्षित होतात. मुंबई उपनगरीय विभाग म्हणून वर्तमान काळात ठाणे जिल्ह्यास ओळखले जाते. आज आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व प्रशकीय अशा सर्वच बाबतीत जिल्ह्यास विशेष दर्जा प्राप्त झाला आहे. परंतु असे असले तरी आजही या जिल्यातील ग्रामीण भागाचा हवा तसा विकास झालेला आढळत नाही. आजही हा जिल्हा ग्रामीण आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. अशातच ग्रामीण लोकसंख्येचे वितरण असमान पद्धतीने झालेले आढळते. जिल्यातील काही प्रदेश पूर्ण अथवा अंशतः शहरी व काही प्रदेश हे पूर्णतः ग्रामीण असलेले आढळतात. या असमान नागरीकरणाचा, प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येच्या असमान घनतेचा, त्यामागील कारणे शोधण्याचा प्रयत्न सदर प्रबंधात केला आहे. जो भविष्यकालीन नियोजन, संतुलित प्रादेशिक विकास या दृष्टीने उपयुक्त ठरू शकतो.

**अध्ययन क्षेत्र :**

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम भागात उत्तर कोकण किनारपट्टीजवळ ठाणे जिल्ह्याचे स्थान आहे. जिल्ह्याचा विस्तार 72°45' आणि 73°48' पूर्व रेखावृत्त व 18°42' आणि 20°20' उत्तर अक्षवृत्त या दर्म्यान आहे. जिल्ह्याच्या पूर्वेस सहयाद्रीच्या पर्वत रांगा व पश्चिमेस अरबी समुद्राचा किनारी प्रदेश आहे. ठाणे जिल्ह्यास सुमारे 113 किमी चा समुद्र किनारा लाभला आहे. जिल्ह्याचा पूर्व-पश्चिम विस्तार 100 किमी व उत्तर-दक्षिण विस्तार 140 किमी आहे. ठाणे जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे 4214 चौ. कि.मी. असून हे क्षेत्रफळ राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या 1.37 टक्के आहे. क्षेत्रफळाच्या बाबतीत जिल्ह्याचा राज्यात 33 वा क्रमांक लागतो.

सन 2014 मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा स्वतंत्र जिल्हा अस्तित्वात आला. या विभाजनानूसार ठाणे जिल्ह्यात एकूण 07 तालुक्यांचा समावेष होतो. ज्यात ठाणे शहर, कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, शहापूर, मुरबाड, अंबरनाथ यांचा समावेश होतो. जिल्हयातील ठाणे व उल्हासनगर हे दोन तालुके पूर्णपणे शहरी आहेत तर कल्याण, भिवंडी व अंबरनाथ हे तालुके तुलनात्मकदृष्टया विकसित आहेत. ठाणे जिल्ह्याच्या वायव्य व उत्तर भागात पालघर, ईशान्येस नाशिक, पूर्वेस अहमदनगर, आग्नेयेस पुणे, दक्षिणेस रायगड, नैऋत्य व पश्चिमेस मुंबई तसेच अरबी समुद्र किनारा व खाडी प्रदेशाचा समावेश होतो. ठाणे जिल्ह्यातील वैतरणा आणि उल्हास या दोन महत्वाच्या नद्या असून तानसा, भातसा, पिंजाळ, दहेरजा, सूर्या, बारवी व काळू या प्रदेशातील इतर महत्वाच्या नद्या व उपनद्या आहेत.

जिल्हयाचे हवामान सर्वसाधारणपणे सम असून सागर किनारी व किनारपट्टीच्या नजीक उष्ण व दमट आहे. किनारपट्टीतील ठाणे शहरात हवामान उष्ण आहे. याउलट पूर्वेकडील सहयाद्री पर्वत रांगांच्या उतारावर पायथ्याच्या सपाटीला प्रदेशातील हवामान तुलनेने कमी उष्ण आहे. पर्जन्यमानाचा विचार केला असता कोकणपट्टीतील अतिपर्जन्य प्रदेशामध्ये ठाणे जिल्हयाचा समावेश होतो. अधिक पर्जन्यमानामुळे जिल्यात भाताचे पीक सर्वाधिक घेतले जाते. या शिवाय मका, नाचणी, वरी, भेंडी, मिरची इत्यादी पिके देखील मोठ्याप्रमाणावर घेतली जातात.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

1. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण व घनता यात झालेले बदल अभ्यासणे.

**माहिती संकलन आणि संशोधन पद्धती :**

"ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण व घणता: एक भौगोलीक अभ्यास" या संशोधन विषयाचे अध्ययन करण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय माहिती स्रोतांचा वापर केला आहे. भारतीय जनगणना, ठाणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, शासकीय आकडेवारी व विविध शासकीय संकेत स्थळांचा उपयोग केला आहे. विस्तृत विश्लेषणा करीता नकाशास्त्रीय तंत्रांचा देखील अवलंब केला आहे.

*प्रा. विशाल संपत भोसले & ** डॉ. राजेंद्र ओंकार परमार, *(2022)*. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण आणि घनता: एक भौगोलीक अभ्यास, ***ERJ-Vol IX, Special Issue- I, March - April - 2022, 273-277.***

**विषय विवेचन :**

ठाणे जिल्ह्यातील सन 1991 ते 2011 या दोन दशकातील ग्रामीण लोकसंख्येचा विचार केला असता अनेक वैशिष्ट्यपूर्ण तथ्य समोर येतात. सन 19991 ते 2011 या दोन दशकात जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येत 429728 ने वाढ झालेली आढळते. 1991 मध्ये जिल्ह्यातील ठाणे तालुक्यात ग्रामीण लोकसंख्या 0.8% होती. सन 2001 मध्ये तालुक्यत ग्रामीण लोकसंख्येत 0.0% वाढ तर 2011 मध्ये पुन्हा 0.4% ने वाढ झालेली आढळते. 2011 च्या जनगणनेनुसार ठाण्यात सुमारे 14 गावांचा समावेश आहे. मुंबई शहरापासून समीपकता, सपाट-समतल भूप्रदेश, वाहतूक व दळण वळणाचे जाळे, औद्योगिकीकरण आशा अनेक कारणांमुळे प्रदेशात नागरीकरण जलद झाल्याचे आढळते. उल्हासनगर तालुक्यत 1991 पासून 2011 पर्यंत ग्रामीण लोकसंख्येच्या टक्केवारीत 0.0% वाढ झालेली आढळते. अनुकूल भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीमुळे हा प्रदेश पूर्णतः नागरी राहिलेले आहे.

जिल्ह्यातील कल्याण, भिवंडी, अंबरनाथ या प्रदेशांमध्ये ठाणे व उल्हास नगरच्या तुलनेत ग्रामीण लोकसंख्येत मोठी तफावत आढळते. उपलब्ध आकडेवारीनुसार कल्याण तालुक्यत सन 1991 मध्ये ग्रामीण लोकसंख्या 4.3% होती. सन 2001 मध्ये 6.5% व 2011 मध्ये 18.1% ने वाढ पहावयास मिळते. 2011 च्या जनगणनेनुसार कल्याण मध्ये सुमारे 85 गावांचा समावेश असून सुमारे 18.1% ने ग्रामीण लोकसंख्येत वाढ झालेली आढळते. भिवंडीमध्ये 210 गावे व 24.3% ने ग्रामीण लोकसंख्येत वाढ झालेली आढळते. तर अंबरनाथमध्ये 71 गावांचा समावेश असून सुमारे 22.1% ने ग्रामीण लोकसंख्येत वाढ झालेली आढळते. ठाणे शहर समीपकता व उपनगरीय विभाग यामुळे य तिन्ही तालुक्यात काही प्राकृतिक अडथळे वगळता नागरीकरनाची प्रक्रिया गतीने सुरू असल्याचे आढळते.

ठाणे जिल्ह्यातील शहापूर व मुरबाड हे तालुके प्रामुख्याने ग्रामीण प्रदेश म्हणून ओळखले जातात. सन 2011 च्या जनगणनेनुसार शहापूर मध्ये सुमारे 221 गावांचा तर मुरबाड मध्ये 206 गावांचा समावेश आहे. 1991 मध्ये शहापूर तालुक्यातील ग्रामीण लोकसंख्या 95.8% होती. सन 2001 मध्ये 84.8% व 2011 मध्ये 77.5% पहावयास मिळते. मुरबाड तालुक्यत सन 1991 मध्ये 91.8%, सन 2001 मध्ये 90.7% व 2011 मध्ये 90.2% पहावयास मिळते. या आकडेवारी वरून असे लक्षात येते की, गेल्या काही दशकांपासून या दोन प्रदेशातील ग्रामीण लोकसंख्येत घट होत असून नागरीकरणात वाढ होत आहे. परंतु ही वाढ हव्या तेवढ्या वेगाने होताना दिसत नाही. उंच सखल भूप्रदेश, नदी खोऱ्याचे विस्तृत जाळे, घनदाट अरण्ये, मुख्य शहरी प्रदेशांपासून अलिप्तता अशा अनेक कारणांमुळे हे दोन्ही प्रदेश ग्रामीण राहिलेले आहेत.

तक्ता -01 : दोन दशकातील ग्रामीण लोकसंख्येतील तफावत : 1991 - 2011

| अ. क्र. | तालुका | लोकसंख्या | | | | | | | | | दोन दशकातील ग्रामीण लोकसंख्येतील तफावत टक्केवारी 1991 - 2011 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1991 | | | 2001 | | | 2011 | | | 1991 | 2001 | 2011 |
| | | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | एकूण | ग्रामीण | शहरी | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | ठाणे | 12,97,441 | 10723 | 1286718 | 2486941 | 0 | 2486941 | 3787036 | 15623 | 3771413 | 0.8 | 0.0 | 0.4 |
| 2 | भिवंडी | 626056 | 224645 | 401411 | 945582 | 269153 | 676429 | 1141386 | 277646 | 863740 | 35.9 | 28.5 | 24.3 |
| 3 | शहापूर | 219227 | 210020 | 9207 | 273304 | 231741 | 41563 | 314103 | 243393 | 70710 | 95.8 | 84.8 | 77.5 |
| 4 | कल्याण | 1060368 | 45811 | 1014557 | 1276614 | 83102 | 1193512 | 1565417 | 283192 | 1282225 | 4.3 | 6.5 | 18.1 |
| 5 | उल्हासनगर | 369077 | 0 | 369077 | 473731 | 0 | 473731 | 506098 | 0 | 506098 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| 6 | अंबरनाथ | 62282 | 62282 | 0 | 366501 | 64749 | 301752 | 565340 | 125011 | 440329 | 100.0 | 17.7 | 22.1 |
| 7 | मुरबाड | 145533 | 133583 | 11950 | 170267 | 154446 | 15821 | 190652 | 171927 | 18725 | 91.8 | 90.7 | 90.2 |
| | एकूण | 3779984 | 687064 | 3092920 | 5992940 | 8031[illegible] | 5189749 | 8070032 | 1116792 | 6953240 | 18.2 | 13.4 | 13.8 |

स्रोत : जिल्हा जनगणना पुस्तिका, ठाणे जिल्हा - 191, 2001, 2011.




आकृती क्र. 1 : ठाणे जिल्हा लोकसंख्येची घनता

ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येच्या घणतेचा विचार केला असता 2011 च्या जनगणनेनुसार कल्याण तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे प्रती चौ.की.मी. ला 1162 ग्रामीण लोकसंख्या आढळते. या ठिकाणी मर्यादित क्षेत्रफळावार ग्रामीण लोकसंख्या केंद्रित झालेली आहे. सुमारे 23.26 चौ.की.मी. क्षेत्रफळ ग्रामीण लोकसंख्येने व्यापले आहे. सामान्यतः समुद्र किनारी प्रदेशात, सुपीक जमीनिंच्या व अरण्यांच्या प्रदेशात ग्रामीण लोकसंख्या केंद्रित झालेली आढळते. जिल्ह्यात सर्वात कमी ग्रामीण लोकसंख्येची घणता शहापूर तालुक्यात म्हणजेच सुमारे 153 प्रती चौ.की.मी. इतकी आढळते. या ठिकाणी विस्तृत प्रदेश म्हणजेच सुमारे 1587.23 चौ.की.मी. क्षेत्रफळ ग्रामीण लोकसंख्येने व्यापले असून देखील प्राकृतिक अडथळयांच्या प्रभावामुळे ग्रामीण लोकसंख्या विखुरलेल्या स्वरूपात आढळते. सुपीक दऱ्या – खोऱ्यानच्या प्रदेशात कृषि गावे, गवताळ कुरणांच्या प्रदेशात पशुपालन करणारी गावे, घनदाट जंगलांच्या प्रदेशात लाकुडतोड, वणसंकलन करणारी व आदिम जमातींची लहान लहान खेडी विखुरलेल्या स्वरूपात आढळतात. हीच परिस्थिति मुरबाड तालुक्यात पहावयास मिळते. या ठिकाणी देखील विस्तृत प्रदेशात विखुरलेल्या स्वरूपात ग्रामीण लोकसंख्येची घणता प्रती चौ.की.मी. ला 176 इतकी आढळते.

गेल्या 20 वर्षाचा विचार केला असता ग्रामीण लोकसंख्येत सर्वाधिक वृद्धी कल्याण तालुक्यात झाली असून सुमारे 1010 इतकी पहावयास मिळते, या नंतर ठाणे तालुक्यत 631, भिवंडी तालुक्यत 134, मुरबाड तालुक्यात 28 व शहापूर तालुक्यात 17 ने वृद्धी झालेली पहावयास मिळते. वाहतूक व दळण वळणाच्या सुविधा, रोजगार, शहरी प्रदेशातील अपुऱ्या जागेला पर्याय, जागेच्या कमी किमती व इतर अनुकूल परिस्थितींमुळे या प्रदेशत नागरीकरण वाढल्याचे दिसून येते. मुरबाड व शहापूर तालुक्यत मात्र प्रतिकूल भौगोलिक परिस्थितिमुळे लोकसंख्येची घणता प्रती चौ.की.मी. ला अत्यल्प आढळते. उल्हासनगर हा ठाणे जिल्ह्यातील एकमेव असा प्रदेश आहे की जेथे ग्रामीण लोकसंख्या जवळपास शून्य आहे.

तक्ता-02 : ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येची घणता आणि वृद्धी

(प्रती चौ. की. मी.)

| अ. क्र. | तालुका | *क्षेत्र चौ. कीमी | वर्ष 1991 | वर्ष 2011 | 20 वर्षातील वृद्धी |
|---|---|---|---|---|---|
| | | | घणता | घणता | |
| 1 | ठाणे | 23.26 | 41 | 672 | 631 |
| 2 | भिवंडी | 617.42 | 316 | 450 | 134 |
| 3 | शहापूर | 1587.23 | 136 | 153 | 17 |
| 4 | कल्याण | 243.64 | 152 | 1162 | 1010 |
| 5 | उल्हासनगर | 0 | 191 | 0 | 0 |
| 6 | अंबरनाथ | 236.71 | NA | 528 | |
| 7 | मुरबाड | 976.89 | 148 | 176 | 28 |

Shikshnik Sanstha's Arts, Com. ... Khardi, Tal. Shahapur ... Jeevandeep ... College

*प्रा. विशाल संपत भोसले & ** डॉ. राजेंद्र ओंकार परमार, *(2022)*. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण आणि घनता: एक भौगोलीक अभ्यास, ***ERJ-Vol IX, Special Issue- I, March - April - 2022, 273-277.***

**निष्कर्ष :**

ठाणे जिल्यातील ग्रामीण लोकसंख्येचे अध्ययन केले असता अनेक निष्कर्ष समोर येतात. त्यातील काही महत्वाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे :

ठाणे जिल्ह्यात ग्रामीण लोकडंख्येचे वितरण असमान झालेले आढळते. प्रामुख्याने शहापूर व मुरबाड हे पूर्णतः ग्रामीण प्रदेश आहेत. या तालुक्यांना लाभलेले भौगोलीक स्थान व प्राकृतिक रचना याचा प्रदेशाच्या विकासावर मोठा परिणाम झालेला दिसून येतो. साह्याद्री पर्वत रांगा, उंच-सखल भूपृष्ठ, घाट माथा अथवा पायथ्यालगतचा प्रदेश, विस्तृत दऱ्याखोऱ्यांचा प्रदेश व जंगल अशा प्राकृतिक अडथळयांमुळे हे प्रदेश विकसित प्रदेशांपासून विभक्त राहिले आहेत. अशातच वाहतूक मार्ग, वाहतूक साधने, दळण वळणाची साधने, कारखानदारीचा अभाव, अकुशल मजूरवर्ग अशा अनेक कारणांमुळे या प्रदेशातील नागरीकरणाची प्रक्रिया फार मंद गतीने सुरू असल्याचे आढळते. या उलट ठाणे व उल्हासनगर हे तालुके पूर्णतः शहरी आहेत. या ठिकाणी जलद नागरीकरण प्रक्रियेमुळे शहरी लोकसंख्या मोठ्याप्रमानवर आढळते. सपाट भूपृष्ठ, उष्ण-दमट हवामान, सागर किनारी बंदर प्रदेश, व्यापारी खाडी प्रदेश, मुंबई शहराशी समीपता, औद्योगिकीकरण, वाहतूक मार्ग व साधनांचे विस्तृत जाळे, दळण-वळण क्षेत्राचा विकास, कुशल व अर्धकुशल लोकसंख्येची उपलब्धता तसेच लोकसंख्येतील सामाजिक-सांस्कृतिक विविधता अशा अनेक अनुकूल घटकांमुळे या प्रदेशाचा विकास झपाट्याने झालेला आढळतो. तर जिल्ह्यातील कल्याण, भिवंडी व अंबरनाथ हे जिल्यातील शहरी व ग्रामीण भागातील संक्रम प्रदेश म्हणून भूमिका बजावतात. या प्रदेशात मर्यादित प्रतिकूल व अनुकूल घटकांमुळे लोकसंख्यचे वितरण असमान झालेले आहे प्रदेश अर्ध नागरी वा अर्ध ग्रामीण स्वरूपाचा आढळतो. मुंबई, ठाणे या सारखी शारी व शहापूर, मुरबाड सारख्या ग्रामीण प्रदेशांच्या दरम्यान स्थान असल्याने शहरी व ग्रामीण अशी दोन्ही वैशिष्ट्ये या प्रदेश आढळतात. अलीकडील कळलात मात्र शहरातील वाढत्या नागरी करणाला पर्याय म्हणून या प्रदेशांचे महत्व वाढत आहे. परिणामी या प्रदेशात नागरी करणाचा वेग वाढ आहे व ग्रामीण लोकसंख्येचे नागरी लोकसंख्येत रूपांतरण होत आहे. मात्र शहापूर व मुरबाड या सारख्या मुख्य शहरी प्रदेशांपासून दूर अंतरावर असलेल्या प्रदेशांत आजही हवा तसा विकास झालेला आढळत नाही. या मागील जी विविध कारणे आहेत त्यात प्रामुख्याने भौगोलिक घटकांचा अडथळा अथवा होणारा परिणाम फार प्रभावी असल्याचे आढते. आधुनिक तंत्रज्ञान, वाहतूक व दळण-वळणाचे जाळे, औद्योगिकीकरण, पर्यटन व सामाजिक, सांस्कृतिक विकास, राजकीय व प्रशासनिक महत्वकांक्षा या सारख्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील नागरीकरणाचा वेग वाढवला जाऊ शकतो. परिणामी जिल्ह्यातील असमान विकास व लोकसंख्येचे असमान वितरण काही प्रमाणात दूर करता येऊ शकते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

Chandana R.C. (2001)"Geography of population." New Delhi: Kalyani Publication

कुलकर्णी के. जी. (1983) "सांगली जिल्हा : ग्रामीण वासहतींचा अभ्यास", अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध शिवाजी विद्यापीठात, कोल्हापूर.

खातीब के. ऐ. "लोकसंख्या भूगोल" प्रथम आवृत्ती - जून 2011, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद

शिंदे अनिल (2006) "रायगड जिल्ह्यातील लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास", महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका, पुणे, pp 19-28

जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन, ठाणे जिल्हा

भारतीय जनगणना पुस्तिका – 1991, 2021, 2011

http:/www.censusindia.co.in

http://www.thane.nic.in

https://shodhganga.inflibnet.ac.in

***Cite This Article:***

***प्रा. विशाल संपत भोसले & ** डॉ. राजेंद्र ओंकार परमार,** (2022). **ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्येचे वितरण आणि घनता: एक भौगोलीक अभ्यास,** *Educreator Research Journal IX (Special Issues - I), March –April, 273-277.*

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & ... College Khardi, Tal Shahapur

INTERNATIONAL RESEARCH FEL

Impact Factor - 6.625

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue - 234

## समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणिवा




अतिथी संपादक
डॉ. अशोक पंडित
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद

कार्यकारी संपादक
डॉ. नरेंद्र मून
डॉ. ज्ञानेश्वर गवळीकार
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सिल्लोड, जि. औरंगाबाद

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

RESEARCHJOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Comm. & Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2020 Special Issue – 234

## समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणिवा

अतिथी संपादक
डॉ. अशोक पंडित
प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिल्लोड, जि. औरंगाबाद

कार्यकारी संपादक
डॉ. नरेंद्र मून
डॉ. ज्ञानेश्वर गवळीकार
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सिल्लोड, जि. औरंगाबाद

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर

Swatidhan International Publications
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-

Shahapur Taluka Sevak Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 234 : समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणीवा
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
*Assist. Prof. (Marathi)*
SPH Mahila Mahavidyalaya,
Malegaon, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

Co-Editors -
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh, Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon [M.S.] India
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, Goa, India
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur [M.S.] India
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari [M.S.]
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

Advisory Board -
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, Trieste, Italy.
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

Review Committee -
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar**, BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

Published by –
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 234 : समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणिवा
Peer Reviewed Journal

ISSN : 2348-7143
February-2020

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No |
|---|---|---|---|
| 1. | स्त्री, स्त्रीवाद आणि समकालीनत्व | डॉ. गोवर्धन मुळक | 05 |
| 2 | समकालीन स्त्री जाणिवांचे बदलते अंतरंग | कु. प्रियंका वाघरे, डॉ. नरेंद्र मून | 11 |
| 3 | समकालीन स्त्री जाणिवांचे बदलते अंतरंग | डॉ. लहुकुमार खंडाळे | 15 |
| 4 | मराठी विज्ञान साहित्यातील समकालीन स्त्री-प्रतिमा | डॉ. वंदना लव्हाळे | 18 |
| 5 | समकालीन स्त्री जाणिवांचे बदलते अंतरंग | निवेदिता सातपुते | 22 |
| 6 | समकालीन स्त्री जाणिवांचे बदलते अंतरंग | प्रा. माणिक बनकर | 26 |
| 7 | स्त्री स्वातंत्र्याच्या भारतीय संकल्पना आणि कला | प्रा.डॉ. मायकर बन्सी | 30 |
| 8 | स्त्री स्वातंत्र्य आणि भारतीय विचारधारा | डॉ. अनिता खंडागळे | 33 |
| 9 | मराठी कवितेतील नव्या स्त्री प्रतिमा | स्वाती बोढरे | 38 |
| 10 | मराठी ग्रामीण कादंबरीतील पुरुष लिखित स्त्री प्रतिमा | सुरेश शिरसाठ | 41 |
| 11 | समकालीन मराठी कविता आणि स्त्री जाणिवा | प्रा. कवित्रा सिपु वळवी | 45 |
| 12 | स्त्री जाणिवा: ऐतिहासिक आणि समकालीन | प्रा. शिवाजी वाठोरे | 51 |
| 13 | समकालीन मराठी आंबेडकरवादी कवयित्रींच्या काव्यातील स्त्री जाणिवा | डॉ. युवराज धबडगे | 57 |
| 14 | समकालीन कथा लेखिकांच्या लेखनातील स्त्री प्रतिमा | प्रा. कैलास कळकटे | 62 |
| 15 | मराठी कथेतील स्त्री जाणिवांचे स्वरुप | प्रा. अनिरुध्द मोरे, डॉ. सत्वशीला जाधव | 66 |
| 16 | मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री जाणिवा | डॉ. कार्तिकी नांगरे | 70 |
| 17 | समकालीन मराठी कवितेतून व्यक्त झालेल्या स्त्री जाणिवा | डॉ. युवराज भामरे | 73 |
| 18 | स्त्री जीवनमूल्ये आणि सामान्य जीवनमूल्यांचा संघर्ष | डॉ. सुनिता जावळे | 78 |
| 19 | स्त्रीचे दुय्यमत्व सतत सिध्द करणारे पुरुषत्व | प्रा. शेजुळ बाबुराव | 81 |
| 20 | भटक्या विमुक्तांच्या कादंबऱ्यांमधील स्त्री जीवन - जाणिवा | प्रा. वंदना पाटील | 84 |
| 21 | पुरुषसत्ताक श्रमविभाजन स्त्री गुलामीचे कारण | पुष्पा गायकवाड | 88 |
| 22 | स्त्री कादंबरीकारांच्या कादंबरीतून आलेल्या लैंगिक जीवन जाणिवा | डॉ. अक्षय घोरपडे | 91 |
| 23 | समकालीन मराठी कवितेतील स्त्रीजीवन चित्रण | डॉ. आनंद वारके | 94 |
| 24 | मराठी वाङ्मयातील जाणिवांचे स्वरुप | अर्चना हाडके | 99 |
| 25 | स्त्री जाणिवेच्या भाषेचे व्याकरण | प्रा. राजीव आरके | 102 |
| 26 | दलित कवयित्रींच्या कवितेतील 'स्त्री' अनुभवातून अभिव्यक्त झालेल्या काव्यात्म प्रतिक्रिया | डॉ. रेखा मेश्राम | 112 |
| 27 | समकालीन स्त्री जाणिवांचे बदलते अंतरंग | डॉ. संदीप बनसोडे, शीला डोंगरे | 116 |
| 28 | समकालीन मराठी कवितेतील स्त्री जाणिवा | डॉ. दिलीप जाधव | 120 |
| 29 | ग्रामीण समाजरचनेतील स्त्रियांचे स्थान | डॉ. ज्ञानेश्वर गवळीकर | 124 |
| 30 | स्त्री जाणिवेच्या अभिव्यक्तीचा नवा रुपबंध | वैशाली ढोले | 126 |
| 31 | मराठी नाटकातील स्त्रीवादी प्रवृत्ती | प्रा. राजरत्न दवणे | 129 |
| 32 | स्त्री जीवनमूल्ये आणि सामान्य जीवनमूल्यांचा संघर्ष | संगिता मकासरे | 134 |
| 33 | महानुभाव साहित्यातील स्त्री जाणिवा | मंगला पठाडे | 138 |
| 34 | स्त्री साहित्यकारांच्या साहित्यातील स्त्री विचार | डॉ. एस. पी. जगतवाड | 144 |
| 35 | वैदिक काळातील स्त्रीची परिस्थिती व आधुनिक काळातील स्त्रीची सुधारलेली स्थिती | मीना भिंगारदेव | 147 |




...Sanstha's Arts, Com.& Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 234 : समकालीन मराठी वाङ्मयातील स्त्री जाणीवा
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# समकालीन कथालेखिकांच्या लेखनातील स्त्रीप्रतिमा

प्रा. कैलास [illegible]
मराठी विभाग प्रमुख
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी
ता. शहापूर जि. ठाणे
९९२३९९२२९०

मराठी कथा वाङ्:मयाच्या वाटचालीत स्त्रीलेखिकांनी दिलेले योगदानाबद्दल महत्त्वपूर्ण आहे. शांताबाई या लेखिकेने लिहिलेली ' बिचारी आनंदीबाई ' ही पहिली उपलब्ध स्त्रीलेखिकेची कथा तर १९१५ साली लक्ष्मीबाई अभ्यंकर यांचा 'सद्य स्थिती' हा पहिला कथासंग्रह. ऐतिहासिक दृष्टीने विचार केला तर स्त्री कथालेखिकांच्या लेखनाने शतक पार केले आहे. या शतकभरातील 'तिच्या कथेने' मराठी कथेला समृध्द केले.प्रारंभीच्या कालखंडात बालबोध किंवा उपदेशपर असलेली कथा.आता मात्र तिचे खास अनुभव मांडताना दिसत आहे.कारण " ही 'तिची' कथा आहे.ह्या ' ती' चं कोणतंही एक विशिष्ट नाव नाही. 'स्त्री' हीच तिची ओळख.आयुष्यभर तिला सोबत फक्त नानाविध दु:खांची ! धर्माच्या नावाखाली तिचा छळ मांडणा-या जाचक परंपरा खंडित झाल्या खऱ्या , पण प्रश्न संपले नाहीत. जगण्याच्या नव्या पद्धतीतून तिच्यासाठी नवे प्रश्न निर्माण होतच राहिले.यातनांचे ,पीडेचे प्रकार बदलले पण दु: खाची जात तीच - जीवघेणी ! तिचं शिक्षण ,तिचं आर्थिक स्वावलंबन ,तिचं कर्तृत्व - सगळं खोटं ! खरं फक्त तिचं 'स्त्री ' असणं. ती अडाणी कामकरी असो अथवा वकील , डॉक्टर ,इंजीनियर असो, तिच्या तिच्या स्तरात तिला भेटणारा पुरुष आणि त्याचा समाज तिची छळणूक करीतच राहिला. स्त्रीच्या जगण्याचा गेल्या शंभर वर्षांचा हा साहित्यिक इतिहास म्हणजे खरं तर प्रत्येकीची कथा."(१) कारण प्रत्येक लेखिकेने आपल्या अनुभव विश्वाच्या माध्यमातून मराठी कथेला समृध्द केले. कथालेखिकांच्या स्त्रीप्रतिमा अतिशय आशयगर्भ आहेत. त्यामुळेच समकालीन कथालेखिकांच्या लेखनातील स्त्री प्रतिमा व त्यातून व्यक्त झाले स्त्री जीवन यांचा शोध प्रस्तुत लेखातून घेतला जाणार आहे.हा शोध घेत असताना पुढीलप्रमाणे निवडक समकालीन कथालेखिकांच्या कथा अभ्यासा साठी निवडलेल्या आहेत. कमल देसाई (रंग ), सानिया ( एक पाऊल पुढे! ) ,गौरी देशपांडे ( आता कुठं जाशील टोळंभट्टा?),उर्मिला पवार(शल्य), प्रिया तेंडुलकर ( नवा गडी ), मेघना पेठे ( कॉम्पनी ).

कमल देसाई यांच्या रंग या कथात्रयी मधून भेटणारी सुमित्रा जोशी ही नोकरी करते.वडील वारल्याच्या नंतर संपूर्ण घरादाराची जबाबदारी तिने उचलेली आहे. ही प्रतिमा स्वच्छ जगणारी आहे "रंग या कथात्रयीत कमल देसाई यांनी एकाच व्यक्तीमत्वातील द्विधाभावाचा ताण कथानिष्ठ केला आहे. या कथेतील सुमित्रा आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर घराच्या कर्तेपणाची जबाबदारी स्वीकारणे.ही जबाबदारी तिच्या इतकी अंगवळणी पडते की चहू अंगांनी उसळून येणारे सारे रंग उडून जातात.आयुष्याशी तडजोड करून सुमित्रा एक वेगळाच मुखवटा धारण करते.नाकावर बोट ठेवून तिच्यात वावरणाऱ्या या वेगळया सुमित्रेने तिला खाऊन टाकले आहे.या वेगळ्या सुमित्रेचा खरी सुमित्रा चमत्कारिक त-हेने द्वेष करते.सुमित्रेला आपल्यातल्या स्वच्छ



Shikshanik Sanstha's Arts, Com.& Science College Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

ISSN : 2348-7143
February-2020

निनळ अशा मुखवट्यापलीकडच्या ' ती ' ला शोधून काढायचं असतं." (२) केशव साठे अण्णा मामा इ.व्यक्तिरेखांच्या माध्यमातून ती स्वत ला शोधत जाते. जगण्याविषयीच्या तिच्या काही धारणा आहेत. परिस्थितीने तिला खूप काही शिकवले आहे.माणसांच्या मुखवट्या मागे लपलेल खर चेहर तिला त्रासदायक वाटतात त्याबरोबरच लग्न व्यवस्थेविषयीची चीड आहे.

"तुझ्या वहिणीचं लग्न झालं आहे. निदान आता तरी तू विचार करायाग."

"पुन्हा नव्यानं मला आता कशालाही सुरूवात करायची नाही.विश्रांती हवी आहे मला."

"तुला विश्रांती मिळावी म्हणूनच बोलतो आहे मी!"

" एखांद्या कादंबरीचा शेवट करायला हे वाक्य बरं आहे.प्रत्यक्षात ती विश्रांती नव्हे.फक्त दगदग आहे."(३)

सानिया यांच्या एक पाऊल पुढे! या कथेतील ऊर्मिला उच्च शिक्षित असून लग्न होण्याच्या अगोदर , ती एक स्त्री आहे म्हणून तिला नोकरी नाकारली जाते त्यावेळी ती तिथे जाऊन भांडते आणि नोकरी मिळवते पण नंतर तिचा बॉस असलेल्या विश्वास मध्ये गुंतते आणि त्याच्याशी नंतर लग्नही करते . ती संसारात गुंतंत जाते. कालांतराने मुलं,संसार घरदार यात ती एवढी गुंतून जाते की तिला स्वत : च्या करिअरचा तिला विसर पडतो. आयुष्यात घडणा-या अनेक घटनातून तिला याची सतत जाणीव व्हायला लागते की , ती घरीच असते त्यामुळे तिला दुय्यम स्थान दिल्या जाते किंवा तिच्या कडे दुर्लक्ष केल्या जाते. घरात प्राची (सुन) आल्याच्या नंतर ती तिला पुन्हा तिच्या गतकाळातील हुशारीची आठवण करून देते आणि ती उतारवयात निर्भय होते."तुम्हाला माहीत आहे का सगी .... तुम्ही फार हुशार होतात म्हणून तुमचं असं झालं. मला बरोबर कल्पना आली आहे. बायकोनं गृहिणी बनावं, करिअर करून स्वतंत्र बनू नये असं वाटणारे नवरे असतातच.पण तुमचं तसं नाही झालं... तुम्ही हुशार होतात.त्या बँकेत कामं करीत राहिला असतात ना, तर त्यांच्याशीच कदाचित स्पर्धा केली असतील... म्हणून ... म्हणून ..." तिला आठवलं ,त्या काळी पंचवीस - सव्वीस वर्षापूर्वी नव्हतो का आपण धीटपणे विश्वासच्या पुढ्यात कागद टाकून विचारलं, की काय कमी आहे सांगा यात ? मग आताच काय फरक पडला आहे ? केवळ वर्ष ,वय ...की नात्याचा ? स्वत: च्याच उत्तराने ती आता निर्भय बनली.(४)

गौरी देशपांडे यांच्या आता कुठं जाशील टोकंभट्टा ? या कथेतील निवेदनातील प्रथम पुरूषी नायिका 'मी ' ही स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची आहे . आवडीने संपादनीय देशात काम करते स्वत : च्या अस्तित्वाविषयीच्या तिच्या ठाम भूमिका आहेत या भूमिका स्त्रीवादी वाचनातून तयार झालेल्या आहेत . " .... तर ' मॉडर्न' नव-याला साजेशा औदार्यानं त्यानं मला "एकच खातं काढून त्यात दोघांचे पैसे ठेवू." असं सांगितलं. मग माझ्या मनात आलं की आपलचं वेगळं खातं काढावं. हे मात्र मी चटकन म्हटलं. परत त्यानं नाही. जराशाच आश्चर्यानं बघून " जा बँकेत ,आणि माझा रेफरन्स दे " असं म्हणून .मला खूप बरं वाटलं. स्वतंत्र , निर्भीड आणि मिळवती झाल्यासारखं वाटलं." (५) धनंत बरोबर तिचे लग्न झालेले असून ही ,त्याच्या बरोबरचा संसार व्यवस्थित सुरू असतानाही ती, ती एका कादंबरीकाराच्या प्रेमात पडते आणि त्याबरोबर तिला वेळ घालवावा असे वाटते त्यात तिला काहीच गैर वाटत नाही ही तिला मनाची अवस्था वाटते.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane 421 601

"आपण करतोय हे बरोबर आहे नाही,असं करायचं नसतं , वगैरे विचार माझ्या मनात आले की नाही असं कुणी विचारलं तर मी ठाम सांगू शकेन की खरोखरच ते प्रश्न मी कधी स्वत: विचारले नाही.कारण....हे सर्व 'माझ्या मला'. होतंय. " (६)

अशाप्रकारे ती मनाला प्राधन्य देते.

उर्मिला पवार यांच्या 'शल्य' या कथेत ज्योतीला पाचही मुली असतात.सहाव्या खेपेला आपल्याला मुलगीच होणार याची तिला खात्री होते. कारण मगील वेळेस जो त्रास बाळंतपणात होतो तसाच यावेळी देखील होत असतो. पाच.मुली आहे म्हणून संसारी तिला त्रास देतात.नवरा देखील दुसरे लग्न करण्याची जाहीर भाषा करत असतो. या सगळ्या त्रासा तून तिला बाहेर पडायचे असते. या दु :खा तून बाहेर पडण्यासाठीची धडपड सुरू असते त्यावेळी तिला तशी संधीही चालून येते. त्या संधीचा उपयोग ती मार्दीच्या ज्ञानाशी धरून गर्भ बदलून घेते. त्यानंतर तिच्या मनाची होणारी घालमेल व अपराधीपणाची भावना या कथेतून व्यक्त झाली आहे.

शिक्षा तेंडुलकर यांच्या 'नवा गडी' या कथेतील 'मी' ही घटस्फोटीत आहे. असिफ बरोबर तिचा प्रेमविवाह होतो. तिला एक मुलगाही आहे.तिचा आयुष्यात पुन्हा सुरेश येतो दुस-या लग्नासाठी तिच्या मनाची तयारी झालेली नसताना देखील तो तिला लग्न करण्यासाठी तयार करतो. आणि तिने त्याच्या अमेरिकेहून आलेल्या वहीणाला भेटण्याचा आग्रह करतो ती ही द्विधा मनस्थितीतच त्याच्या घरी जाते .तिला घेऊन जाण्यासाठी सुरेश आल्यापासून व त्याच्या घरी जे प्रसंग घडतात त्यावरून तिला या गोष्टीची जाणीव व्हायला लागते की ,आपण हा नवा मांडूच नये कारण तिला कुणाच्याही उपकारा खाली जगायचे नाही तसेच आपल्या स्वतंत्र अस्तित्वाला तडजोड आड आणायचे नाही "... उद्या सुरेशने माझा धंदा बंद करायचा,हट्टच धरला तर माझी आणि दिपूची आर्थिक जबाबदारीही त्याच्यावरच.हट्टाला पेटून पोटगी आणि दिपूचा खर्च नाकारला मी.कारण माझी आर्थिक बाजू बरी होती. कुणाच्या उपकारावर मला जगायचं नव्हतं . सुरेशशी लग्न झाल्यावर धंदा बंद करून जगायचं ते त्याच्या उपकारावरच ना ?"(७)

मेघना पेठे यांच्या 'कॉलनी' या कथेतील 'मी' एकटीच राहाते. ती दिसायला सुंदर नाही.नि:संकोचपणे ती मनाच्या – शरीराच्या गरजा मान्य करते. "... इतक्या वर्षांत कित्येक ओळखीच्या आणि अनोळखी लोकांविषयी – अगदी कंडक्टर – प्लंबर पासून ते कादंबरीतल्या पात्रांपर्यंत मला वेगवेगळ्या उत्कटतेचं आणि वेगवेगळ्या वासनांचं आकर्षण वाटून गेलं होतंच. अपरिहार्य नैसिर्गिकतेनं.मनाचं कौमार्य वगैरे काही माझ्यात नव्हतं.शरीराचं होतं, तेही नाइलाज म्हणून."स्त्रीला ही पुरूषाप्रमाणे शरीराची गरज आहे.तिला ही कोणत्याही पाशात न अडकता ही गरज पुर्ण करावी वाटते. ती ही गरज नेरूरकरविषयीच्या आकर्षणातून व्यक्त केली आहे.या बरोबरच एकटेपणाचे दु:खही व्यक्त केले आहे.

कथालेखिकांच्या स्त्रीप्रतिमा ठळक वैशिष्ट्ये :

१. उच्च शिक्षीत स्त्रीप्रतिमा.

२. द्विधा मनस्थिती दिसून येते. .

३. स्वावलंबी सोच , निर्णय

४. लग्न व्यवस्था,वैधव्य ,घटस्फोट याकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन

५. लग्नसंस्थेसंबंधीची बंडखोरी भूमिका



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

६. सांसारिकतेपलिकडचे संबंध
७. शारिरिक संबंधाकडे गरज म्हणून बघण्याची भूमिका
८. दडपलेल्या भावजीवनाचे ठळक प्रतिबिंब
९. जगण्याविषयीचा ठामपणा.

या सारखी अनेक वैशिष्ट्ये नोंदविता येतील.

संदर्भ :

१. आठवलेकर मंगला, प्रस्तावना, तिची कथा ,आवृत्ती तिसरी ऑगस्ट २००९ पृ.१ ,राजहंस प्रकाशन,पुणे
२. वरखेडे मंगला,स्त्रीयांचे कथालेखन ,द्वु .आवृत्ती २००५,पृ१८३., साकेत प्रकाशन ,औरंगाबाद
३. आठवलेकर मंगला, संपादन तिची कथा ,आवृत्ती तिसरी ऑगस्ट २००९ पृ.३ ,राजहंस प्रकाशन,पुणे
४. उनि पृ १३८
५. उनि पृ १४१
६. उनि पृ १४३
७. उनि पृ १६३



Shaikshnik Sanstha's Arts, Commerce & Science College, Kinhavli - Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCItPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
English Part - II /
Marathi Part - II /
Hindi

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य आणि शाश्वत विकास: एक सर्वेक्षण<br>**Dr. Shwetambari Kanakdande** | १-६ |
| २ | 'उघडा दरवाजा' आत्मकथेतील पर्यावरण<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | ७-१० |
| ३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा<br>**प्रा. कैलास कळकटे** | ११-१५ |
| ४ | पर्यावरण आणि सामाजिक समस्या<br>**प्रा. कांबळे रावसाहेब हरिबा** | १६-२० |
| ५ | इतिहास आणि पर्यटनातील पर्यावरण<br>**प्रा. लक्ष्मण नारायण भोईर** | २१-२४ |
| ६ | मुंबई शहरातील मिठी नदीच्या पुराची कारणे, त्याचे परिणाम आणि पुरव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. विशाल संपत भोसले** | २५-३३ |
| ७ | १९८० नंतरच्या कवितेतून चित्रित झालेले नैसर्गिक, सांस्कृतिक पर्यावरण - एक शोध<br>**सहा. प्रा. राजश्री प्रदीप कदम** | ३४-३९ |
| ८ | बदलत्या पर्यावरणाचे आदिवासी कथा साहित्यातून झालेले चित्रण<br>**प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस** | ४०-४६ |
| ९ | भारतातील पर्यावरण चळवळ एक अभ्यास<br>**डॉ. ज्योती अरविंद पोटे** | ४७-६० |
| १० | आधुनिक युद्धतंत्र नागरी संरक्षण<br>**प्रा. गणेश धर्मा थोरात** | ६१-६७ |
| ११ | पर्यावरणाविषयी अपुरी सामाजिक जागृती'<br>**प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे** | ६८-७१ |
| १२ | भौगोलिक पर्यावरणातील संदर्भ आणि कविता : अर्थ आणि अन्वयार्थ (यशवंत मनोहरांच्या 'केशवसुत' कवितेसंदर्भात)<br>**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** | ७२-७६ |
| १३ | पर्यावरनाच्या जनजागृती मधील प्रसार माध्यमाची भूमिका<br>**प्रफुल इंगोले** | ७७-७९ |
| १४ | बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी : पाचोळा<br>**प्रा. भारती घोलप** | ८०-८४ |
| १५ | जलसंवर्धनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा. सरोज आगवाले** | ८५-८७ |




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा

**प्रा. कैलास कळकटे**
मराठी विभागप्रमुख, जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी,
ता. शहापूर, जि. ठाणे.

## प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी राष्ट्राच्या प्रगतीसाठी खेडे स्वंयपूर्ण व्हायला पाहिजे. या तत्वज्ञानाने प्रेरित होऊन ग्रामसुधारणेची चळवळ हाती घेतली. त्यासाठी ते खेड्यापाड्यांतून फिरत असे व ग्रामसुधारणेसाठी प्रचार करत करत असे. त्यावेळी त्यांना एक जाणीव झाली की, ग्राम सुधारणेसाठी कायम स्वरूपी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. त्यासाठी मग त्यांनी विदर्भातील मोझरी येथे आश्रम काढला. तिथे स्वंयसेवक तयार करून त्यांना खेड्यापाड्यात पाठविल्या जात असे. व त्यातून पुढे ग्रामगीता या ग्रंथाची निर्मिती झाली आहे.

ग्रामगीता या ग्रंथात ४१ अध्याय आहेत आठपंचकामध्ये विभागणी केलेली आहे. ग्रामाची संपुर्ण सुधारणा करायची असल्याने ग्रामीण जीवनातील सगळ्या विषयांना त्यात स्पर्श केला आहे. हे आठ पंचक पुढीलप्रमाणे

१)सदधर्ममंथन पंचक २)लोकवशीकरण पंचक ३)ग्रामनिर्माण पंचचक

४)दृष्टिपरिवर्तन पंचक ५) संस्कारशोधन पंचक ६) प्रेमधर्मस्थापना पंचक

७) देवत्वसाधन पंचक ८) आदर्श जीवन पंचक

थोडक्यात खेड्यात जन्म घेतल्यापासून ते मृत्यू होईपर्यंतच्या सगळ्या बाबींचा विचार या ग्रंथात करण्यात आलेला आहे.

या ग्रंथाच्या निर्मितीमागे तुकडोजी महाराजांची तळमळ दिसून येते

अरे ! उठा उठा श्रीमंतांनो ! अधिका-यांनो ! पंडितांनो !
सुशिक्षितांनो ! साधुसंतांनो ! हाक आली क्रांतीची ||१||
गावा गावासि जागवा । भेदभाव हा समूळ मिटवा ||
उजळा ग्रामोन्नतीचा दिवा । तुकड्या म्हणे ||२||

या दोन ओळीतून ग्रामगीताचा उद्देश व सार आपल्या लक्षात येतो.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

**पर्यावरणीय जाणीवा**

पर्यावरणीय जाणिवांच्या अंगाने संतसाहित्याचा शोध घेताना परिस्थितीविज्ञान ही संकल्पना विचारात घेणे महत्त्वाचे ठरते. परिस्थितीविज्ञान (Ecology) ही संज्ञा सर्वप्रथम जर्मन प्राणीशास्त्रज्ञ ई.एच हेकेल यांनी प्राणी त्यांचा परिसर यांच्या परस्पर संबंधाच्या अभ्यासाच्या जीवविज्ञानाच्या शाखेसाठी वापरली.ही संकल्पना जा महत्त्वपूर्ण आहे. तसेच या संकल्पनेच्या अंतर्गत असणारी विधिवास (इकोसिस्टिम) ही संकल्पना ही महत्त्वा आहे. " विधिवास म्हणजे प्राणिमात्रांचा निवास ज्या सजीव - निर्जीव नैसर्गिक पर्यावरणात असतो, तो निवास पर्यावरणीय विधिवासाचा परिणाम त्यातील सर्वच सजीवांवर होत असतो त्याचप्रमाणे सजीवांचा परिणाम पर्यावरणावर होत असतो." [1] याबाबतीत रा. ग जाधव यांनी' पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य ' या ग्रं विस्तृत मांडणी केली आहे. परिस्थितीविज्ञान या संकल्पनेविषयी ते म्हणतात " परिस्थितीविज्ञान हे माणसा पर्यावरणबद्ध व पर्यावरणबाधक वर्तनाच्या समस्यांना नेमकेपणाने शोधणारे व त्यातून निराकरणाचे म दाखविणारे शास्त्र आहे.माणसाचे स्वास्थ्य व आरोग्य टिकावे ,अन्न व ऊर्जा यांचे मानवोपकारक असे पर्याव चक्र निर्वेधपणे चालत राहावे व सृष्टीजातीतील सजीव - निर्जीव संबंधाला व अधिवासाला समतोलपणा प्राप्त व्हावा यासाठी परिस्थिती विज्ञानाचा खूप मोठा उपयोग आहे. " [2]

यातूनच पुढील कालखंडात ' सांस्कृतिक पर्यावरण ' ही संकल्पना उदयास आली.ही संकल्पना मुळात म व त्यांचा नैसर्गिक परिसर किंवा अधिवास यांच्या एकात्मेवर अधिष्ठित आहे.परस्परांच्या अस्तित्वाला ठरणारे जीवशास्त्रीय नाते या संकल्पनेत गृहीत धरले आहे. " मानवी समाज ,संस्कृती आणि पर्यावरण परस्पर संबंधातील एकात्मता ,परस्परबध्दता , सारभूत संस्कृतीविशेष आणि आदानप्रदान पध्दती इत्यादी महत्त्वाच्या व अर्थपूर्ण आहेत. त्या तशा आहेत,असे मानूनच पुढे जाणे, अधिक संशोधन करणे व सांस्कृ पर्यावरणाची संकल्पना क्रमशः विशद करत जाणे, एवढेच आपल्या हाती आहे." [3] सांस्कृतिक पर्याव संकल्पनेत मानवी समाज, संस्कृती आणि पर्यावरण यांच्या परस्पर संबंधातील एकात्मतेवर भर देण्यात आहे.

**ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा**

ग्रामगीतेमध्ये स्वतंत्रपणे पर्यावरणीय जाणीवा व्यक्त झालेल्या नाहीत. ग्रामसुधारणेसाठी त्यांनी जो केलेला आहे. त्यामाध्यमातून सुट्यासुट्या स्वरूपात या जाणीवा आढळून येतात.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

आज शेतकरी मोठ्याप्रमाणात उत्पादन घेण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करत आहे. त्यामुळे अनेक रोग पीकांवर पडत आहे. शेतीच्या उत्पादनापेक्षा जास्त खर्च हा शेतीमालाच्या उत्पादनावर होत आहे आणि त्यातील ९० टक्के खर्चहा रासायनिक खते व औषधी यांच्यावर होत आहे. त्यामुळे जमीनीचा कस देखील कमी होत आहे. पण यावर तुकडोजी महाराजांनी अगोदरच मार्ग सांगितलेला आहे.

गोव-या करोनी जाळिती | ते महालाभास आचवती |
शेणात आहे लक्ष्मीची वसती | धर्मग्रंथीहि वचन ऐसे ||६६||
म्हणोनि सर्व गावाचे मलमूत्र | जमवोनि झाकावे जाणोनि तंत्र |
त्याने गावाची जमीन सर्वत्र | खतवोनि घावी || ६७||
याने दूर होईल घाण |थांबेल रोगराईचे नुकसान|
आणि पिकेल अधिक धान्य| अनेक लाभ एकामाजी ||६८||

(अध्यया ११)[४]

शेणखताचा वापर करून आपण अधिक पीककसे घेऊ शकतो हे वरील ओळीतून दिसून येते.

घराच्या समोर परसबाग असणे किती गरजेचे आहे हे शासनाच्या आज लक्षात आले त्यामुळे वेगवेगळ्या शाळांमध्ये परसबागेचा उपक्रम राबविल्या जात आहे.तसेच आलिकडच्या काळात प्रत्येक घरासमोर एक तरी झाड असले पाहिजे यासाठी प्रयत्न केल्या जात आहे .पण ग्रामगीतेतील ग्रामनिर्माण पंचकाच्या ग्रामनिर्माणकला या तिस-या भागात ग्रामाची रचना कशी असावी या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केलेले आहे.व त्यामध्ये गावात झाडे कशी लावावी या संदर्भात मार्गदर्शन करताना ते म्हणतात.

झाडे दिसती ओळीबद्ध | सरळ सुंदर,हिरवी शुद्ध|
घरमालकचि करी खुद्द| काम आपुल्या हातांनी||४२||
घराभोवती बाग केली |सांडपाण्यावरि झाडे वाढली|
फळाफुलांची रोपे वेली|भाजीपाला नित्याचा||४३||

(अध्याय १३)[५]

एका अहवालाप्रमाणे दरवर्षी जवळपास ३० टक्के जंगल हे वेगवेगळ्या प्रकारच्या आगीमुळे नष्ट होत आहे त्यातही प्रामुख्याने शेतीकामाच्या संदर्भात ज्या आगी लावल्या जात आहे.त्यामुळे [illegible] नुकसान होत आहे.ते जर होऊ द्याचे नसेल तर का काळजी घेतली पाहिजे व [illegible]

भागात असते अनेकदा ही जनावरे उघड्यावरच मरून पडलेली असतात .त्यामुळे रोगराई पसरते त्यामु विल्हेवाट कशी लावावी यासंदर्भात उपदेश करताना ते म्हणतात.

फास .गवतगंजी .कडबागूड । भूस उपणणे अथवा खळवाड।
कुंभार - आवा .अग्निकुंड।सुरक्षित जागा नेमाव्या त्यांच्या ॥७९॥
मेली जनावरे कोठेहि नेली।गावभरि घाण.मांसहाडे आली।
ऐसे न व्हाया पाहिजे नेमेली।जागा उघडण्या -गाडण्याची॥८०॥

(अध्याय १३)(६)

गाय या प्राण्याला हिंदुधर्म ग्रंथामध्ये मोठ्याप्रमाणात महतव देण्यात आलेले आहे.अगदी तिच्य तेहेतीस कोटी देवांचा वास असतो.एवढे महतव गाईला देण्यात आले आहे. तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या अध्यायांपैकी १५ वा अध्याय हा गोवंश –सुधार या विषयावरच लिहिलेला आहे.पण यात कुठे कर्मकांड या स्व गायीची महतव न सांगता शास्त्रीय पध्दतीने त्यांनी ग्रामजीवनातील गाईचे महत्त्व विशद केले आहे.

गायीचा आरोग्यासाठीचा फायदा.शेतीसाठीचा फायदा.जोडधंदा याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले आ म्हणतात.

गोमय.गोमूत्र,मिळोनि रात्रंदिसा।कायम होता भूमीचा कस।
पेवे भरती गावागावास।धान्याची तेव्हा॥१०॥
भूमी आणि जनावरे।हीच उत्पतीची कोठारे।
एकाची अनेक होती खिल्लारे।जोडधंदा हा घरोघरी॥११॥
तिच्या शेणाने पिके शेती।शेती देई सुखसंपत्ति।
म्हणोनीच शेणामाजी लक्ष्मीची वसती।वर्णिली असे॥२२॥

(अध्याय १५)(७)

**समारोप**

या सारख्या अनेक उपदेशपर ओव्यांच्या माध्यामातून ग्रामगीतेतून पर्यावरणीय जाणीवा व्यक्त होतात पण त्या सगळ्याच पर्यावरणासंदर्भात नाहीत.तर पर्यावरणाला पुरक असणा-या इतर ज्या गोष्टी आहेत त्यासंदर्भात देखील आहे.त्यामुळेच ख-या अर्थाने ग्रामगीता ही ग्रामसुधारणेची गीताच आहे.ग्रामगीतेचा उद्देश ग्रामसुधारणा हाच आहे. त्यामुळे ग्रामीण पर्यावरण व त्यासंबंधीच्या अनेक गोष्टी ग्रामगीतेतून येत

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ... Jeevandeep ... Tal. Shahapur, Dist. Thane, 421601

नावाहून जरी धार्मिक वाटत असली व ओवी या रचनाप्रकारात लिहिलेली असलेली तरी ती तिचे स्वरूप धार्मिक नाही तर सामाजिक आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्याच शब्दात सांगायचे झाल्यास

ग्रामगीता नव्हे पारायणासी।
वाचता वाट दावी जनासी ।
समूळ बदलवी जीवनासी।
मनी घेता अर्थ तिचा।

**संदर्भसूची**

१. जाधव रा.ग .पर्यावरणीय प्रबोधन आणि मराठी कविता पृ ३७७ ,मराठी कविता परंपरा आणि दर्शन (संपा.रविंद्र शोभणे) ,विजय प्रकाशन नागपूर,प.आ २००६

२. जाधव रा.ग ,पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य,पृ १३

३. तत्रैव पृ ९१

४. संपा माधव राजगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विरचित ग्रामगीता,पृ१३२ ,महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ,मुंबई ,पुनर्मुद्रण २००३

५. तत्रैव पृ १४०

६. तत्रैव पृ १४३

७. तत्रैव पृ १६०-६१

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL
MULTIDISCItPLINARY
QUARTERLY RESEARCH
JOURNAL

# AJANTA

Volume - IX, Issue - I,
January - March - 2020
English Part - II /
Marathi Part - II /
Hindi

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com



Ajanta Prakashan

Tal. Shahapur,
Dist. Thane,
421 601

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

ENGLISH PART - II / MARATHI PART - II / HINDI

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठवाड्यातील ग्रामीण स्त्रियांचे आरोग्य आणि शाश्वत विकास: एक सर्वेक्षण<br>**Dr. Shwetambari Kanakdande** | १-६ |
| २ | 'उघडा दरवाजा' आत्मकथेतील पर्यावरण<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | ७-१० |
| ३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीतेतील पर्यावरणीय जाणीवा<br>**प्रा. कैलास कळकटे** | ११-१५ |
| ४ | पर्यावरण आणि सामाजिक समस्या<br>**प्रा. कांबळे रावसाहेब हरिबा** | १६-२० |
| ५ | इतिहास आणि पर्यटनातील पर्यावरण<br>**प्रा. लक्ष्मण नारायण भोईर** | २१-२४ |
| ६ | मुंबई शहरातील मिठी नदीच्या पुराची कारणे, त्याचे परिणाम आणि पुरव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा. विशाल संपत भोसले** | २५-३३ |
| ७ | १९८० नंतरच्या कवितेतून चित्रित झालेले नैसर्गिक, सांस्कृतिक पर्यावरण - एक शोध<br>**सहा. प्रा. राजश्री प्रदीप कदम** | ३४-३९ |
| ८ | बदलत्या पर्यावरणाचे आदिवासी कथा साहित्यातून झालेले चित्रण<br>**प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस** | ४०-४६ |
| ९ | भारतातील पर्यावरण चळवळ एक अभ्यास<br>**डॉ. ज्योती अरविंद पोटे** | ४७-६० |
| १० | आधुनिक युद्धतंत्र नागरी संरक्षण<br>**प्रा. गणेश धर्मा थोरात** | ६१-६७ |
| ११ | पर्यावरणाविषयी अपुरी सामाजिक जागृती'<br>**प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे** | ६८-७१ |
| १२ | भौगोलिक पर्यावरणातील संदर्भ आणि कविता : अर्थ आणि अन्वयार्थ (यशवंत मनोहरांच्या 'केशवसुत' कवितेसंदर्भात)<br>**डॉ. संदीपान श्रीमंत नवगिरे** | ७२-७६ |
| १३ | पर्यावरनाच्या जनजागृती मधील प्रसार माध्यमाची भूमिका<br>**प्रफुल इंगोले** | ७७-७९ |
| १४ | बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी : पाचोळा<br>**प्रा. भारती घोलप** | ८०-८४ |
| १५ | जलसंवर्धनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा. सरोज आगवाले** | ८५-८७ |





Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# ६. मुंबई शहरातील मिठी नदीच्या पुराची कारणे, त्याचे परिणाम आणि पुरव्यवस्थापन : एक भौगोलिक अभ्यास

**प्रा. विशाल संपत भोसले**
जिवणदीप शैक्षणिक संस्था संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी, ता. शहापूर, जि. ठाणे.

**प्रस्तावना**

मुंबई महाराष्ट्र राज्याची राजधानी आणि देशाची आर्थिक राजधानी होय. जगातील विकसीत शहरांमध्ये मुंबईचा समावेश होतो. देशाच्या आर्थिक उत्पन्नात मुंबईचा फार मोठा वाटा आहे. व्यापार व उद्योग धंद्याचे केंद्र म्हणुन शहरास महत्व आहे. परिणामी शहराचा विकास मोठ्य प्रमाणावर झालेला आढळतो.

जगातील इतर अनेक विकसित शहराप्रमाणे मुंबईतही रोजगार व्यापाराच्या निमीत्ताने लोकांचे स्थालांतर वाढत चालले आहे. परिणामी जागेची टंचाई निर्माण होऊन शहराचा अनियोजित विस्तार होत चालला आहे. वाढती लोकसंख्या, जागेची टंचाई, प्रदूषण, प्राथमिक सोई–सुविधांवर वाढत जाणारा ताण या सारख्या समस्यांनी मुंबई शहराला ग्रासले आहे. अशातच अलीकडे दर वर्षी मुंबईतील मिठी नदीला येणाऱ्या पुरामुळे शहरातील बराच मोठा भाग जलमय होऊन जन–जिवन विस्कळीत होते व शहराच्या समस्येत अधिकच वाढ होते. तथापी याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे या नदीला वारंवार येणाऱ्या पुराची कारणे शोधणे व त्यावर उपयोजन करणे महत्वाचे ठरते.

सदर प्रबंधात मुंबईतील मिठी नदी, या नदीचे महत्व, मिठी नदीच्या पुराची समस्या व त्याचे परिणाम या संदर्भात अध्ययन करून मुंबई शहराला भेडसावणाऱ्या या मिठी नदीच्या पुराच्या समस्येवर उपाय–योजना सुचवीण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास क्षेत्र**

मुंबई दक्षिण भारतातील महाराष्ट्र राज्यातील सर्वांत मोठे शहर. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावरील या नैसर्गिक बंदराचे स्थान १८° ५४ ते १६° १५ उत्तर अक्षांश आणि पूर्व ७२° १५ ते ४३° पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. सात बेटांचे मिळून मुंबई शहराची निर्मिती झालेली आहे. यात वसई, धारावी, सालसेट, कुलाबा, ट्रॉम्बे, एलिफंटा या बेटांचा समावेश होतो .

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

MITHI RIVER LOCATION MAP




मुंबई शहराचे एकूण क्षेत्रफळ घर्श् चौ. की. मी. आहे. शहराच्या पूर्वेला सह्याद्रीच्या पर्वतरांगा व पश्चिमेला अरबी समुद्र आहे. पश्चिम आशिया व पूर्व आशिया यांच्या दरम्यान मुंबई शहराची स्थिती मध्यवर्ती ठिकाण, म्हणूनच मुंबईला भारताचे प्रवेशद्वार म्हटले जाते. शहराच्या दक्षिणेला कोकण विभाग व उत्तरेला गुजरातचा भाग आहे. राजस्थानच्या दक्षिण भागापासून उत्तर कर्नाटक पर्यंत व गुजरात पासून मध्य प्रदेशापर्यंत मुंबईचे प्रभाव क्षेत्र आहे.

मुंबई शहरात सागर सानिध्यामुळे उष्ण दमट हवामान आढळते. सरासरी पर्जन्यमान सुमारे घ२३ ते घह्३ से.मी. पर्यंत आढळते. आज शहराची लोकसंख्या ही २३,०५६,७३१ इतकी वाढली असून यात दररोज भर पडत आहे. प्रादेशिक दृष्ट्या फोर्ट, मलबारहिल व माझगाव, उत्तर पश्चिम व पूर्वेकडील उपनगर आणि नवीमुंबई अशा चार विभागात मुंबईचे विभाजन करता येते.

**उद्दिष्टे**

१. पूर संकल्पना स्पष्ट करणे.

२. मुंबईतील मिठी नदी व तिचे मुंबईच्या दृष्टिकोनातून महत्व विषद करणे.

३. मीठी नदीला वारंवार येणाऱ्या पुराची कारणे व त्याचे परिणाम अभ्यासणे.

४. मिठी नदीच्या पुराच्या समस्येवर उपाय योजना सुचवणे.

**गृहीतके**

१. मुंबई शहरास मीठी नदीच्या पुराचा धोका आहे.

Shaikshanik Sanstha's Arts, Com. & Science, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 60

२. मुबंईतील मिठी नदीच्या जलाचे व्यवस्थापन केल्यास वारंवार येणाऱ्या पुरावर नियंत्रण मिळवता येऊ शकते.

**संशोधन पद्धती**

सदर प्रबंधा करीता प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या माहितीचा आधार घेतला आहे. विविध पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके, सरकारी अहवाल, लोकांच्या मुलाखती, अनुभव यांचा माहिती मिळवण्यासाठी अवलंब केला आहे. तसेच संगणक आधारित नकाशाशास्त्रीय तंत्रे, आलेख व नकाशे यांचा देखील वापर केला गेलेला आहे. शिवाय विविध संकेतस्थळावरील माहितीचाहि स्तोत्र म्हणून उपयोग केला आहे.

**विषय विवेचन**

मुंबई ही देशाच्या आर्थिक राजधानीचे ठिकाण असल्याने या शहरावर आपत्ती आल्यावर त्याचा परिणाम संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. म्हणूनच मुंबई शहराशी संबंधीत नैसर्गिक वा मानव निर्मित आपत्तीचे अध्ययन करणे आवश्यक ठरते. मुंबईच्या मीठी नदीला वारंवार येणाऱ्या पूर समस्येचा अभ्यास करण्याआधी पूर ही संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

**पूर—संकल्पना**

"पावसाळ्यात जास्त पर्जन्यामुळे किंवा उन्हाळ्यात बर्फ वितळल्याने नदी पात्रात क्षमतेपेक्षा पेक्षा पाण्याची पातळी अधिक वाढल्याने जी परिस्थिती निर्माण होते, तिला पूर परिस्थिती असे म्हणतात." हेच प्रमाण सातत्याने अधिक वाढत जाऊन त्याचे रुपांतर महापुरात होते.

पावसाच्या नैसर्गिक पाण्याशिवाय चक्रीय वादळांमुळे समुद्राचे पाणी नदीपात्रात आतवर खोलपर्यंत शिरते त्यामुळे देखील पुर सदृश्य स्थिती निर्माण होते. याशिवाय नदी क्षेत्रातील भूकंप, भुहालचाली, वादळी पर्जन्य यामुळे पूर परिस्थितीला सामोरे जावे लागते.

**मीठी नदी व तिचे महत्व**

मुंबई शहरातून वाहणाऱ्या मीठी नदीला "माहीम नदी" या नावाने देखील ओळखले जाते, जी सालशेत द्वीपवर स्थित आहे. मुंबई शहरातील विहार व पवई या तलावात अतिरिक्त पाण्याचे प्रमाण वाढले की मीठी नदी प्रवाह वाहू लागतो. त्यामुळे नदीचे स्रोत हे विहार व पवई तलाव आहेत. यावरून ही हंगामी स्वरूपाची नदी असून पावसाळ्यात प्रवाहित होते व शेवटी पश्चिमेला अरबी समुद्रात (माहीम खाडीस) जाऊन मिळते. या नदीची सरासरी लांबी सुमारे घन की.मी. इतकी आहे. मीठी नदीचा प्रवाह मार्ग हा मुंबई शहरातील

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

औद्योगिक वसाहतीतून वाहतो. पवई, साकीनाका, कुर्ला, कलिना, बांद्रा–कुर्ला संकुल, धारावी आणि माहीम या भागातून वाहत माहीमच्या खाडीत जाऊन पुढे अरबी समुद्रास मिळतो. या नदीची सरासरी रुंदी वरच्या टप्प्यात ५ मीटर, मधल्या टप्प्यात २५ मीटर आणि खालच्या टप्प्यात सुमारे ७० मीटर पर्यंत आहे.

मिठी नदीस मुंबई शहराच्या दृष्टीने फार महत्वाचे स्थान आहे. शहरातील अतिरिक्त जल नैसर्गिकरित्या बाहेर पोहचवण्याचे काम या नदिमार्फत होते. परिणामी शहरात पाणी जमा न होता जलजण्य परिस्थिती निर्माण होत नाही. परंतु मुंबई शहराचे संरक्षण करणाऱ्या या नदीस अलीकडील काळात वारंवार पूर येण्याने ही नदी चर्चेचा मोठा विषय बनली आहे. त्यामुळे मीठी नदीच्या या परिस्थितीस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा सखोल अभ्यास करणे महत्वाचे ठरते.

**मीठी नदीच्या पुराची समस्या — कारणे व परिणाम**

मुंबईचे नैसर्गिक सुरक्षा कवच असणाऱ्या मीठी नदीला वारंवार येणारे पूर व त्यामुळे होणारी जीवित व वित्त हानी यामुळे मीठी नदी चर्चेचा मोठा विषय बनली आहे. २६ जुलै २००५ व २००६ मध्ये या नदीस आलेल्या महापुरामुळे झालेली हानी ही विसारण्यासारखी नाही. परंतु या मागील कारणे शोधण्याचा प्रयत्न केला असता काही धक्कादायक सत्य पुढे आलेली आहेत. आतिपर्जन्य व प्रतिकूल हवामान अशा नैसर्गिक कारणांपेक्षा मानवनिर्मित कारणे या परिस्थितीस अधिक जबाबदार असल्याचे आढळते. मुळात मीठी नदी हा नाला नसून एक नदी आहे या गोष्टीचाच विसर पडलेला दिसतो.

**Morphology and Sub-Basin Map of Mithi River**




गेल्या अनेक दशकापासून मुंबई शहराचा वाढत जाणारा विकास व विस्तार याचा परिणाम मिठी नदीप्रवाहावर झालेला आहे. मीठी नदीचा प्रवाहमार्ग निवासी व आद्योगिक प्रदेशातून वाहत जातो व शेवटी माहीम खाडीजवळ अरबी समुद्रास जाऊन मिळतो. या दर्म्यान शहरातील सर्व प्रकारचे सांडपाणी आणि औद्योगिक पाणी या नदीत सोडले जाते. तसेच सेव्हेज सुद्धा या नदीतच सोडले जात असल्याने ही नदी मोठ्या



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

प्रमाणावर प्रदूषित झालेली आहे. नदी पात्रात जलपर्णी व इतर जालीय वनस्पतीचे आच्छादन निर्माण झालेले आहे. यामुळे पाणी पूर्णतः दूषित झालेले आहे.

मीठी नदीची पात्र मर्यादा पाहता असे लक्षात येते, की कित्येक वर्षे या नदीतील गाळ काढला गेलेला नाही. या उलट सर्व प्रकारचा कचरा या नदी प्रदेशात टाकला गेलेला आहे. परिणामी पावसाळ्यात नदी प्रवाहात अडथळे निर्माण होऊन पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होते.

**Mithi River Flood Hazard Map**




मुंबई शहराची वाढती जागेची टंचाई कमी करण्याकरीता या नदीच्या किनारी भागात मातीची भर टाकून नदीचे पात्र अरुंद करण्यात आले व मोठी मोठी औद्योगिक संकुले, इमारती उभारल्या गेल्या. त्यामुळे नदीचे मूळ पात्र संकुचित होऊन अरुंद झाले आहे. परिणामी नदीच्या खोऱ्यात पाणी मावत नाही व पूर परिस्थिती निर्माण होते.

मीठी नदीच्या प्रवाह मार्गात अनेक ठिकाणी बदल करण्यात आलेले आहेत. नदीच्या प्रवाह मार्गास अनेक ठिकाणी काटकोनात वळणे दिलेली आहेत. परिणामी नदीप्रवाहात अनेक अडथळे निर्माण झालेले आहेत.

मीठी नदीच्या मुख्य प्रवाहाला के—पूर्व विभागातील श्रद्धानंद, लेलेवाडी, ओबेरॉय आणि कृष्णा नगर तर एल विभागातील जरीमरी आणि एच—पूर्व विभागातील वाकोला हे नाले येउन मिळतात. या नाल्यालगत आणि मिठीच्या पात्रालागत असणाऱ्या निवासी वसाहती आणि औद्योगिक वसाहती मार्फत मोठ्य प्रमाणात घनकचरा आणि सांडपाणी नादित सोडले जाते. परिणामी मिठीच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. नदीच्या प्रवाह मार्गात अडथळे निर्माण झाल्यामुळे नदीपात्र उथळ व अरुंद बनले आहे. याचा परिणाम म्हणून पाण्याचे प्रमाण थोडे जरी वाढले तरी ते नदी पात्रातून बाहेर पडण्यास सुरुवात होते.

Shikshanik Sanstha's Arts, Com. & Science
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

सन २००५ व २००६ मध्ये निर्माण झालेल्या पूर परिस्थिती मुळे मीठी नदी व या नदीची झालेली दुरावस्था समोर आली. अशा परिस्थितीमुळे मुंबईचे अनेक सखल भाग जलमय होऊन जनजीवन विस्कळित होते. मोठ्य प्रमाणावर जीवित व वित्त हानी होते. शहरात प्रदूषण व रोगराई वाढते. दैनंदिन जीवन, आर्थिक व्यवहार, व्यापार ठप्प होतात. खाजगी व सार्वजानीक मालमत्तेचे नुकसान होते. रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक पूर्णत: विस्कळीत होऊन ठप्प होते. हवाई वाहतुकीवरही दूरगामी परिणाम होतो. दळण—वळण व संदेशवहन व्यवस्था विस्कळित होते.. अंधेरी, दहिसर, गोरेगाव, मालाड, सांताक्रूझ, चेंबूर, वरळी, परेल, दादर, माटुंगा यासारख्या महत्वाच्या ठिकाणी पाणी साचून सामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. इमारतींचे तळमजले, झोपडपट्ट्य, व्यापारी बाजारपेठा यात पाणी शिरून मोठी वित्त हानी होते. परिणामी देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाणारी मुंबई पुर्णत: ठप्प होते.

**मुंबईतील प्रमुख पूरग्रस्त क्षेत्र**

मुंबई शहराला भेडसावणारी मिठी नदींच्या पुराची समस्या ही शहरातील विविध भागात एकसारख्या प्रमाणात अढळत नाही. साधारणत: मुंबई शहऱ्याच्या भूप्रदेशाचा उतार उत्तरेकडून दक्षिणेकडे आहे, त्यामुळे नदीप्रवाह हा उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहत जाऊन अरबी समुद्रास जाऊन मिळतो.






Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts Com. & Scien. Khardi, Tal Shahapur, Dist. Thane. 421 ...

१. मुंबई शहऱ्याच्या उत्तर भागात पुराचा परिणाम फारसा होताना आढळत नाही. पवई व विहार तलावांच्या परिसरात पुराचा परिणाम कमी प्रमाणात होतो. मात्र मध्य मुंबई परिसरात अनेक ठिकाणी सखल प्रदेश असल्याने येथे पुराचा जास्त परिणाम होतो. हिंदमाता, सायन, साकीनाका, कुलाबा, माटुंगा, कुर्ला, अंधेरी, सांताक्रूझ, कलिना, बांद्रा, कुर्ला–संकुल, धारावी या सारख्या सखल भूभागाच्या प्रदेशात मोठया प्रमाणावर पुराच्या पाण्याचा परिणाम होतो. दरवर्षी हे भूभाग पाण्याखाली जातात व मोठ्य प्रमाणावर जनजीवन विस्कळीत होते.

२. शहराच्या समुद्र किनारी भागात देखील पूर आपत्तीचा मोठा परिणाम होताना आढळतो. नदीचा प्रवाह या ठिकाणी अरबी समुद्रात मिळतो परंतु अनेक मानवनिर्मित इमारती, संकुल वा इतर घटकांनी येथे नदीचा प्रवाहमार्ग संकुचित झालेला आहे. परिणामी पुराचा मोठा फटका प्रदेशास बसतो. तसेच अति वृष्टीच्या काळात समुद्रातील पाणी उलटे नदी पात्रातून शहरात शिरते व परिस्थिती आणखीनच बिघडते.

**मिठी नदीच्या पुराचे व्यवस्थापन**

१. मुंबईच्या मिठी नदीला येणारा पूर ही निसर्गनिर्मित कमी व मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण झालेली जास्त समस्या आहे. या आपत्तीचे व्यवस्थापन करण्याकरिता मीठी नदी व नदीलगतच्या प्रदेशाची परिस्थिती बदलने गरजेचे आहे. किणाऱ्या लगत उभारलेली अनधिकृत बांधकामे, झोपडपट्ट्य नाहीश्या करून नदीपात्र पूर्ववत केले पाहिजे. जेणेकरून नदी प्रवाह सुरळीत प्रवाहित होईल.

२. सामान्यत: मिठी नदीच्या पुराच्या व्यवस्थापणेकरिता पुढील मार्ग सुचविता येतील ....

३. मीठी नदीच्या प्रवाहपात्रातील गाळ व कचरा स्वच्छ करून पात्र पूर्ववत केल्याने नदीची जलधारणा क्षमता वाढेल.

४. मीठी नदीच्या दोन्ही किनारी भागात संरक्षण तट भिंती बांधल्यास पुराचा प्रभाव कमी होऊ शकतो.

५. मीठी नदीच्या किनारी भागातील अनधिकृत बांधकामे, झोपडपट्ट्य हटवल्यास होणारे प्रदूषण आणि जीवित व वित्त हानी टाळता येईल.

६. शहरातील सांडपाणी, टाकाऊ रसायने व इतर पदार्थ नदीत सोडण्यावर बंदी घातली गेली पाहिजे जेणे करून नदीतील जल प्रदूषित होणार नाही.

७. नदी प्रवाहास दिली गेलेली काटकोनी वळणे नाहीशी करून नदी प्रवाह पूर्ववत केला गेला पाहिजे.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

८. नदीच्या पात्रातील व किनारी भागातील जलपर्णी, जलीय आच्छादन स्वछ करून ते पुन्हा तयार होणार नाही याची दक्षता घेतली गेली पाहिजे.

९. मिठी नदीच्या किनारी भागात मोठ्या वनस्पतीची लागवड केली गेल्यास पूरपरिस्थितीवर नियंत्रण मिळवता येऊ शकते.

१०. मीठी नदीच्या पुराचे अतिरिक्त पाणी साठविण्याच्या उपाययोजना आखल्या गेल्या पाहिजे जेणे करून हे पाणी तात्पुरत्या स्वरुपात साठवता येऊ शकेल व पुराचा त्रास होणार नाही.

११. मीठी नदीचा प्रवाह स्रोत असलेल्या विहार – पवई तलावांची स्वच्छता व जलधारण क्षमता याकडे लक्ष केंद्रित केले गेले पाहिजे.

१२. मुंबई व परिसरातील नाले, गटारे यांच्यावरही लक्ष केंद्रीत करून वेळोवेळी त्यांची स्वच्छता व दुरुस्ती केली गेली पाहिजे.

१३. नदि प्रदूषणास जबाबदार असणाऱ्या उद्योग–कारखान्यांवर दंडात्मक कारवाही व या संदर्भात कायदेशीर तरतुदी केल्या गेल्या पाहिजे.

१४. मिठी नदी जल शुद्धीकरण व व्यवस्थापन या करिता स्वतंत्र समिती व विभाग गठीत केला पाहिजे.

आशा प्रकारे मुंबईतील मिठी नदीला येणार पूर हा निसर्गातील मानवी हस्तक्षेपामुळे निर्माण झालेला प्रश्न असून त्यावर मार्ग काढण्यासाठी वरील उपाययोजना राबवता येऊ शकतात.

## निष्कर्ष

### सदर प्रबंधाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे

मुंबईच्या मीठी नदीला वारंवार येणारे पूर ही नैसर्गिक आपत्ती कमी व निसर्गातील मानवी हस्तक्षेपाचा परिणाम जास्त आहे. नदी प्रदेशातील मानवी हस्तक्षेपामूळे ही समस्या निर्माण झालेली आहे. तथापी हा हस्तक्षेप दूर करून मीठी नदीच्या पुराच्या जलाचे व्यवस्थापन केल्यास हा प्रश्न सोडवता येऊ शकतो. यात प्रशासनाबरोबरच सामान्य नागरिकांची भूमिका देखील महत्वाची आहे.

## संदर्भ यादी

१. "भारताचा प्रादेशिक भूगोल" : प्रा.पी. चौधरी – प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव

२. "वस्ती भूगोल" : डॉ. विठ्ठल घारपुरे – पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर



Jeevandeep Shaikshanik Sanstha's Arts Com. & Science
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

**संकेतस्थळे**

१. HTTPS://mmrda.maharastra.gov.in

२. HTTPS://maharastra pollution control board

३. HTTPS://m.youtube.com

४. www.ndtv.com

५. www.mcgm.gov.in

६. www.mumbaimirror.indiatimes.com

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | निराधार बालकांच्या संगोपनासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या योजनांचे चिकित्सक अध्ययन<br>**डॉ. संभाजी भाऊराव काळे**<br>**गितांजली अशोक सरोदे** | ६९-७२ |
| १४ | बदलत्या पर्यावरणाचे, पर्यावरण ऱ्हासाचे आधुनिक मराठी कवितेने घेतलेला वेध : एक अभ्यास<br>**प्रा. सुनिलदत्त गोडसे** | ७३-७५ |
| १५ | शाश्वत विकास आणि शाश्वत विकासाची उद्दिष्टये<br>**तन्मय प्रभाकर भावसार** | ७६-८३ |
| १६ | शालेय पोषण आहार योजनेमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाचा एक अभ्यास<br>**वर्षा शेषराव गाडवे** | ८४-८६ |
| १७ | जागतिक युध्दांचा पर्यावरणावर झालेला परिणाम<br>**प्रा. यशवंत भालचंद्र खैरनार** | ८७-९० |
| १८ | पर्यटनामुळे पर्यावरणावर झालेले परिणाम<br>**प्रा. देवदास र. आरोलकर** | ९१-९६ |
| १९ | नर्मदा बचाओ आंदोलनाचा विश्लेषणात्मक अभ्यास<br>**सौ. नम्रता अजित भोईर** | ९७-१०५ |
| २० | पर्यावरण आणि आरोग्य<br>**प्रा. संगिता बी. चव्हाणके** | १०६-१११ |
| २१ | पर्यावरणीय राजनीति<br>**डॉ. आर. डी. शिंदे** | ११२-११८ |
| २२ | ग्रामिण विकासात 'नाबार्ड' ची भुमिका: एक आकलन<br>**प्रा. भुताळे दत्तात्रय मारोती** | ११९-१२७ |
| २३ | बदलत्या पर्यावरणाचे मराठी कांदबरीतून झालेले चित्रण<br>**प्रा. संदीप भागू चपटे** | १२८-१३५ |
| २४ | पर्यावरणीय नितीशास्त्राच्या अभ्यासाची गरज<br>**डॉ. अमन वामन बगाडे** | १३६-१३९ |
| २५ | बदलत्या पर्यावरणातील मराठी कादंबरी<br>**प्रा. डॉ. चिंतामण भोईर** | १४०-१४८ |
| २६ | वदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कांदबरी<br>**डॉ. सिध्दार्थ आगळे** | १४९-१५७ |





Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science
Khardi,
Tal. Shahapur,
Dist. Thane,
421 601

# २२. ग्रामिण विकासात 'नाबार्ड'ची भुमिकाः एक आकलन

**प्रा. भुताळे दत्तात्रय मारोती**
समाजशास्त्र विभाग, जीवनदीप महाविद्यालय,खर्डी, शहापूर, जि. ठाणे.

**प्रस्तावना**

भारतीय रिझर्व्ह बॅंकेची स्थापना सन १९३५ मध्ये झाली. तेव्हापासून भारतीय कृषी व्यवसायाला प्रत्यक्ष कर्ज पुरवठा करण्याचे काम या बॅंकेकडे होते. रिझर्व्ह बॅंकेने कृषी व ग्रामीण विकासाकरिता पतपुरवठयाबाबत केलेले कार्य फार महत्वाचे आहे. यासाठी अनेक योजना रिझर्व बॅंकेने राबविल्या आहेतण सहकारी पतपुरवठा करण्यासाठी बॅंकेने पुढाकार घेउन स्वतंत्र कृषी पतपुरवठा विभाग स्थापन केला. सन १९६३ साली 'कृषी पुनर्वित व विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले.कृषीला दिर्घकालीन पतपुरवठा करणे व पुनर्वितांच्या सोयी उपलब्ध करुन देणे ही प्रमुख जबाबदारी या महामंडळावर होती. तथापी ग्रामीण पतपुरवठयाची वेगाने विस्तार होण्याची आवश्यकता रिझर्व्ह बॅंकेला वाटत होती. त्यामुळे पुढील काळात कृषीच्या विकासाची कल्पना अधिक व्यापक करुन ती ग्रामीण विकासाच्या कल्पनेत परिवर्तित करण्यात आली.

ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास करण्याच्या दृष्टीने ग्रामीण पतरचनेत कोणते बदल घडवून आणावेत याचा विचार करण्यासाठी मार्च १९७९ मध्ये रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाने श्री.बी.शिवरामन यांच्या अध्यक्षतेखाली कृषी व ग्रामीण विकासासाठी, संस्थापक पतसंस्थेसाठी आढावा समिती स्थापन केली व या समितीला कृषी व ग्रामीण विकासासाठी दिल्या जाणा—या संस्थापक पतपुरवठयाच्या व्यवस्थेचा आढावा घेण्याचे काम दिले.या समितीच्या मते एकात्मिक ग्रामीण विकासासाठी शेवटच्या स्तरापर्यंत कार्यक्षमतेने कर्ज पुरवठा झाला पाहिजे. ग्रामिण भागातील लोकांना केवळ कृषीसाठी कर्ज देण्यासाठी त्या त्यांच्या इतर गरजा पूर्ण करण्याकरिता कर्ज देवू शकल्या पाहिजे.

शिवरामन यमितीने वरील या सुचनेबरोबरच एकात्मिक ग्रामिण विकासासाठी दिल्या जाणा—या कर्जामधून ज्या समस्या निर्माण होतील.त्या सोडविण्यासाठी आणि ग्रामिण विकासास दिशा देण्यासासाठी एखादी शिखर संस्था स्थापन करावी म्हणून शिफारस केली होती. भारत सरकारने शिवरामन समितीची शिफारस स्विकारुन नाबार्ड ॲक्ट १डिसेंबर १९८१ मध्ये संसदेत संमत केला व त्यानुसार १२ जुलै १९८२ रोजी राष्ट्रीय कृषी आणि ग्रामिण विकास बॅंक नाबार्ड, ;छंजपवदंस ठंदा वित हतपबनसजनतम दक त्नतंस क्मअमसवचउमदजद्ध ची स्थापना करण्यात आली. ग्रामिण क्षेत्राचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेला वित्तपुरवठा करणारी नाबार्ड ही एकमेव शिखर संस्था आहे. रिझर्व्ह बॅंक आणि केंद्र सरकार यांच्या सहभागातून नाबार्ड ची भांडवल उभारणी झाली आहे. या बॅंकेचे अधिकृत भांडवल ५०० कोटी रुपयांचे होते. तसेच वसूल झालेले भांडवल १०० कोटी रुपयांचे होते.नाबार्ड भांडवल बाजारातून भांडवल जमा करते. केंद्रसरकार, रिझर्व्ह बॅंक, जागतिक बॅंक व अंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याकडून 'नाबार्ड' ला भांडवल प्राप्त होते.

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601 Jeevandeep

**संकल्पनात्मक विश्लेषण**

कृषी व ग्रामीण गैरकृषी विभागाला वित्तपुरवठा करुन ग्रामीण भारताचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने संसदेच्या विशेष कायद्याने नाबार्डची स्थापना रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया व भारत सरकारच्या मालकीने करण्यात आली. कृषी वित्तपुरवठयासाठी रिझर्व्ह बॅकेचे कृषी पत विभाग व ग्रामीण नियोजन आणि पतकक्ष कार्यरत होते. तसेच रिझर्व्ह बॅकेने १९६३ मध्ये कृषी पुनर्वित ची स्थापना केली होती. त्याचेच रुपांतरण १२ जुलै १९८२ मध्ये भारतात 'नाबार्ड' या शिखर बॅकेची स्थापना करण्यात आली. पूर्वी शेतकी व ग्रामीण पतपुरवठयासंबंधीची जी कामे भारतीय रिझर्व्ह बॅक करीत असे. ती सर्व कामे नाबार्ड कडे सोपविण्यात आली. ग्रामीण क्षेत्राचा सर्वागिण विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेला वित्तपुरवठा करणारी नाबार्ड ही एकमेव शिखर संस्था आहे.

**नाबार्डची उदिदष्टये**

नाबार्ड बॅकेची स्थापना पुढील उदिदष्टये साध्य करण्यासाठी झालेली आहे.

१. कृषी, लघुउदयोग, कुटीरउदयोग, हस्तउदयोग व इतर ग्रामीण अर्थव्यवस्थांना वित्तपुरवठा घेण्याच्या उददेशाने पतनियोजन करणे.

२. ग्रामीण क्षेत्राला लघुमुदतीची व दीर्घमुदतीची कर्ज देणा—या वित्तीय संस्थांना पुर्नवित्तपुरवठा करणे.

३. भारत सरकारने निर्देशित एखादया वित्तीय संस्थेला प्रत्यक्ष कर्जपुरवठा करणे.

**नाबार्डची कार्ये**

शेती व ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेतील नाबार्डचे कार्य महत्त्वपुर्ण आहे.शेती पुनर्वित व विकास महामंडळाचे पुनर्वित पुरवठा करण्याचे काम नाबार्डला करावे लागते. नाबानर्डची महत्त्वाची कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. नाबार्ड विविध वित्तीय संस्थांना पुनर्विताच्या सोयी उपलब्ध करुन देते. सहकारी पतपुरवठा संस्था, क्षेत्रीय ग्रामीण बॅंका आदींना या सोयी उपलब्ध केल्या जातात.शेती उत्पादन,विक्री व्यवसाय, कृषी आदानांचे वितरण लघुउदयोग,कुटीरउदयोग,हस्तव्यवसाय इत्यादी बाबींना पतपुरवठा करण्यात उत्तेजन दिले जाते.

२. नाबार्ड ग्रामीण पतपुरवठा क्षेत्रात शिखर बॅक म्हणून काम पाहते.पुर्वी ते काम रिझर्व्ह बॅकेकडे होते.

३. राज्य सहकारी बॅक, क्षेत्रीय ग्रामीण बॅक, भूविकास बॅका इत्यादींना अल्प मुदत, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे दिली जातात.

४. सहकारी सोसायटींचे भागभांडवल पुरविण्यासाठी नाबार्ड घटक राज्यसरकारांना वीस वर्ष मुदतीपर्यंतची दीर्घ मुदतीची कर्जे देउ शकते.

५. सरकारमान्य वित्तीयसंस्थांना दीर्घकालीन पतपुरवठा करणे आणि शेती व ग्रामीण विकासाशी निगडीत संस्थांच्या भागभांडवलात सहभागी होणे यासारखे कार्यही नाबार्ड करते.

६. केंद्रशासन, राज्यशासन, नियोजन आयोग आणि ग्रामीण विकासाशी संबंधीत राज्य व केंद्रीय पातळीवरील संस्थांच्या कार्यात योग्य समन्वय साधण्याचे कार्य नाबार्डला करावे लागते.

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science ... Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

७. शेती व ग्रामीण विकासाला उत्तेजन देण्यासाठी बँकेने 'संशोधन व विकास निधी' स्थापन केला आहे. ग्रामीण भागातील निरनिराळ्या क्षेत्रांच्या गरजा पाहून प्रकल्प व कार्यक्रम आखणे याकामी संशोधन कार्याचा फार उपयोग होतो.

८. याशिवाय ही बँक शेती पतपुरवठा विभागामार्फत सहकारी बँकांच्या कामकाजाची पाहणी करते.

**नाबार्डचे व्यवस्थापन**

नाबार्ड कार्यालय मुंबईत असून २८ प्रादेशिक कार्यालये व एक उपकार्यालय आहे. नाबार्डची ६ शिक्षण केंद्रे कार्यरत आहेत. नाबार्डचा कारभार संचालकांच्या मंडळाकडून पाहिला जातो. नाबार्डच्या २ संलग्न संस्था १.नाबार्ड कंसल्टंसी सर्व्हिसेस २. नाबार्ड फायनशिअल सर्व्हिसेस कार्यरत आहे.

१. रिझर्व्ह बँकेचा डेपोटी गव्हर्नर हा नाबार्डचा चेअरमन (अध्यक्ष) असतो.
२. याशिवाय रिझर्व्ह बँक तीन संचालक नेमते.
३. केंद्रसरकार तीन संचालक नियुक्त करते.
४. स्हकारी बँकांमधील दोन आणि व्यापारी बँकांमधील एक तज्ञ संचालक नेमले जातात.
५. ग्रामीण अर्थव्यवस्था व ग्रामीण विकास यांच्याशी संबंधीत दोन संचालक नियुक्त केले जातात.
६. राज्यसरकार दोन संचालक नियुक्त करतात.
७. याशिवाय एक व्यवस्था संचालक असतो.
८. आणि एक पूर्ण वेळ संचालक असतो.

**नाबार्ड संचालक व्यवस्थापन**

**Boards of Directors (NABARD)**




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

**ग्रामीण विकास बँकेचे (नाबार्ड) पुनर्वित्तविषयक कार्ये**

कृषी व ग्रामीण पतपुरवठा व्यवस्थेतील नाबार्डचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. कृषी पुनर्वित व विकास महामंडळाचे पुनर्वित पुरवठा करण्याचे काम नाबार्डला करावे लागते.'शिखर बँक' म्हणूनही जबाबदारी पार पाडावी लागते. नाबार्डची महत्त्वाची कार्य पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**पतपुरवठयाशी संबंधित कार्य**

ग्रामीण कर्ज रचनेत एक शिखर बँक संस्था म्हणून नाबार्ड महत्त्वाची भुमिका बजावते.नाबार्डद्वारे अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या (गुंतवणूकद्धपुनर्वित कर्जाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. ही सुविधा राज्य सहकारी बँक, व्यापारी बँका, राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका व रिझर्व्ह बँकेकडून मान्यताप्राप्त इतर वित संस्था इत्यादी संस्थांना निरनिराळया मुदतीचा पुनर्वित कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिला जातो. नाबार्ड कृषी आणि ग्रामीण विकासासाठी शेतक—यांना किंवा व्यावसायिकांना प्रत्यक्ष कर्ज देत नाही तर ग्रामीण भागात काम करणा—या बँका आणि आर्थिक संस्थांना पुनर्वित कर्ज देते. ज्या संस्थांना ते कर्ज दिले त्यांनी ते कृषी व ग्रामीण विकास कार्यासाठी उपयोग करणे आवश्यक असते.

**१. अल्पमुदती कर्जे**

ज्या कर्जाच्या परतफेडीची मुदत एक ते दीड वर्षाची असते त्यास अल्पमुदती कर्जे असे म्हणतात. एका पीक हंगामात येणा—या उत्पादन खर्चासाठी जसे बी,बीयाणे, खते,कीटकनाशके इ. कारणासाठी अल्पमुदती वा पीक कर्जे दिली जातात. सन २०१०—११ पर्यंत ३५,३१४कोटी रुपयाइतके कर्ज वाटप करण्यात आले आहे.तर हि रक्कम दिवसेंदिवस वाढत आहे.

**२. दीर्घकालीन पतपुरवठा**

नाबार्ड मध्यमकालीन व दीर्घकालीन पतपुर्वठयाला उत्तेजन देते. राज्य सरकारांना सहकारी संस्थेचे भागभांडवल खरेदी करता यावे म्हणून दीर्घकालीन पतपुरवठा केला जातो.१९९३—९४ मध्ये ८१ कोटी रुपयांइतका मध्यम व दीर्घकालीन कर्ज पुरवठा करण्यात आला तर सन २०१०—१० मध्ये हा कर्जपुरवठा २०१कोटी रुपयांपर्यंत वाढला.

**३. कृषी व ग्रामीण विकास संस्थांना मदत**

केंद्र सरकारने मान्यता दिलेल्या आणि कृषी व ग्रामीण विकास कार्यास वाहून घेतलेल्या संस्थांना नाबार्ड दीर्घ मुदतीची कर्जे देते. तसेच अशा प्रकारच्या संस्थांच्या स्थापनेच्या काळात भागभांडवल उभारणीस मदत करते. २००९—१० मध्ये कृषी आणि ग्रामीण विकास संस्थांना ४६०५२ कोटी रुपये कर्ज दिले जाते.

**४. कृषी विषयक कार्य**

कृषी विषयक कार्यासाठी अप्रत्यक्षरित्या नाबार्ड प्राथमिक पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती, भूविकास बँका इ.च्या माध्यमातून करते. यात शेतीविषयक यांत्रिकीकरणासाठी व लघुपाटबंधारे योजनासाठी मदत देण्यात येते.२०१२—१३मध्ये शेतीविकासासाठी नाबार्डने ८१३कोटी रुपयांचे कर्ज वाटप केले होते. त्यात आताच्या परिस्थितीत मोठे बदल झाले आहेत.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

**५. कृषी व ग्रामीण विकास कार्यात समन्वय साधणे**

देशातील कृषीक्षेत्र,तसेच लघुउद्योग, ग्रामीण उद्योग, घरगुती उद्योग आणि अन्य उद्योगाच्या विकासाच्या दृष्टीने केंद्रसरकार, राज्यसरकार, नियोजन मंडळ आणि इतर संस्था इ.यांच्या कार्यात समन्वय साधण्याची जबाबदारी नाबार्डकडे सोपवण्यात आली आहे.

**६. संस्थागत विकास**

कृषी आणि ग्रामीण विकासाच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी देशामध्ये ग्रामीण वित्तीय प्रणाली अधिक बळकट व परिपूर्ण बनविण्यासाठी वित्तीय वितरण प्रणाली निर्माण करणे गरजेचे होते. या अनुशंगाने नाबार्डने १९८२ पासून संस्थागत विकासाच्या माध्यमातून वेगवेगळया योजनांच्या माध्यमातून सहकारी संस्थांना व क्षेत्रीय ग्रामीण बॅकेस अधिक बळकट बनविण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण भागातील शेतकरी व इतर लोकांना गावपातळीवर कर्जपुरवठा व्हावा या दृष्टीकोनातून ग्रामीण वित्तीय प्रणाली विकसीत केली.

**७. कृषीक्षेत्राचा विकास करणे**

नाबार्डच्या कृषीक्षेत्र विकास विभागाच्या माध्यमातून नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन व संरक्षण करणे, कृषी उत्पादकतेचा वृद्धिदर वाढवणे, ग्रामीण रोजगार निर्मितीस चालना देणे, कर्ज आणि अनुदानाच्या मदतीने ग्रामीण जनतेचा विकास साधणे, ग्रामीण व कृषी विकासासाठी भारत सरकारच्या वतीने राबविण्यात येणा—या योजनांची अंमलबजावणी करणे वगैरे प्रकारचे कार्य नाबार्ड करते.नाबार्डच्या कृषीक्षेत्र विकास विभागाच्या माध्यमातून किसान क्षेत्र संवर्धन निधी उत्पादक संघटन विकास निधी,आदिवासी विकास कार्यक्रम, पाणलोट विकास कार्यक्रम इ.कार्य नाबार्ड करते.

**८. संशोधन आणि विकासात्मक कार्य**

कृषी क्षेत्रात अधिक संशोधन व्हावे आणि ग्रामीण क्षेत्राच्या विकासास सहकार्य व्हावे यासाठी नाबार्ड प्रोत्साहन करते. या कार्यास आर्थिक मदत देणे आणि काही विकास योजना साकार करण्यासाठी नाबार्डने संशोधन आणि विकास निधीची उभारणी करण्यासाठी संशोधन व विकास निधीचा उपयोग प्रशिक्षण सुविधा, माहितीचा प्रसार, तसेच कृषी, ग्रामीण बॅकिंग आणि ग्रामीण क्षेत्राचे सर्वेक्षणाच्या माध्यमातून तांत्रिक व आर्थिक परिवर्तन करण्यासाठी संशोधनास वाव देणे इ. कारणासाठी केला जातो. या निधीच्या माध्यमातून संशोधन प्रकल्प अभ्यास आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व प्रादेशीक चर्चासत्रे, कार्यशाळांचे आयोजन, संशोणन पेपर व प्रकाशन वरील खर्च, संशोधन अध्ययन खर्च, बॅक प्रशिक्षण आणि उन्हाळी प्रशिक्षण कार्यक्रम इ.आयोजित केले जातात.सध्या या निधीची रक्कम ५० कोटी रुपये आहे.

**९. कृषी व संलग्न क्षेत्रासाठी कर्ज पुरवठा**

नाबार्डद्वारे कृषी संलग्न क्षेत्रासाठी कर्ज उपलब्ध करुन दिले जाते.हे कर्ज राज्य सहकारी बॅका, व्यापारी बॅका आणि रिझर्व्ह बॅकेने मान्यता दिले नाबार्डद्वारे कृषी संलग्न क्षेत्रासाठी कर्ज उपलब्ध करुन दिले जाते.हे कर्ज राज्य सहकारी बॅका, व्यापारी बॅका आणि रिझर्व्ह बॅकेने मान्यता दिलेल्या अन्य वित संस्थांद्वारे दिले जाते. कृषी व संलग्न क्षेत्राला केलेल्या कर्जाला आधारस्तरीय कर्ज असेही म्हणतात. हे कर्ज पीक कर्ज मुदत कर्ज,लघुसिंचन,भू—विकास, कृषी मशीनीकरण,फळबागा,पशुपालन,मत्स्यपालन, हायटेक कृषी आणि अन्य अशा कृषीच्या संलग्न उपक्षेत्राच्या विकासासाठी दिले जाते.

Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

नाबार्डद्वारे कृषी हंगामी कामासाठी आणि कृषी उपक्षेत्रासाठी सन२०००—०१ते २०१०—११ या काळात केलेल्या पुनर्वित कर्जाचे वितरण आपणास पुढील प्रमाणे दर्शवता येईल.

**तक्ता क्र. (A)**

नाबार्डचे कृषी हंगामी कामासाठी आणि कृषी उपक्षेत्रासाठी पुनर्वित कर्जाचे वितरण

(सन.२०००—०१ ते २०१०—११)

**रु.कोटीमध्ये**

| अ क्र. | वितरण | २००० —०१ | २००१ —०२ | २००२ —०३ | २००३ —०४ | २००४ —०५ | २००५ —०६ | २००६ —०७ | २००७ —०८ | २००८ —०९ | २००९ —१० | २०१० —११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पीककर्ज अल्पकालीन उत्पादन कर्ज | ३३३१ ४ ६३. ०६ | ४०५० ९ ६५. २९ | ४५५८ ६ ६५. ५३ | ५४९७ ७ ६५. २१ | ७६०६ २ ६०. ७० | १०५३ ५० ५८. ३७ | १३८४ ५५ ६०. ३६ | १८१३ ९३ ७१. २३ | २१०४ ६१ ६९. ७१ | २७६६ ५६ ७१. ९५ | २३५ ५५० ७१. ६५ |
| २ | मुदत कर्ज—मध्यम व दीर्घकालीन गुंतवणूक कर्ज | १९५१ ३ ३६. ९४ | २१५३ ६ ३४. ७१ | २३९७ ४ ३४. ४७ | ३२०० ४ ३६. ७९ | ४९२४ ७ ३९. ३० | ७५१३ ६ ४१. ६३१ | ९०९४ ५ ३९. ६४ | ७३२६ ५ २८. ७७ | ९१४४ ७ ३०. २९ | १०७८ ५८ २८. ०५ | १३२ ४१ २८. ३५ |
| ३ | एकूण १+२ | ५२८२ ७ १०० | ६२०४ ५ १०० | ६९५६ ० १०० | ८६९८ १ १०० | १२५३ ०९ १०० | १८०४ ८६ १०० | २२९४ ०० १०० | २५४६ ५८ १०० | ३०१९ ०८ १०० | ३८४५ १४ १०० | ४६८ २९१ १०० |

तक्ता क्र. । मध्ये सन २०००—०१ ते २०१०—११ या कालखंडात नाबार्डने कृषी हंगामी कामासाठी आणि कृषी उपक्षेत्रासाठी केलेले पुनर्वित कर्जाचे वितरण दर्शविण्यात आलेले आहे.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

**आलेख क.।**

एकूण कृषी कर्ज वाटपातील पीक कर्ज आणि मुदत कर्जाची टक्केवारी

(सन.२०००–०१ ते २०१०–११)




आलेख क. । मध्ये नाबार्डने कृषीसाठी केलेल्या एकूण पुनर्वित कर्ज वाटपातील पीक कर्ज व मुदतकर्जाची टक्केवारी दर्शविण्यात आलेली आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की,२०००–०१ते २०१०–११ या कालखंडात नाबार्डने कृषीला केलेल्या एकूण पुनर्वित कर्ज वाटपाच्या टक्केवारीचा विचार केल्यास पीक कर्ज वाटपाच्या टक्केवारीत ६३.०६ टक्क्यावरुन ७१.६५ टक्के एवढी घट झाल्याचे दिसून येते.

**उददेशानुसार पुनर्वित पुरवठा**

नाबार्डने विविध उददयेशाने दिलेल्या पुनर्वित पुरवठयाची रक्कम २०००–०१ ते २०१०–११ या कालखंडात पुनर्वित कर्जाचे वाटप केले. सदरील कालखंडात नाबार्डने केलेल्या एकूण उदिदष्टानुसार दीर्घ मुदत पुनर्वित कर्जाच्या टक्केवारीचा विचार केल्यास सर्वात जास्त २६.७५ टक्के गैरकृषी क्षेत्र तर सर्वात कमी ०.११ टक्के वनीकरणाला एकूण उदिदष्टानुसार दीर्घ मुदत पुनर्वित कर्जाचे वाटप केल्याचे दिसून येते. तर इतर क्षेत्रात कृषी यांत्रिकाकरण १६.६२ टक्के ,दुग्ध व्यवसाय ६.६९टक्के, कुक्कुटपालन शेळी–मेंढी व वराहपालन ४.३६टक्के, भू–विकास ४.३१टक्के, वृक्ष लागवड व फळबागा ३.७७ टक्के,गोदाम व मार्केट यार्ड १.१७ टक्के, अनुसुचित जाती जमाती कार्य योजना ०.५६ टक्के आणि मत्स्यपालन०.४४ टक्के याप्रमाणे एकूण उदिदष्टानुसार दीर्घ मुदत कर्जाचे वाटप केले आहे.

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi,
Tal. Shahapur,
Dist. Thane,
421 601

**तक्ता क्र.ठ**

**उदिदष्टानुसार पुनर्वित कर्ज वाटपाची टक्केवारी(:)**

(सन.२०००—०१ ते २०१०—११)

| अ.क्र. | एकूण कर्ज कोटीमध्ये | विविध उदिदष्टये | टक्केवारी (१००:) |
|---|---|---|---|
| १ | **एकूण रुपये ९८,९३६,२६कोटी (१००:)** | लघुसिंचन | (७.१६:) |
| २ | | भू—विकास | (४.३१:) |
| ३ | | कृषीयांत्रिकीकरण | (१६.६२:) |
| ४ | | वृक्षलागवड व फळबागा | (३.७७:) |
| ५ | | कुक्कुटपालन,शेळी—मेंढी व वराह पालन | (४.३६:)) |
| ६ | | ,मत्स्यपालन | (०.४४:) |
| ७ | | दुग्धविकास | (६.६९ :) |
| ८ | | वनिकरण | (०.११:) |
| ९ | | गोदाम व मार्केट यार्ड | (०.१७:) |
| १० | | सुवर्ण जयंती स्वयंरोजगार योजना | (३.८०:) |
| ११ | | गैर—कृषी क्षेत्र | (२६.७५:) |
| १२ | | अनुसुचित जाती/जमाती कार्य योजना | (०.५६:) |
| १३ | | स्वयं सहायता समुह | (१५.४२:) |
| १४ | | इतर अन्य | (८.८४:) |

वरील तक्त्यानुसार असे म्हणता येईल की, एकूण रु.९८,९३६,२६ कोटी रु.उदिदष्टानुसार दीर्घ मुदत पुनर्वित कर्जाचे वाटप केले आहे.या पुनर्वित कर्ज वाटपाच्या टक्केवाढीचा विचार केल्यास सदरील कालखंडात सर्वात जास्त २६.७५ टक्के (रु.२६,४६९,३७ कोटी) गैर—कृषी क्षेत्र तर सर्वात कमी ०.११टक्के (रु.१०६.८२ कोटी) रक्कम वनीकरण विभागासाठी खर्च करण्यात आलेली रक्कम घेतो. तर इतर क्षेत्रासाठीची उदिदष्टानुसार एकूण दिर्घ मुदतीची पुनर्वित कर्ज वाटपाची टक्केवारी ८.८३असल्याची दिसून आली.

**ग्रामीण विकासातील नाबार्डचे मुल्यमापन**

शेती व ग्रामीण विकासाबाबत नाबार्डने महत्त्वाची कामगिरी पार पाडली आहे. शिखर बँक आणि पुनर्वित पुरविणारी संस्था या दोन्ही दृष्टीने नाबार्डने केलेले कार्य उल्लेखनीय आहे. नाबार्डमुळे ग्रामीण पतपुरवठा करणा—या संस्थांच्या कार्यात एकसुत्रीपणा निर्माण झाला. शेती, हस्तोद्योग, लहान उद्योग, कारागिरांचा व्यवसाय, कुटीरोद्योग इत्यादी क्षेत्रांना सवलतीच्या दराने पतपुरवठा झाला. पतपुरवठा करणा—या संस्थांमधील त्रुटी लक्षात घेउन त्या दूर करण्यासाठी नाबार्डने प्रयत्न केले. आर्थिक स्थिती सुधारत आहे. दीर्घकालीन पतपुरवठा करणा—या भूविकास बँकांची व्यवस्थापकीय कार्यक्षमता वाढविण्यासाठी नाबार्डने प्रयत्न केले आहेत. सरकारी पतसंस्थांना वेळोवेळी मदत व मार्गदर्शन करुन सहकारी पतपुरवठा व्यवस्था अधिकार सुदृढ बनविण्यात नाबार्डचे योगदान महत्त्वाचे आहे. वाढती थकबाकी हा ग्रामीण पतपुरवठा करणा—या सर्वच संस्थापुढील महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला आहे. कर्जाची परतफेड वेळेत होण्याच्या दृष्टीने नाबार्डने विविध स्तरावर अनेक योजना राबविल्या आहेत. त्याद्वारे कर्जाचे योग्य विनियोगातून शेती व ग्रामीण विकासासाठी

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

सवलतीच्या दराने पुरेसा व सुलभ पतपुरवठा करण्याच्या दृष्टीने नाबार्डची कामगिरी उल्लेखनीय आहे यात शंका नाही.

**निष्कर्ष**

ग्रामीण विकासात नाबार्डची भूमिका स्पष्ट केल्यानंतर आपणास पुढील निष्कर्ष काढता येतात.

१. नाबार्डच्या कार्यक्षेत्रात मुख्यत्वेकरुन कर्ज/पतपुरवठा उत्पादन व विक्रिविषयक योजना, ग्रामीण कारागीर, कमी भांडवलाचे उद्योग यांचाच समावेश होतो.

२. नाबार्ड हे केंद्रसरकार, राज्यसरकार व रिझर्व्ह बॅंक यांच्या आधीन राहून कार्य करते.

३. नाबार्डद्वारे अल्प व मध्यम मुदतीचा कर्ज पुरवठा हा नाबार्डनेच निवडलेल्या संस्थांनाच केला जातो.

४. नाबार्डने कृषीला केलेल्या एकूण पुनर्वित कर्ज वाटपाच्या टक्केवारीचा विचार केल्यास पीक कर्ज वाटपाच्या टक्केवारीत ६३.०६ टक्क्यावरुन ७१.६५टक्के एवढी वाढ झाली आहे. तर मुदत कर्ज वाटपाच्या टक्केवारीत ३६.९४ टक्क्यावरुन २८.३५ टक्के एवढी घट झाली असल्याचे दिसून येते.

५. नाबार्ड वितरीत केलेल्या कर्जामुळे आज ग्रामीण भागातील नवसुशिक्षित तरुण ग्रामीण भगातच विकास करताना दिसून येत आहे.

६. नाबार्डने आपल्या उद्दिदष्टनुसार दीर्घ मुदत पुनर्वित कर्जाचे वाटप केले आहे.या पुनर्वित कर्ज वाटपाच्या टक्केवारीचा विचार केल्यास सदरील रकमेतून दीर्घ मुदतीसाठीची सर्वात जास्त रक्कम ही गैर--कृषी क्षेत्रास देण्यात आली.तर सर्वात कमी वनीकरण विभागास देण्यात आली.

थोडक्यात, नाबार्डच्या पुनर्वित कार्याचा अभ्यास केल्यानंतर आपणास असे म्हणता येते की,नाबार्डचे ग्रामीण व कृषी विकासातील योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**संदर्भसूची**

१. सामाजिक संशोधन पद्धती — डॉ. सुधीर बोधनकर
२. Methods in Social Research – Good & Half
३. कृषी अर्थशास्त्र — डॉ.वसुधा पुरोहित
४. कृषी अर्थशास्त्र — डॉ. नीता वाणी
५. Indian Economy – Mishra & Puri
६. Shodhganga.Instribnet.ac.in
७. http//Maharasratimes.indiatimes.com
८. http//mr.wikipedia.org.

Shaikshnik Sanstha's ... Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

Special Issue, March 2019
International Multilingual Refereed Research Journal
AH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

## Indian Council And Social Science Research
(Western Regional Center,Mumbai)
And
## Jeevandeep Shaikshanik Sanstha
## Arts, Commerce & Science College, Khardi
Tq.Shahapur, Dist.Thane.
(Affiliated to Mumbai University)



Organized
**Two Day's Interdisciplinary National Conference on**

# Impact of Globalisation on Indian Tribal Community

On Dated : **01 & 02 March, 2019**

**Organized By**
Jeevandeep Shaikshanik Sanstha
**Arts, Commerce & Science College, Khardi,**
**Shahapur,Dist-Thane- 421601**

**Prof. D.M.Bhutale**
Convener

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

**Prof.K.R. Kalkate**
I/C. Principal

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचालित व मुंबई विद्यापीठ, मुंबई संलग्नित

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी, ता. शहापूर जि. ठाणे**

व इंडियन कॉन्सिल अँन्ड सोशल सायन्स रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## जागतिकारणाचा भारतीय आदिवासी समुदायावर पडलेला प्रभाव

**Patron**

**Hon. Ravindra Ghodvinde**

(President Of Jeevandeep Shaikshanik Sanstha)

Guest Editor

**Prof K R Kalkate**

HOD of Marathi Department & I/ C Principal

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal.shahapur Dist. Thane

**Prof D M Bhutale**

HOD of Sociology Department

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal. shahapur Dist. Thane

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra),Cell:07588057695,09850203295

harshwardhanpublication@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

65) आदीवासींच्या समस्या व शासकीय उपाययोजना
राजपूत विलास भरतसिंग, औरंगाबाद ||235

66) गोवेली ठाकुरपाडयातील आदीवासी समुदायाची शैक्षणिक स्थिती— एक चिकित्सक...
प्रा. भाग्यश्री गुलाब पवार, जि. ठाणे, महाराष्ट्र ||239

67) जागतिकीकरण आणि 'तळ ढवळताना' काव्यसंग्रहातील आदिवासी कविता
प्रा. आनंद वारके, जि. कोल्हापूर ||242

68) IMPACT OF GLOBALIZATION ON TRIBALECONOMY IN INDIA
Mr. Rahul Jadhav, Dist. Thane ||247

69) Tribal Development Programmes and Policies in India
Dr. Afroz Begum, Aurangabad ||251

70) आदिवासी समाजाच्या विकासात मानव अधिकारची भूमिका.....
डॉ. येसके नागनाथ दिगांबर ||255

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

३. शर्मा डी. डी. व गुप्ता एम. एल., भारतीय सामाजिक समस्याऐं, साहित्य भवन पब्लिकेशन, २००४.

४. गढवाल ए. ए., आदिवासींचे समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, २०१२.

५. पाटील के. जी. व कुलकर्णी ज्योती, चव्हाण बी. व्ही. व वाइकर ए. व्ही., समाजशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे.

६. साळुंखे सर्जेराव, समाजशास्त्रातील मुलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे.२, २००६.

७. कऱ्हाडे बी. एम. भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या, पिंपळापूरे प्रकाशन, २००९.

८. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, समाजशास्त्र, पूर्ण प्रकाशन, २०१३.

९. झा राजेशकुमार (संपादक), योजना (आदिवासी आणि वंचित समाज), जानेवारी २०१४.

१०. कच्छल दिपीका (संपादक), योजना (आरोग्य), फेब्रुवारी २०१६.

११. सिंह ब्रिजेश (संपादक), लोकराज्य, ऑगस्ट २०१६.

१२. www.wikipidea.com/ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती.

❑❑❑

66

# गोवेली ठाकुरपाडयातील आदीवासी समुदायाची शैक्षणिक स्थिती— एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. भाग्यश्री गुलाब पवार**
सह. प्राध्यापक, समाजशास्त्र,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली,
ता. कल्याण, जि. ठाणे, महाराष्ट्र

***********

**गोषवारा:—**

शिक्षण ही आजच्या काळाची गरज बनली आहे. शिक्षणाशिवाय मानवाचे जिवन हे पशुप्रमाणेच असेल. समाजाचा भाग असणाऱ्या आदीवासी समुदायानी देखिल शिक्षणाकडे वळणे अत्यंत गरजेचे आहे. या समुदायाची शैक्षणिक स्थिती जाणून घेऊन त्यांना शिक्षणाभिमुख बनविने ही सर्वाचीच नैतिक जबाबदारी आहे. हे लक्षात घेऊन गोवेली ठाकुर पाडयातील आदीवासी समुदायाची शैक्षणिक स्थिती—एक चिकित्सक अभ्यास हा विषय प्रस्तुत अभ्यासासाठी निवडला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी गोवेली ठाकुरपाडा गावात राहणारे लोक एकक म्हणून निवडण्यात आले आहेत व तथ्य संकलनासाठी मुलाखत व अनुसूचिचा वापर करण्यात आला आहे. या अभ्यासाअंती असे लक्षात आले आहे की, गोवेली ठाकुर पाडयातील लोंकामध्ये सध्या शिक्षणाचे महत्त्व रूजत आहे व आपण शिकलो नाही म्हणून मजुरी सारखी कामे करावी लागतात पण आपल्या मुलांनी शिकुन मोठे व्हावे ही अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या समुदायाच्या सर्वांगिण विकासासाठी कौशल्य विकास कार्यशाळा, रोजगाराभिमुख कार्यशाळा आयोतित केल्यास त्या आपल्या विकासाकडे वाटचाल करू शकतात.

**प्रस्तावना:—**

जेव्हा संपूर्ण सृष्टीचा विचार केला जातो तेव्हा

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist Thane, 421 601

सजिव सृष्टीमध्ये मानवानेच स्वत:च्या प्रगतीकडे वाटचाल केल्याचे दिसून येते. जंगल खोऱ्यात भटकणारा मानव ते अंतराळात वास्तव्य करण्यास प्रयत्नशिल असणारा माणूस यात मोठी तफावत दिसून येत आहे आणि हे फक्त शिक्षणामुळेच शक्य झाले आहे. शिक्षणामुळेच मानवाचे प्राण्यातून मानवी प्राण्यात रूपांतर झालेले दिसते.

व्यवहारामध्ये शाळेत जाण्याला शिक्षण म्हटले जाते, सध्याच्या समाजात शाळेत जाणे, साक्षरता, परिक्षा, पदव्या, ज्ञान, जिवनाला वळण लावणे यालाच शिक्षण म्हटले जाते पण शास्त्रीय अर्थाने पाहिल्यास शिक्षण म्हणजे विकसनशिल बदल होय. शिक्षणाची संकल्पना समजून घेण्यासाठी अनेक शास्त्रज्ञांनी सांगितलेल्या व्याख्या अभ्यासल्यास सोपे जाते. स्वामी विवेकानंद यांच्यामते शिक्षण म्हणजे सुप्तावस्थेत असलेल्या दैवी पूर्णत्वाचे प्रकटीकरण होय. तसेच म. गांधी यांच्यामते शरीर, मन व आत्मा यांचा सर्वांगिण विकास म्हणजे शिक्षण होय व रविंद्रनाथ टागोर यांच्यामते सर्व चराचर सृष्टीशी आपल्या जिवनाचा मेळ म्हणजे शिक्षण होय. थोडक्यात शिक्षण म्हणजे असे म्हणता येईल की, सुसंस्कार, चारित्र्यसंवर्धन, आत्मप्रकटीकरण, सर्वांगसुंदर जिवन जगण्याची तयारी, नैसर्गिक व सामाजिक वातावरणाशी समरस होण्याची पात्रता तसेच नैतिक व आध्यात्मिक मुल्यांचा संस्कार म्हणजे शिक्षण होय.

महाराष्ट्राची एकूण आदिवासी लोकसंख्या २०११ च्या जनगननेनुसार १०५.१० लाख म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ९.३५ टक्के असलेली दिसून येते तसेच महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ. कि. मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ. कि. मी. क्षेत्र आदीवासी उपाय योजनेखाली येते. एकाच विशिष्ट भूप्रदेशावर राहणारा, समान बोलीभाषा बोलणारा व समान सांस्कृतिक जिवन जगणारा पण अक्षर ओळख नसणाऱ्या स्थानिय गटाच्या समुदायाला गिलीन आणि गिलीन यांनी आदीवासी समाज म्हटले आहे. भारताप्रमाणेच महाराष्ट्रात देखिल आदीवासींच्या अनेक जाती जमाती आढळून येतात. कल्याण तालुक्यात देखिल आदीवासींच्या अनेक जमाती आढळतात त्यातील गोवेली ठाकूर पाडा या ठिकाणी ठाकर वस्ती आढळते. सुमारे १२७ लोकसंख्या असलेला हा पाडा आहे, ज्यात ६१ महीला व ६६पुरूष आहेत. हा पाडा ग्रुप ग्रामपंचायत गोवेली–रेवती हद्दीत मोडतो. राष्ट्रीय महामार्ग २२२ पासून एक किलोमीटरवर असणाऱ्या या पाडापासून दिड किलोमीटर अंतरावर महाविद्यालय असून हा पाडा शिक्षणापासून वंचित राहिलेला होता, परंतु शरद सोनावणे या प्राथमिक शाळेच्या शिक्षकाने या लोकांना शिक्षणाकडे वळवण्यासाठी विशेष प्रयत्न केले व बारा वर्ष वनविभागासोबत संघर्ष करून शाळेसाठी इमारत बांधण्यास जागा मिळविली. २०१२ साली या गावातील पहिली मुलगी इयत्ता ८ वीत गेली व त्यानंतर मुलींच्या सातवी नंतरच्या शिक्षणाला सुरवात झालेली दिसून येते. २०१५–१६ मध्ये या पाडयातील पहिली मुलगी दहावी झाली तर तिच मुलगी २०१७–१८ मध्ये बारावी झालेली आहे. या पाडयात संतोष हिंदोळे हा एकमेव मुलगा पदव्युत्तर असून तो सध्या बिर्ला महाविद्यालयात प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कार्यरत आहे. शिक्षणाचे महत्व हळू–हळू का असेना पण या लोकांमध्ये रूजताना दिसून येते.

**उद्दिष्ट** :— गोवेली ठाकुर पाडयातील आदीवासी समुदायाची शैक्षणिक स्थिती समजून घेणे.

**संशोधन आराखडा** :—प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आराखडा वापरण्यात आला आहे॰

**संशोधन नमुना** :—प्रस्तुत संशोधनात गुणात्मक व संख्यात्मक या दोन्ही (मिश्र पद्धतीचा) उपयोग करण्यात आला आहे॰

**नमुना आराखडा** :—

**(अ) संशोधन क्षेत्र** — प्रस्तुत संशोधनासाठी संशोधन क्षेत्र म्हणून ठाणे जिल्हयातील, कल्याण तालुक्या मधील गोवेली ठाकूर पाडा हे ठिकाण निवडण्यात आले आहे॰

**(ब) तथ्य संकलनाची स्त्रोते** — तथ्य संकलनासाठी प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमीक व द्वितीय या दोन्ही स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे॰

**(क) नमुना आकार** — प्रस्तुत संशोधनासाठी नमुना म्हणून गोवेली ठाकूर पाडयातील २५ कुंटुंबातील लोक निवडण्यात आले आहेत॰(या पाडयात एकूण २५ कुंटुंब राहतात.)



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

**(ड) नमुना तंत्र —** प्रस्तूत संशोधनासाठी साधा यादृश्चिक नमुना तंत्र वापरण्यात आले आहे.

**(इ) नमुना एकक —** नमुना एकक म्हणून फक्त गोवेली ठाकूर पाडयातील २५ कुंटुंबातील लोक निवडण्यात आले आहेत.

**तथ्य संकलनाची पद्धती :—**प्रस्तूत संशोधनात तथ्य संकलनासाठी मुलाखत व अनुसुची या पद्धती वापरल्या आहेत.

**तथ्य संकलनाची साधने :—** प्रस्तूत संशोधनात प्रश्नावलीचा साधन म्हणून उपयोग केला आहे.

**साधन आराखडा :—** प्रस्तूत संशोधनात चल कार्यरत आराखडा (ऑपरेशनल डिझाईन) व लेकल्स ऑफ मॅनेजमेंट (मिन, मिडीयन, मोड) साधन आराखडयात समाविष्ट आहे.

***विश्लेषन व चर्चा:—***

प्रश्नावलीच्या सहाय्याने कुंटुंबातील सदस्याची माहिती घेतली असता असे निदर्शनास आले की, संपूर्ण पाडयाची लोकसंख्या ही १२७ इतकी असून त्याप्रमाणे ६१ महिला व ६६ परूष आहेत. एकुण ८४ क हे अल्पशिक्षित आहेत, एक उच्चशिक्षित तर लोक अशिक्षित आहेत. या ४२ व्यक्ती हया तील जेष्ठ व्यक्ती आहेत. शिक्षणाचे महत्व या व्यक्तीच्या लक्षात आल्याने ते आपल्या मुलांना, वडांना शिक्षणासाठी प्रेरीत करीत आहेत.

कुंटुंबातील काही व्यक्तींनी अर्धवट शिक्षण डले आहे याची कारणे विचारली असता, वेगवेगळी णे समोर आली, कुंटुंबातील मोठया व्यक्ती हया रीसारखीच कामे करतात, कुंटुंबाला हातभार लागावा, ब चालावे म्हणून बरीचशी मुलं मजुरीकडे वळली हेत तर शाळेची फी भरता न येणे, सोबतीला कोणी णं यामुळे मुलींनी शाळा सोडली आहे तर काही च्या घरात कमावते कोणीही नसल्याने शाळा सोडुन हातात घेतलेले दिसते.

शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी कोणत्या जनांचा लाभ मिळतो का असा प्रश्न विचारला सता १०० टक्के उत्तरदात्यांनी त्यांच्या मुलांना यवृत्ती, मध्यान्न भोजन, दहावी पर्यत मोफत पुस्तके सायकल याच सुविधा मिळाल्याचे सांगितले. शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यास ज्या योजनांचा लाभ मिळाला आहे त्या संबंधी कुठून माहिती मिळवीली असे विचाले असता फक्त शाळाच अशी माहिती देते असे उत्तर देण्यात आहे.

तुमच्या दृष्टीकोनातून शिक्षण महत्वाचे आहे का ?

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| २५ (१००:) | ०० (००:) | २५ (१००:) |

उत्तर दात्यांना तुमच्या दृष्टीकोनातून शिक्षण महत्वाचे आहे का ? असे विचारले असता १०० टक्के उत्तर दात्यांनी शिक्षण महत्वाचेच आहे असे म्हटले.

शिक्षण का गरजेचे वाटते ?

| नोकरीसाठी | बौधिक विकासासाठी | समाजाला समजून घेण्यासाठी | फसवणूक होऊ नये म्हणून | एकूण |
|---|---|---|---|---|
| १४ (५६:) | ०१ (०४:) | ०३ (१२:) | ०७ (२८:) | २५ (१००:) |

उत्तर दात्यांना शिक्षण का गरजेचे वाटते ? असा प्रश्न विचारला असता ५६ टक्के उत्तर दात्यांच्या मते शिक्षण हे नोकरी मिळविण्यासाठी गरजेचे आहे असे वाटते तर फक्त ४ टक्के उत्तरदात्यांना बौधिक विकास साधण्यासाठी शिक्षण गरजेचे वाटते व २८ टक्के उत्तरदात्यांना आपली कोणी फसवणूक करू नये यासाठी शिक्षण आवश्यक वाटते तर १२ टक्के उत्तरदात्यांना समाजाला समजून घेण्यासाठी शिक्षणआवश्यक वाटते.

शाळेतून पोषक आहार नियमित मिळतो का ?

| होय | नाही | एकूण |
|---|---|---|
| २५ (१००:) | ०० (००:) | २५ (१००:) |

उत्तर दात्यांना शाळेतून पोषक आहार नियमित मिळतो का ? असे विचारले असता १००टक्के उत्तरदात्यांनी सकारात्मक उत्तर दिले.

पुर्वीच्या काळातील शिक्षण व आत्याच्या काळातील शिक्षण यात काही फरक जाणवतो का ? असे विचारले असता काही उत्तरदात्यांनी असे म्हटले की, पूर्वीची शिक्षण पध्दती ही खुपच चांगली होती. पूर्वी दुसरीच्या मुलांना वाचन, पाढे येत होते परंतु आता आठवी नववीच्या मुलांनादेखिल ते येत नाही. परंतु पूर्वी आर्थिक परिस्थिती ही शिक्षणाच्य आड येत होती आई वडील मजुरीला गेल्या नंतर घर सांभाळणं, लहान भावंडांना सांभाळणे या कामामुळे शिक्षण घेता

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist Thane 421 601
Jeevandeep ★ College

येत नव्हते. आपण न शिकल्यामूळे दुसऱ्यांकडे मजुरी करावी लागते याची त्यांना वाईट वाटते, आपल्या मुलांनादेखिल आपल्याप्रमाणे मजुरी करावी लागू नये यासाठी त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहीत करत आहोत. तसेच शाळेतून मिळणारे मध्यान्न भोजन, शिष्यवृत्ती यामुळे मुलं देखिल सध्याच्या काळात आकर्षित होतात.

**निष्कर्ष:—**

प्रस्तूत संशोधनात असे आढळून आले की, या आदीवासी समुदायासदेखिल शिक्षणाचे महत्त्व लक्षात आले आहे. सरकार, इतर सामाजिक संस्था यांनी या समुदायाच्या सर्वांगिण विकासासाठी कौशल्य विकास कार्यशाळा आयोजित केल्यास व त्यांना रोजगाराभिमुख शिक्षण दिल्यास हा गोवेली ठाकुरपाडा लवकरच प्रगतीकडे वाटचाल करू शकेल.

**संदर्भसूची:—**

www.wikipedia.org

https://tribal.maharashtra.gov.in/1062

प्रा. नाडगोंडे गुरूनाथ, भारतीय आदीवासी, कॉन्टीनेंटल प्रकाशन, विजय नगर पुणे, तृतीय आवृत्ती २००३

खातू गजानन, जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती मार्च २००१

प्रा. तोटरे मनोहर, सेट/नेट समाजशास्त्र पेपर. ३, विद्याभारती प्रकाशन, लातूर

❑❑❑

**67**

# जागतिकीकरण आणि 'तळ ढवळताना' काव्यसंग्रहातील आदिवासी कविता

प्रा. आनंद वारके
दूधसाखर महाविद्यालय बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर

***********

**उद्दीष्ट :**

जागतिकीकरणाचा आदिवासी जीवनावर झालेला परिणाम लहू कानडे यांच्या 'तळ ढवळताना' या काव्यसंग्रहातील कवितांच्या आधारे शोधणे.

**आदिवासी साहित्य प्रवाह :**

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, जनवादी, आदिवासी साहित्य असे विविध साहित्य प्रवाह निर्माण झालेले आहेत. मराठी साहित्याच्या मूळ धारेपासून वेगळे वाटणारे साहित्य निर्माण होऊ लागल्यानंतर व ते लक्षवेधी झाल्यानंतर असे विविध साहित्य प्रवाह निर्माण झाले आहेत.साधारणत: १९७० नंतर मराठी साहित्यात आदिवासी साहित्य प्रवाहाने जोर धरलेला दिसतो. प्रारंभी बिगर आदिवासी साहित्यिकांनी आदिवासींचे जीवन चित्रण केलेले दिसते. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणाच्या प्रसाराने विविध जाती जमातीतील सुशिक्षितांनी आपले अनुभव विश्व साहित्य मधून मांडायला सुरुवात केली.

**आदिवासी:**

आदिवासी म्हणजे काळे, नकटे, राक्षसी वृत्तीचे, चोरी करणारे असा समज प्रारंभीच्या मध्यमवर्गीय लोकांच्या साहित्यातून व्यक्त झालेला आहे. हा गैरसमज दूर करण्यासाठी प्रसंगी आदिवासीना बंड करावे लागले. आपले शोषण त्यांनी बंड करून थांबविण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**October-2019 Special Issue – 200**

## Cotemporary Problems in India and Remidies

**Guest Editor :**
Dr. R. V. Shikhare
Principal
R. B. Attal Arts, Science & Commerce College,
Georai, Dist. Beed (M.S) India

**Associate Editors -**
Mr. H. B. Helambe
Mr. B. S. Jogdand
Mr. R. B. Kale
Mr. S. S. Nagare
Mr. R. B. Pagore

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 65 | आतंकवाद : समस्या तथा नियंत्रण | संदीप गोरे | 261 |
| 66 | समकालीन हिंदी कविता में स्त्री संवेदना | संतोष नागरे | 265 |
| 67 | हिंदी लेखिकाओ के उपन्यासों में अभिव्यक्त स्त्री विमर्श | डॉ. सुनिल डहाले | 271 |
| 68 | कौसल्या बैसंत्री की आत्मकथा 'दोहरा अभिशाप' में दलित नारी जीवन | डॉ. रजनी शिखरे, अशोक उघडे | 275 |
| 69 | विनय मिश्र की ग़ज़लो में बाजारवाद | डॉ. रजनी शिखरे | 278 |
| 70 | वाहरू सोनवणे की कविताएँ ('पहाड हिलने लगा है' के संदर्भ में) | संतोष नागरे | 281 |
| | **मराठी विभाग** | | |
| 71 | पर्यावरण प्रशासन : काळाची गरज | डॉ. व्ही. पी. सांडूर | 287 |
| 72 | भारतीय लोकशाही मधील 'भ्रष्टाचार' एक प्रबळ समस्या | डॉ. अंकुशराव चव्हाण | 290 |
| 73 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | भाग्यश्री पानढवळे | 293 |
| 74 | बीड जिल्ह्यातील इमारत बांधकाम कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास | एस. ई. भोसले | 298 |
| 75 | नक्षलवाद एक सामाजिक समस्या : सामाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. दत्तात्रय भूताळे | 304 |
| 76 | शेतकरी आत्महत्या भारतीय समाजासमोरील अव्हान व उपाय योजना | टी. एस. बिडवे | 308 |
| 77 | नक्षलवादी चळवळीची विचारसरणी | डॉ. रजनी बोरोळे | 312 |
| 78 | भारतीय राजकारण आणि धर्म, जात, भाषा | डॉ. देविदास नरवाडे | 318 |
| 79 | मॉब लिचींग : एक गंभीर समस्या | डी.एन. रिठे | 321 |
| 80 | भ्रष्टाचार : एक विवेचन | डॉ. डी.के. ढास | 325 |
| 81 | दहशतवाद | डॉ. बी.एस.चव्हाण | 330 |
| 82 | मानसशास्त्र आणि दहशतवाद : एक आकलन | डॉ. अतुल पवार | 335 |
| 83 | भ्रष्टाचार : कारणे व उपाय | डॉ. भगवान वाघमारे | 338 |
| 84 | नक्षलवाद : भारतातील कडव्या साम्यवादी संघटनांची सशस्त्र चळवळ | डॉ. भारत बिचितकर | 342 |
| 85 | मराठवाड्यातील सिमांत शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाय | गोविंद काळे व दीपक भारती | 347 |
| 86 | शेतकरी आत्महत्या : कारणे आणि उपाय | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 350 |
| 87 | नक्षलवादी चळवळीची विचारधारा आणि व्यवहार | डॉ. एस. पी. घायाळ | 353 |
| 88 | मराठी कादंबरी आणि अर्थकारण : विशेष संदर्भ 'फेसाटी' | डॉ. गोविंद काळे | 359 |
| 89 | सामुहिक हिंसाचार | डॉ. विठ्ठल जाधव | 363 |
| 90 | ब्रिटिशांच्या कायद्याचा भारतीय समाजावर झालेला परिणाम | सचिन पांडव, डॉ. लक्ष्मीकांत जिरेवाड | 368 |
| 91 | वनतोडीमुळे उदभवणाऱ्या समस्यांचे अध्ययन (संदर्भ : पवन तालुक्यातील मिन्सी या गावातील कुटुंब) | ज्योती नाकतोडे | 373 |
| 92 | पर्यावरणविषयक मुद्दा | डॉ. काकासाहेब पोफळे | 389 |
| 93 | स्वयंसहाय्यता गट आणि सशक्तीकरण : एक अवलोकन | डॉ.संतोष काकडे | 383 |
| 94 | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | डॉ.काशिनाथ पल्लेवाड (सावळीकर) | 387 |
| 95 | सामाजिक समस्या आणि नव्वदोत्तरी मराठी कविता | डॉ. समिता जाधव | 390 |
| 96 | भारतातील दारिद्र्य | डॉ. शिवाजी पाते | 395 |
| 97 | जेष्ट नागरिकांच्या समस्यांचे सामाजिक निराकरण | डॉ. सुधीर येवले | 400 |
| 98 | भ्रष्टाचार : भारतीय समाजासमोरील एक ज्वलंत समस्या | डॉ. सुनंदा आहेर | 404 |
| 99 | पर्यावरण आणि भारतीय शेती | डॉ. योगेश पाटील | 409 |
| 100 | समकालीन राजकीय परिस्थिती आणि विरोधी पक्षाची भूमिका | डॉ. भुजंग पाटील | 412 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

# नक्षलवाद एक सामाजिक समस्या : समाजशास्त्रीय अभ्यास

**[redacted]. भुताळे दत्तात्रय**
**समाजशास्त्र विभाग**
जीवनदीप महाविद्यालय
खर्डी ता.शहापूर, ठाणे
Email ID-dmbhutale@gmail.com

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय समाजव्यवस्थेत काही गंभीर सामाजिक समस्या निर्माण झाल्या आ हेत. ज्यांचा संबंध सरळ-सरळ हिंसेशी आहे. या गंभीर समस्यात दहशतवाद आणि नक्षलवाद या दोन समस्यांचा आपणास समावेश करता येईल. देशाच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणारी प्रमूख समस्या म्हणून नक्षलवादाकडे पाहिले जाते. कारण देशात नक्षलवादी संघटनेने सुरक्षा व्यवस्थेला पूर्णत: वेशीवर टांगल्याचे आपणास दिसून येत आहे. देशात सतत हिंसक घटना घडत आहेत. आज देशात अंतर्गत सुरक्षेचा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. आज नक्षलवाद हा चिंतन व मंथन करण्याचा विषय बनलेला आहे. नक्षलवाद हा केवळ दुर्सग, डोंगराळ आणि आदिवासी बहुत भागातच फोफावला आहे असे नाही तर देशातील अनेक शहारामध्ये, महानगरांमध्ये उच्यशिक्षित तरुणामध्ये नक्षलवादाची पाळेमुळे रुजताना दिसून येत आहे.

नक्षलवादी संघटनामध्ये आदिवासी तरुण-तरुणी यांचा सक्रिय सहभाग मोठया प्रमाणावर दिसून येतो. त्यामुळे आदिवासींच्या जीवनावर नक्षलवादाचा परिणाम खूप मोठया प्रमाणावर झाल्याचे दिसून येत आहे. आदिवासींची पिळवणूक, आदिवासीवरील अन्याय या कारणाने आदिवासींनी नक्षलवादाचा मार्ग स्विकारला त्याच बरोबर आदिवासींच्या मानवी हक्काची होणारी पायमल्ली, गुलामगरीची अवस्था, उदरनिर्वाहाची हतबलता व कारणे देखील आदिवासींना नक्षलवादी संघटनाकडे आकर्षित करताना दिसून येते. आज देशातील काही राज्यांमध्ये नक्षलवादी दिसेने उग्र रुप धारण केलेले आहे. भारतीय लोकशाहीने स्विकारलेली स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि समानसंधी ही मूलतत्वे दिली असून देखील भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशात नक्षलवादाची चळवळ का निर्माण झाली हे शोधून काढणे आज गरज बनली आहे. या नक्षलवादी कारवायामुळे देशाचे आतोनात नुकसान झाल्याचे आपणास पहावयास मिळते आहे. आज ही समस्या पश्चिम बंगाल, ओरिसा, झारखंड, बिहार, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, छत्तीसगड आणि महाराष्ट्रात उग्र रुप धारण करीत आहे. गेल्याकाही कालावधीत नक्षलवादी चळवळीत महिलांचा देखील मोठया प्रमाणावर सहभाग वाढताना दिसून येत आहे. आज अशा नक्षलवादी चळवळीत महिलांचे प्रमाण ५०% एवढे आहे देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे स्वातंत्र्य नसून ते केवळ सत्तापरिवर्तन आहे असा विचार १९६० च्या दशकात मांडला गेला. याच विचाराने प्रेरित होऊन आपल्यावरील अन्याय धुडकाऊन लावण्यासाठी नक्षलवादी विचारांकडे वळू लागले आणि हाच विचार नक्षलवादाच्या उदयाचा केंद्रबिंदू बनला.

**नक्षलवादाची संकल्पना :**

नक्षलवाद ही भारतातील कडव्या साम्यवादी संघटनांनी चालविलेली सशस्त्र चळवळ आहे. गरीब शेतमजूर आणि आदिवासींच्या दुर्दशेस सरकारचे भांडवलशाही धोरण कारणीभूत असून त्याचा विरोध माओ ने दाखवून दिलेल्या सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच करता येईल ही नक्षलवाद्यांची विचारसणी आहे.

पश्चिम बंगाल राज्यातील नक्षलवादी गावात 'सोनम बांगडी' या पोलीस निरिक्षकाचा एक आदिवासी तरुणाच्या तीर कामठ्याने मृत्यु झाला होता. ज्याचे पर्यवसन आसाम फ्रंटियर रॅफल्सकडून जमावावर गोळीबार करण्यात आला. मे

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

ISSN : 2348-7143
October-2019

२५, १९६७ रोजी घडलेल्या या घटनेत ०७ महिला व ०४ बालकांचा मृत्यु झाल्यानंतर माओवादी कम्युनिष्ठ संघटनेने स्थानिक आदिवासींच्या मदतीने पश्चिम बंगाल सरकार विरुध्द सशस्त्र उठाव केला. मार्क्सवादी कम्युनिष्ठ पक्षाचे झालेले विभाजन व माओवादी तसेच लेनिनवादी गट बाहेर पडल्यानंतर उद्भवलेल्या संघर्षात देखील नक्षलवादाचे मूळ आहे असे मानले जाते. चारु मुजुमदार आणि कानू सन्यालप यांनी त्या उठावाचे नेतृत्व केले होते. मुजुमदारांनी १९६९ साली चळवळीची राजकीय आघाडी, कम्युनिष्ठ पार्टी ऑफ इंडिया ची स्थापना केली आणि नक्षलवादी चळवळीचा उदय झाला. नक्षलवादाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी काही मान्यवरांनी नक्षलवादाच्या परिभाषा स्पष्ठ केलेल्या आहेत त्या पुढील प्रमाणे-

१. सुहास पळशीकर नक्षलवादाच्या संदर्भात म्हणतात, "पश्चिम बंगालमधील १९६७ मध्ये जनता, कष्टकरी आणि शोषीत वर्गाच्या संघर्षात जहालवादी कृतीद्वारे प्रस्थापित वर्गाच्या ताकदीला आव्हान देण्याचा हा मार्ग नक्षलवादी चळवळ म्हणून ओळखली जाते."

२. "नक्षलवाद ही अशी हिंसक चळवळ आहे की, जी त्यांचा उद्देश साध्य करण्यासाठी बळाचा उपयोग करते आणि भीती निर्माण करते."

३. "हिंसेची धमकी हिंसेची कृती आणि हिंसेची मोहिम आखून भीती निर्माण करण्याच्या दृष्टिने आखलेली योजना म्हणजे नक्षलवाद होय."

आदिवासींची दिशाभूल करणे, त्यांना कायदेभंग आणि गुन्हे करण्यास प्रवृत्त करणे, त्यांना जमिन मिळवून देणे, आर्थिक मदत करणे, दाबदडपशाही करणे अशी नक्षलवाद्यांची कार्यप्रणाली आहे. म्हणजेच त्याचे वर्तन हे पूर्णतः सरकार विरोधी स्वरुपाचे असते. त्यांना असे वाटते की, हिंसक मार्गाच आपल्याला न्याय मिळवून देऊ शकतो.

**अध्ययन पध्दती :**

कोणत्याही संशोधकाला संशोधन करावयाचे असेल तर ते संशोधन वैज्ञानिक पध्दतीच्या आधारावरच करावे लागते. वैज्ञानिक पध्दतीमध्ये स्थित ज्या कांही संशोधनाच्या पध्दती असतील त्यातल्या कांही तंत्राचा किंवा घटकांचा अवलंब करुन संशोधन कार्ये पार पाडावे लागते. वैज्ञानिक पध्दतीशिवाय केलेले संशोधन हे संशोधन नसते तर ती केवळ माहितीचे संकलन असते. म्हणून प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी ऐतिहासिक कागदपत्रे, अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित, अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे इतर संशोधकांचे संशोधन इ. चा आधार घेण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत शोधनिबंधाचा सैध्दांतिक दृष्टिकोन मार्क्सवादी असून दृष्टिकोनातूनच अध्ययन समस्येचा अभ्यास करण्यात आला असून त्या आधारावरुन निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**अध्ययनाचे उद्देश :**

१. मार्क्सवादी दृष्टिकोनातून नक्षलवादाची संकल्पना समजून घेणे.
२. नक्षलवाद निर्मितीच्या कारणांचा अभ्यास करणे.
३. भारतीय समाज व्यवस्थेवर नक्षलवादाचा झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

**निर्वचनात्मक विश्लेषण :**

१. स्वातंत्र्यानंतर भारतात ज्या सामाजिक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यात प्रामुख्याने नक्षलवाद ही एक समस्या अस्तित्वात आली आहे आज देशात मोठ्या प्रमाणावर नक्षलवादी समस्या फोफावत असताना दिसून येत आहे. आज देशातील बहुतांश राज्यात नक्षलवादाने थैमान घातले आहे, पं.बंगाल, उत्तरप्रदेश, ओरिसा, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, झारखंड, बिहार, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, तेलंगाणा इ. ९ अशा आठरा राज्यात नक्षलवाद्यांने

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

आपलपे बस्तान मांडलेले आहे. नक्षलवाद ही एक हिंसक अंतर्गत सुरक्षेला खिळवून ठेवणारी समस्या आहे. नक्षलवादी चळवळीवर पूर्णतः मार्क्सवाद व लेनिनवादी विचार सरणीचा प्रभाव मोठया प्रमाणावर पडलेला आहे. ज्यापध्दतीने मार्क्सवादी विचार सरणीत आहे-रे-नाहिरे चा वर्ग आहे, त्यांच्यात जो भांडवलदार आणि कामगार वर्ग यांच्यातील जो संघर्ष झाला तो मार्क्सवादाच्या स्वरुपातून झाला नक्षलवादाची समस्या ही एक अशा संघर्षाच्या प्रेरणेतूनच निर्माण झाली आहे. १९६० च्या दशकात नक्षलवादाचे क्षेत्र हे केवळ आदिवासी भागापूर्तेच मर्यादित होते पण आधुनिक काळात या नक्षलवादी चळवळीची व्याप्ती मोठया प्रमाणावर वाढल्याची दिसून येते. यात आता आदिवासींच्या बरोबर उच्चशिक्षित तरुणांचा देखील समावेश होताना दिसून येतो. नक्षलवाद हा व्यक्तिवरील अन्याय, अत्याचार, पिळवणूक यामुळे ही चळवळ अस्तित्वात आली. जर आपल्यावरील होणारा जुलूम दूर करावयाचा असेल तर आपणास सशस्त्र मार्गाचा अवलंब करावा लागेल अशी या नक्षलवादी चळवळीची भूमिका आहे.

२. नक्षवादाच्या निर्मितीचे स्वरुप जर पाहिले तर आपणास असे दिसून येते की, कोणतीही सामाजिक चळवळ निर्माण होण्यासाठी तीची पार्श्वभूमी निर्माण होणे आवश्यक आहे. नक्षलवादी चळवळीची देखील खूप मोठी हिंसक पार्श्वभूमी असल्याची आपणास दिसून येते. नक्षलवादावर मार्क्स व लेनिन वाद्यांचा प्रभाव असल्या कारणांने त्यांना आपल्या मागण्या ह्या केवळ सशस्त्र उठावावरुनच साध्य करता येतील अशी त्यांची मनसा झ ाला आहे. त्यामुळे ते मुळता संघर्षवादी स्वरुपाचेच आहेत. ज्या आदिवासी समुदायाचे शोषण मोठया प्रमाणावर सावकार, जमिनदार, सामंत वर्गाकडून झाले. त्यांचा अमानवी छळ करण्यात आला, त्यांच्या जमिनी लुटलया गेल्या त्यांना त्यांच्या अधिकारापासून दूर करण्यात आले या सर्वांचा परिणाम म्हणून त्यांच्या मनात प्रतिशोधाची भावना बळावत गेली आणि नक्षलवादी चळवळीचा उदय झाला. आदिवासींचे हित असलेले आर्थिक शोषण दारिद्र्यात खीतपत पडलेले समाजजीवन प्रशासनातील वाढता भ्रष्टाचार, समाजव्यवस्थेत पसरलेली जातीव्यवस्था, सामाजिक असमानता, शासनाची पक्षपाती धोरण निती यामुळे या देशात नक्षलवादी चळवळीने मोठा आकार घेतलेला आपणास दिसून येतो.

३. नक्षलवाद हा देशातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेला खिळवून ठेवत असते. नक्षलवादामुळे देशात अनेक सामाजिक समस्या, प्रश्न निर्माण होतात. त्याचा परिणाम संपूर्ण समाज व्यवस्थेवर होताना दिसतो. देशात प्रचंड दहशतीचे वातावरण निर्माण होत असते. कोणतीही व्यक्ती सुरक्षीतपणे जीवन जगू शकत नाही. अशा नक्षलवादी संघटनेमुळे शासकीय कर्मचाऱ्यांवर मोठा दबाव येत असतो. सर्वसामान्यांचे मानसिक खच्चीकरण होत असते. नक्षलग्रस्त प्रदेशाचा विकास खुंटतो, सुरक्षा यंत्रणेवर मोठया प्रमाणावर ताण निर्माण होत असतो. अशा नक्षलवादी संघटनामुळे समाजाची जीवित व वित्त हानी मोठया प्रमाणे होत असते. देशातील लोकजीवनाचे संतुलन बिघडून अपहरणासारख्या घटनामध्ये वाढ होत जाते आणि नंतर खंडणी मागीतली जाते. सार्वजनिक मालमत्तेचे मोठया प्रमाणावर नुकसान घडून येत असते. देशात राष्ट्र्य एकात्मतेला मोठे हादरे बसत असतात. नक्ष्ज्ञलवादी चळवळीमुळे देशात कायदा व न्याय व्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. असे अनेकविध परिणाम नक्षलवादाच्या समस्येमुळे त्या देशातील सर्वसामान्य जनता प्रशासन व्यवस्था यांची कुंचबंना होत असते.

**अध्ययनाचे निष्कर्ष :**

१. नक्षलवाद हा स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या निर्माण झालेल्या सामाजिक समस्येपैकी एक समस्या आहे.
२. नक्षलवादी चळवळी ह्या केवळ आदिवासी भागातच निर्माण होतात असे नाही तर त्या शहरी भागात देखील दिसून येतात.

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 200 : Contemporary Problems in India and Remidies
ISSN : 2348-7143
October-2019

३. नक्षलवाद निर्माण होण्यासाठी प्रशासन व्यवस्थेतील भ्रष्ट अधिकारी यांचा मोठा वाटा आहे.
४. नक्षलवाद ही एक आत्मसन्मान प्राप्त करुन देणारी चळवळ आहे असे या लोकांना वाटते.
५. नक्षलवादामूळे समाजात आराजकता निर्माण होत असते.
६. शासनाच्या असमान धोरणामूळे नक्षलवादाची समस्या निर्माण होताना दिसून येते.
७. नक्षलवादी संघटनांना काही राजकीय संघटनांचे पाठबळ असते.
८. दारिद्र्य, बेकारी या समस्यांमूळे लोक नक्षलवादी चळवळीकडे वळतांना दिसून येत आहेत.
९. सामाजिक विषमता, आर्थिक विषमता यामुळे देखील देशात नक्षलवादाची समस्या निर्माण होत आहे.

**शिफारशी :**

१. जनसामान्यातून तसेच प्रशासकिय व्यवस्थेच्या मनातून नक्षलवादाच्या संदर्भातील पूर्वग्रह दुर करणे.
२. आदिवासींच्या विकासासाठी नवनवीन योजनांची आखणी करणे.
३. नक्षलवाद संपावयाचा असेल तर जमिन सुधारणा कायद्याची कडक अंमलबजावणी करणे.
४. अशा  भागात राष्ट्रीय एकात्मतेचे शिक्षण देणे.
५. नक्षलवादांशी सतत चर्चा व वाटाघाटी करुन त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणे.
६. आदिवासी समुदायाला आधुनिक समुदायाच्या प्रवाहात सामील करुन घेणे.
७. आदिवासी व नक्षलवादी भागात शिक्षण व आरोग्याच्या सुविधा पुरविणे.
८. नक्षलवादी भागात त्यांच्या विकासासाठी स्वतंत्र अशा विकासाच्या योजनांची आंमलबजावणी करणे.
९. समर्पीत झालेल्या नक्षलवाद्यांचे पूर्णवसन करणे.
१०. नक्षलवादी कार्यवाहीवर निमंत्रण ठेवण्यासाठी राज्यातील गुप्तचर यंत्रणा सक्षम करणे इत्यादी.

**संदर्भ :-**

१. डॉ. प्रदीप आगलावे, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर
२. श्रीराम निकम, गांधी आंबेडकर : अस्पृश्यमुक्ती संघर्ष लोकवाङ्मय गृह, मुंबई
३. घनश्याम शहा (अनुवादक-प्राची चिकटे) भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड प्रकाशन, पुणे
४. पी.सी. जैन, सामाजिक आंदोलन का समाजशास्त्र, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर
५. डॉ.एस.जी.देवगांवकर, सामाजिक चळवळी, परंपरागत व आधुनिक, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601 Jeevandeep

MUL 03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue, March 2019

International Multilingual Refereed Research Journal

Vidyawarta®

# Indian Council And Social Science Research

(Western Regional Center,Mumbai)
And

## Jeevandeep Shaikshanik Sanstha
## Arts, Commerce & Science College, Khardi

Tq.Shahapur, Dist.Thane.
(Affiliated to Mumbai University)



Organized

**Two Day's Interdisciplinary National Conference on**

# Impact of Globalisation on Indian Tribal Community

On Dated : **01 & 02 March, 2019**

**Organized By**
Jeevandeep Shaikshanik Sanstha
**Arts, Commerce & Science College, Khardi,**
**Shahapur,Dist-Thane- 421601**

**Prof. D.M.Bhutale**
Convener

**Prof.K.R. Kalkate**
I/C. Principal

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचालित व मुंबई विद्यापीठ, मुंबई संलग्नित

## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी, ता. शहापूर जि. ठाणे

व इंडियन कॉन्सिल अँन्ड सोशल सायन्स रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## जागतिकारणाचा भारतीय आदिवासी समुदायावर पडलेला प्रभाव

**Patron**

**Hon. Ravindra Ghodvinde**

(President Of Jeevandeep Shaikshanik Sanstha)

Guest Editor

**Prof K R Kalkate**

HOD of Marathi Department & I/ C Principal

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal.shahapur Dist. Thane

**Prof D M Bhutale**

HOD of Sociology Department

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal. shahapur Dist. Thane

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book P... rs / www.vidyawarta.com

Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Publication

March 2019
Special Issue



# Index

01) जागतिकीकरणाचा आंध आदिवासी जमातीवर पडलेल्या प्रभावाचा समाजशास्त्रीय ... ||12
प्रा. आकोशकर ई.उ., आ.बाळापुर

02) जागतिकीकरण आणि आदिवासी कविता ||17
प्रा.अरूण मारूती कासार, जि. ठाणे

03) जागतिकीकरण आणि आदिवासी समाज: एक समाजशास्त्रीय अध्ययन ||22
प्रा. भुताळे दत्तात्रय & प्रा. गगे सीमा, जि. ठाणे

04) आदिवासींच्या न्याय हक्काचा जाहीरनामा ||26
श्री. राहुल भगवान चव्हाण, जिल्हा. ठाणे

05) जागतिकीकरण आणि भारतीय आदिवासी अर्थव्यवस्था : समस्या आणि उपाय ||30
डॉ. सुरेश सोमनाथ देशमुख, पुणे

06) जागतिकीकरणाचा आदिवासींवरील परिणाम ||35
डॉ. दयानंद माधवराव गुडेवार, जि. लातूर

07) जागतिकीकरणाचा महाराष्ट्रातील आदिवासींच्या संस्कृतीवर झालेला परिणाम ||37
प्रा. चिंतामण धिंदळे, पनवेल

08) जागतिकीकरण आणि भारत ||41
दिपक शिरीष पाटील, जि. ठाणे

09) आदिवासी ठाकर जमात व जागतिकीकरण ||43
प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे, जि. ठाणे

10) जागतिकीकरण आणि भारतीय शेती ||45
डॉ. कुटे अजय प्रभाकर, जि. हिंगोली

11) जागतीकीकरणाचा भारतीय आदिवासीवरील परिणाम (Impact of Globalization on Indian Tribe) ||48
प्रा. डॉ. कृष्णा शेंडे, नांदेड

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

अधिकच खोल होताना दिसते.

४.आधुनिकता, जागतिकीकरणाच्या कचाटयात आदिवासी समाज तर उध्दवस्त होतोयच पण याबरोबरच त्यांच्या रूढी, परंपरा,श्रध्दा, संस्कृती,लोककला याही लोप पावत चालल्या आहेत.अनेक आदिवासी बोलीभाषा मृत होत आहेत.

५.आदिवासी कविता ही आदिवासींचे जल, जमीन,जंगल अशा अनेक प्रश्नांना व समस्यांना वाचा फोडते.

६.माहिती—तंत्रज्ञानाच्या युगात जग परिवर्तनाचा वेग प्रचंड आहे पण आदिवासी जमातीच्या विकासाचा वेग मात्र मंदच आहे याचा प्रत्यय काही कवितातून येतो.

७.जागतिकीकीरणाच्या रेटयात आजसुध्दा आदिवासींची नाळ मात्र निसर्गाशी,अरण्याशीच कायम जोडलेली आहे हे सुध्दा आदिवासी कविता सुचित करते.

**संदर्भ ग्रंथ —**

१.जागतिकीकरण आणि मराठी साहित्य — संपा.शरद गायकवाड आणि प्रा.सुनील शिंदे

२.आदिवासी मराठी साहित्य एक अभ्यास —डॉ.ज्ञानेश्वर वालेकर

३.मराठी वाङमयाचा इतिहास(खंड सातवा भाग पहिला)— महाराष्ट्र साहित्य परिषद

४.आंतरजाळ (Internet) वरील काही संदर्भ

❑❑❑

**03**

# जागतिकीकरण आणि आदिवासी समाज: एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा. भुताळे दत्तात्रय**
समाजशास्त्र विभाग,
जीवनदीप महाविद्यालय खर्डी, ता.शहापूर, जि. ठाण

**प्रा. गगे सीमा**
ग्रंथालय विभाग,
जीवनदीप महाविद्यालय खर्डी, ता.शहापूर, जि.ठाणे

**********

**प्रस्तावना:**

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये काही मोठे बदल घडुन आले. या बदलत्या अर्थव्यवस्थेलाच जागतिकीकरण असे नाव देण्यात आले आहे. जागतिकीकरण म्हणजे जगाच्या आर्थिक उत्क्रांतीची परमावधी असे मानले जाऊ लागले आहे. जागतिकीकरण, वैश्वीकरण हे वस्तूत: एकदुसऱ्याचे पर्यायवाची शब्द आहेत. परंतू दोन्ही शब्दाचा अर्थ एकच आहे. जागतिकीकरण ही संकल्पना १९८० नंतर अध्यनाचा विषय बनून जगाच्या *समोर आली आहे. जागतिकीकरणाची संकल्पना समजून* घेताना खूप मोठी अडचण निर्माण होत आहे. कारण काही विचारवंत जागतिकीकरणाचा संबंध हा उदारीकरण, खाजगीकरण या दोन्ही संकल्पनेशी जोडताना दिसून येत आहेत. काही मान्यवर जागतिकीकरण हे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, घटकांशी देखील जोडताना दिसून येत आहे. जागतिकीकरणाची संकल्पना विचारात घेतली तर आज भारतीय समाज पूर्णत: ढवळून निघाला आहे. यात प्रामुख्याने आदिवासी समाज देखील वंचीत राहिलेला नाही.

**जागतिकीकरणाची संकल्पना:**

जागतिकीकरण ही संकल्पना अधिक समजून



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

अमलात आणण्याचे ठरविल्यास भारताला सार्वजनिक उद्योगाने खाजगीकरण करावे लागेल, भारतात परकिय गुंतवणुकीस मान्यता द्यावी लागेल. परकीय चलनावर नियंत्रण ठेवणारे फेरा [FERA] सारखे कायदे रद्द करावे लागतील अशा सर्व घटनांची पुर्तता करूनच आपणास जागतिकीकरण हे कसे भारतीय तसेच आदिवासी समाजासाठी उपयुक्त आहे याचे विश्लेषण करता येईल. भारतीय समाजावर जागतिकीकरणाचा खुप मोठ्या प्रमाणावर सकारात्मक परिणाम झालेला आहे तो प्रभाव, परिणाम आपणास पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

I. जागतिकीकरणाचा जेव्हा १९९१ सालापासून स्विकार करण्यात आला, तेव्हापासून ते आजपर्यंत म्हणजेच आडीच ते तीन दशकात जागतिकीकरणामूळे भारतीय समाजात सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आल्याचे दिसून येत आहे. जागतिकीकरणामुळे औद्योगिकीकरणास चालना मिळालेली आहे. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियांमध्ये भारत सरकारने नवीन उद्योग उभारण्यास व सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगांचा विस्तार करण्यास परवानगी दिली. त्यामुळे अनेक भारतीय, तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांनी नवीन उद्योग उभारले. तसेच खाजगीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सार्वजनिक व सहकारी क्षेत्रांतील आजारी उद्योग, खाजगी उद्योजकांनी चालविण्यास घेतले आणि त्यामुळे या आजारी उद्योगांची उत्पादकता, कार्यक्षमता व गुणवत्ता सुधारली आहे. जागतिकीकरणाच्या धोरणात अंतर्गत व बहिर्गत वाहतुकीवरील अनावश्यक निर्बंध कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यटन व हॉटेल या उद्योगांना चालना मिळाली आहे. अशाप्रकारे जागतिकीकरणाने औद्योगिकीकरणास विकासात्मक चालना मिळाली आहे हे मात्र निश्चित.

II. जागतिकीकरणाचा सकारात्मक परिणाम म्हणून भारतात सर्व परकिय भांडवलदार, तंत्रज्ञान कंपन्या व तज्ज्ञ इत्यांदीना भारतात मुक्त प्रवेश दिलेला आहे. तसेच भारतीय उद्योजकांना आंतरराष्ट्रीय बाजारातून भांडवल उभारण्यास व त्यांच्या उत्पादनाची परकिय बाजारपेठेत अनावश्यक निर्बंधाशिवाय निर्यात करण्यास परवानगी दिलेली आहे. या धोरणामुळे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निकोप स्पर्धा निर्माण होण्यास चालना मिळाली. थोडक्यात बाजारपेठेचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येतो. जागतिकीकरणामुळे निर्यातीवरील निर्बंध काढून टाकल्यामुळे तसेच निर्यात कर देखील खूपच कमी केल्यामुळे वाहने, तयार कपडे, गालिचे, हिरे, रसायने, इलेक्ट्रॉनिक्स, सॉफ्टवेअर इत्यादी तसेच जीवनावश्यक उत्पादने, तांदूळ, गहू, साखर, चहा, कॉफी, फळे, फुले, काजू इत्यादी कृषी उत्पादनाच्या निर्यातीत वाढ झाली आहे. परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम दिसून येऊन अर्थव्यवस्थेचा विकास झाला.

III. जागतिकीकरणाच्या स्विकारामुळे भारताचे निर्यात क्षेत्र देखील मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. जागतिकीकणाचा स्विकार करण्या अगोदर म्हणजेच १९९१ च्या पूर्वी भारत केवळ पाच ते सहा देशाबरोबरच आपले आर्थिक व्यवहार करत होता. पण. जागतिकीकरणामुळे भारताचे निर्यात क्षेत्राचा विस्तार मोठ्या झपाट्याने झालेला आहे. आज साऱ्या विश्वातील जवळपास १९० राष्ट्रात भारत सुमारे ७५०० वस्तू निर्यात करीत आहे. त्यामुळे आपली अर्थव्यवस्था अधिक बळकट झालेली पाहवयास मिळते आहे.

IV. जागतिकीकरणाच्या धोरणाचा स्विकार केल्यामुळे भारतातील सेवाक्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येतात. आज सेवाक्षेत्राचा विस्तार मोठा अवाकीसवा वाढला आहे. वाहतुकिच्या क्षेत्रात खाजगी क्षेत्राने गुंतवणूक देखील वाढलेली आपणास पाहावयास मिळते आहे. भारतीय बॅंकांना व वित्तसंस्थांना त्यांच्या कार्यात स्वातंत्र्य व स्वाय्यत्तता दिली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीकरण, श्रमशक्तीचे विकेंद्रिकरण, खाजगी तसेच परकीय कंपन्यानी निर्माण केलेली स्पर्धा यामुळे पुरवल्या जाणाऱ्या सुविधामध्ये खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा 'झाली आहे. तसेच रेल्वे, बंदरे, जलवाहतूक इत्यादी क्षेत्रांत झालेली सुधारणाही जागतिकीकरणाचा सकारात्मक प्रभाव दर्शवीत आहेत.

V. आज आपल्या देशात जागतिकीकरणाचा इतक्या मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे कि, या प्रक्रियेत आयात कराचे दर कमी झाल्याने भारतीय बाजारपेठेत परकीय देशांतील अनेक दर्जेदार वस्तू मुबलक प्रमाणावर व वाजवी किंमतीत सहज उपलब्ध झाल्या आहेत.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अनावश्यक करावर निर्बंध लादण्यात आल्याचे दिसून येते. पण जागतिकीकरणामुळे ग्राहक हा राजा बनला आहे. जागतिकीकरणामुळे रोजगारांच्या संधी देखील मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेल्या आपणास दिसून येतात. उद्योग, व्यापार, व्यवस्थापन, दळणवळण, शिक्षण, माहिती तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. आज उच्चशिक्षित भारतीय तरूणांना देशात व विदेशातही आकर्षक नोकऱ्या मिळू लागल्या आहेत.

VI. **Globalization is a Global Precess** आहे. कारण जागतिकीकरणात सर्वच क्षेत्राचा समावेश होत असतो. जागतिकीकरण हे केवळ आर्थिक घटकावरच अवलंबून राहत नाही तर ते सामाजिक, सांस्कृतीक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्वच घटकांचा त्यात समावेश होत असतो. जागतिकीकरणामुळे अनेक समाज एकमेकांच्या सानिध्यात आल्याचे आपणास पाहावयास मिळतात. त्यामुळे त्यांच्या सांस्कृतीक जीवनाचा स्विकार सहजपणे करताना दिसून येत आहे. त्यांची संस्कृती, राहणीमान, एकंदरीत जीवन पध्दतीचा स्विकार आपण या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत करत असतो. त्यामुळे एकमेकांच्या प्रथा, परंपरा, नितीमूल्य यांचा देखील प्रभाव भारतीय मानव जीवनावर पडताना दिसून येतो. भारताने देखील जगातील इतर राष्ट्रात आपल्या संस्कृतीची छाप पाडल्याचे दिसून येत आहे. म्हणून जागतिकीकरणाची प्रक्रिया ही भारतीय जीवनामानात सकारात्मक असल्याचीच पहावयास मिळते हे मात्र निश्चित.

**जगतिकीकरणाचा आदिवासी समुदायावरील झालेला परिणाम:—**

जगतिकीकरणाचा आदिवासीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर फार मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते. कुटुंब, व्यवसाय, विवाह, स्त्री—पुरूष संबंध इ. सामाजिक घटकांवर मोठा प्रभाव पडत असल्याचे दिसून येते. ग्राहकवादाच्या प्रभावातून आदिवासी समुदायातदेखील आज नवसमाज आकार घेत असल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे आदिवासी समाजाच्या सांस्कतिक आकृतीबंधात मोठे सकारात्मक बदल होताना दिसून येत आहेत.

आदिवासी समुदाय हा पूर्वी एकांतात राहणारा समुदाय म्हणून ओळखला जात होता. परंतू जागतिकीकरणामुळे जगातील इतर देशांप्रमाणे भारतातील व्यापापेठा खूल्या झाल्या याचाच परिणाम भारतात औद्योगिकीकरण वाढले व हळूहळू आदिवासी समुदाय हा प्रगत समाजाच्या संपर्कात येऊ लागला आणि आज तर आदिवासी समुदाय हा बऱ्याच प्रमाणात प्रगत झाल्याचे दिसून येते. याचे शिक्षण जसे महत्वाचे कारण आहे तसेच जागतिकीकरण हे देखिल एक कारण आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. आज भारतीय आदिवासी समुदाय हा ग्रामीण व शहरी समाजाच्या खूपच जवळ आलेला असल्याचे दिसून येत आहे. हा समाज शिक्षणासाठी शहरी भागात येऊ लागला आहे. त्यांचा संबंध शहरी भागातील समाजव्यवस्था, सांस्कृतिक व्यवस्था, शिक्षण व्यवस्था अशा अनेक घटकांशी त्यांचा संबंध येत आहे त्यामुळे शहरी समाज व आदिवासी समाज यांच्यातील दुरी कमी झाल्याची आपणास पाहावयास मिळत आहे.

आदिवासी समाजाची पुर्वी असलेली 'पोटा पुरते मिळवणे' ही अर्थव्यवस्था मात्र या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत राहिलेली नसून त्यात मोठे परिवर्तन झाले आहे. पूर्वी आदीवासी समुदाय जंगलातील कंदमुळे खाऊन आपला उदरनिर्वाह करायचा पण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अनेक नव कारखानदारी व्यवस्था निर्माण झाली, त्यामुळे तो त्या ठिकाणी कामासाठी जाऊ लागला परिणामी त्याच्या आर्थिक जीवनात देखील बदल घडून आले. आज आदिवासी समुदाय एका विकासाच्या वाटेवर असल्याचे आपणास दिसून येत आहे. या समाजात ज्या अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा पूर्वी होत्या त्या आज बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याचे दिसून येते, त्याचबरोबर जागतिकीकरणामुळे आदिवासी समुदायाला इतर समुदायांच्या संपर्कात येण्यास मदत झाली असेच म्हणावे लागेल.

**निष्कर्ष:—**

जागतिकीकरणामुळे आदिवासी समुदायावर काही प्रमाणावर प्रतिकूल परिणाम देखील पडला आहे. त्यामध्ये महत्त्वाचे म्हणजे आदिवासींच्या प्राचीन



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

संस्कृतीवर घाला घालण्यात आला आहे. त्यांची विवाह पध्दती, जीवनीध्दती, शेती करण्याची पध्दत यासारख्या बऱ्याच प्रथा, परंपरा आज हद्दपार झाल्याच्या दिसून येत आहेत. त्यांचे उन्त्रभ्रु समाजांकडून साहित्य देखील चोरी होत आहे. परंतू या सर्व बाबींपेक्षा आदिवासी समाजाचा जागतिकीकरणामुळे फायदाच झाला हे मात्र निश्चित. त्यामुळे आज या समाजाच्या संदर्भात जागतिकीकरणाच्या फायद्या–तोट्याची कितीही चर्चा झाली तरी या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आदिवासी समुदाय मानवी जीवनाच्या मुख्य प्रवाहात आला आहे. हाच जागतिकीकरणाचा सकारात्मक बदल आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ:–**

१. सामाजिक संशोधन पध्दती — डॉ. प्रदीप आगलावे
२. भारतीय आदिवासी — डॉ. गुरूनाथ नाडगौडे
३. जगतिकीकरणाची प्रक्रिया — (दै. लोकसत्ता, २५ जानेवारी २०१६)(संपत बोडुवार)
४. कृषी अर्थशास्त्र — डॉ. वसुधा पुरोहित
५. भारतीय अर्थव्यवस्था — प्रा. एन. एल. चव्हाण
६. आदिवासींचे समाजशास्त्र — डॉ. माणिक माने
७. विकासाचे समाजशास्त्र — डॉ. कालिदास भांगे
८. Shodhganga.inflibnet.ac.in
९. Current Global reviewer Special Issue – 10 February 2018.

❑❑❑

**04**

# आदिवासींच्या न्याय हक्काचा जाहीरनामा

**श्री. राहुल भगवान चव्हाण**
मराठी विभाग प्रमुख,
विद्या प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किन्हवली, ता. शहापूर, जिल्हा. ठाणे

***********

डॉ. संजय लोहकरे यांचा 'आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा' हे ९ ऑगस्ट २०१७ रोजी प्रकाशित झालेले एक दीर्घकाव्य आहे. कवी आजच्या लोकशाहीत आदिवासींचे आदिम संदर्भ बुजले असल्याचे म्हणतो आहे. आदिवासींसाठी विविध योजना सवलती आहेत; परंतु त्यांचा लाभ आजही त्यांना मिळत नाही. दुसरीच माणसे त्या सवलती लाटत आहेत. आदिवासींसाठी आशेची किरणे दाखवली जात आहेत. प्रत्यक्षात मात्र सरकारही त्यांच्या विकासासाठी अनुस्थायी आहे. याचा प्रत्यय कवी मनाला येतो.

योजनाचं हे पीक आत वारेमाप वाढलंय
त्यावर पोसतात राज्यकर्त्यांची
कुत्री मांजरं गेंडे डुकरं (पृ. ४६)

आमच्या योजनांना बळकावून गलेलठ्ठ झालेले राज्यकर्ते पाहून आता हे सर्व थांबायला पाहिजे. यासाठी क्रांतीची, विद्रोहाची भाषा बोलल्याशिवाय गत्यंतर नाही. कवी म्हणतो.

आता आपणंही काढा तिरकमठा धनुष्य
तळपत्या तलवारी धाऱ्या फरश्या गलोली गोफणी
माजलेल्या गेंड्या कुत्र्या मांजरांना
दाखवा एकदा बंड (पृ. ४६)

बिरसा मुंडा आणि राघोजी भांगराचा पारतंत्र्यातील इतिहास आमच्या पाठीशी असतांना आम्ही स्वातंत्र्यानंतर षंढ का झालो ? असा सवाल कवी विचारतो आहे.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

Special Issue, March 2019
International Multilingual Refereed Research Journal
AH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

## Indian Council And Social Science Research

(Western Regional Center,Mumbai)
And

## Jeevandeep Shaikshanik Sanstha

## Arts, Commerce & Science College, Khardi

Tq.Shahapur, Dist.Thane.
(Affiliated to Mumbai University)



Organized

**Two Day's Interdisciplinary National Conference on**

# Impact of Globalisation on Indian Tribal Community

On Dated : **01 & 02 March, 2019**

**Organized By**

Jeevandeep Shaikshanik Sanstha

**Arts, Commerce & Science College, Khardi,**

**Shahapur,Dist-Thane- 421601**

**Prof. D.M.Bhutale**
Convener

**Prof.K.R. Kalkate**
I/C. Principal

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts,Com.& Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचालित व मुंबई विद्यापीठ, मुंबई संलग्नित

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी, ता. शहापूर जि. ठाणे**

व इंडियन कॉन्सिल अँन्ड सोशल सायन्स रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# जागतिकारणाचा भारतीय आदिवासी समुदायावर पडलेला प्रभाव

**Patron**

**Hon. Ravindra Ghodvinde**

(President Of Jeevandeep Shaikshanik Sanstha)

Guest Editor

**Prof K R Kalkate**

HOD of Marathi Department & I/ C Principal

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal.shahapur Dist. Thane

**Prof D M Bhutale**

HOD of Sociology Department

Jeevandeep Shaikshanik Sanstha

Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal. shahapur Dist. Thane

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Jeevandeep Shaikshanik Sanstha's Arts, Commerce & Science College ★ Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

52) आदिवासी समुदायाची ओळख
अभिषेक बाळू जाधव, पुणे ||192

53) जागतिकीकरण आणि आदिवासी कविता
डॉ. अलका शिंदे (पवार), Shahad (W). ||196

54) जागतिकीकरणआणि स्त्रीवादीसाहित्य
श्री. तुषार प्रकाश भोसले, पुणे ||200

55) जागतिकीकरण संकल्पना आणि परिणाम — समाजशास्त्रीय अध्ययन
डॉ. ज्योती अरविंद पोटे, अंबरनाथ ||202

56) जागतिकीकरणाचा भारतीय जमातींवरील विविध परिणामांच्या संबंधित साहित्याच्या ...
डॉ.सौ. सीमा नरेश परटोले & प्रा. अश्विनी पाटील, ता. भिवंडी ||207

57) जागतिकीकरण आणि कंवर आदिवासी जमात
सौ. जयश्री अभिमन्यू डंके, पुणे ||212

58) जागतिकीकरण आणि आदिवासी मराठी कविता
प्रा. कैलास कळकटे., जि. ठाणे ||215

59) जागतिकीकरण आणि आदिवासी समाजातील चळवळ
प्रा. कांबळे रावसाहेब हरिबा, औरंगाबाद ||218

60) जागतिकीकरण आणि आदिवासी मराठी साहित्य
प्रा. संजय तुकाराम निचिते, जि. ठाणे ||220

61) शहापूर तालुक्यातील आदीवासी जमातींवर जागतिकीकरणाचा झालेला परिणाम ...
प्रा. विशाल संपत भोसले, जि. ठाणे ||224

62) आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा : एक समाजशास्त्रीय अध्ययन
डॉ.श्वेतांबरी पी. कनाकेदांडे & मोहिनी प्र.कनकदंडे, नांदेड ||228

63) जागतिकीकरणाचा आंध्र अदिवासीवर झालेला परिणाम
कु. आरती बस्वराज शेटटी, पुणे ||230

64) जागतिकीकरण : आदिवासी साहित्य
रश्मी शेटये — तुपे ||233



www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Jeevandeep Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

61

# शहापूर तालुक्यातील आदीवासी जमातींवर जागतिकीकरणाचा झालेला परिणाम : एक संक्षिप्त आढावा

**प्रा. विशाल संपत भोसले**
जिवनदिप शिक्षणसंस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी, ता. शहापूर, जि. ठाणे

***********

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात विकासाच्या परीभाषा बदलत चालल्या आहेत. अधिकाधिक विकास करण्याच्या उद्देशाने जगातील प्रत्येक देश प्रयत्नशील असल्याचे दिसते. विशेषत: व्यापार व उद्योगाच्या क्षेत्रात मोठा क्रांतीकारक बदल होतांना दिसतो. उद्योगांमार्फत उत्पादीत झालेल्या वस्तु अथवा उत्पादने स्वदेशातच नव्हे तर परदेशातही विक्रीसाठी निर्यात केल्या जात आहे. यामुळे देशांचा एकमेकांशी व्यापार वाढून केवळ आर्थिक नव्हे तर सामाजीक, सांस्कृतीक देवाण—घेवाण देखील वाढलेली आढळते.

जागतीकीकरणानंतर जगातील देशादेशांत एक प्रकारची सामाजीक— सांस्कृतिक देवाण, घेवाण वाढली आहे. या देवाण—घेवाणीचा परीणाम म्हणुन अनेक देशातील सामाजिक—सांस्कृतीक वातावरण बदललेले दिसते. जागतीकीकरणाचा देशात संमीश्र परीणाम म्हणजे अनुकूल व प्रतीकूल असे दोन्ही स्वरूपाचे परीणाम झालेले आढळतात. विशेषत: ग्रामीण आदिवासी समाजावर झालेला जागतीकीकरणाचा असा परीणाम प्रामुख्याने जाणवतो.

सदर प्रबंधात ठाणे जिल्हयाच्या शहापूर तालुक्यातील आदिम जमातींवर जागतीकीकरणाच्या झालेल्या परीणामांवर भाष्य केलेले आहे. तसेच या संदर्भात काही सुचना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :**

महाराष्ट्राच्या ठाणे जिल्हयात पूर्वेस मुंबई शहरापासून ९० किमी व ठाणे शहरापासून ४५ किमी अंतरावर असलेला तालुका शहापूर होय. ठाणे जिल्हयातील सर्वात मोठा व आदिवासींची जास्त संख्या असल्याने आदिवासी तालुका म्हणून शहापूर तालुक्यास ओळखले जाते. या तालुक्याचे एकुण क्षेत्रफळ सुमारे १,५४,२७० हेक्टर म्हणजे सुमारे १९३९ चौरस किमी असुन विस्तार १९°२७ उत्तर व ७३°२० पूर्व ते १९°४५ उत्तर व ७३°३३ पूर्व आहे. तर समुद्रसपाटीपासून उंची सुमारे ४६ मीटर ( १५१ फूट ) इतकी आहे.




शहापूर तालुक्याच्या उत्तरेस मोखाडा, ईशान्येस इगतपूरी, पूर्वेस अकोला, दक्षिण व अग्नेयेस मुरबाड, नैऋत्येस कल्याण, पश्चिमेस भिवंडी व वायव्येस वाडा या भागांचा समावेश होतो.

सहयाद्रीच्या पर्वत रागांनी वेढलेल्या या तालुक्यात माहुली हे सर्वात उंच ठिकाण असुन त्याची सरासरी उंची २,८१५ फुट इतकी आहे. येथील सरासरी तापमान ३०° से. व सापेक्ष आर्द्रता सुमारे ७०: इतकी आहे. भातसा, तानसा, वैतरणा या प्रमुख नद्या व त्यांच्या उपनद्या तालुक्यातुन वाहतात.

शहापूर तालुक्यात एकूण ६ शहरे व २२५ गावे असुन प्रशासकीयदृष्टया त्यांना ५ मंडळ विभाग व ३० तलाठी सज्जेवरीत विभागले आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार तालुक्याची एकूण लोकसंख्या ३,१४,१०३ असून त्यात १६०,४६६ पुरूष व ६४,९२४ स्त्रियांचे प्रमाण आहे. तालुक्यात दर हजारी पुरूषांमागे ९५७ स्त्रिया या प्रमाणात स्त्री—पुरूष प्रमाण आढळते. तर सरासरी साक्षरतेचे प्रमाण ७३.९३: इतके आढळते.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

मुंबई—आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ या
लुक्यातून जातो. तसेच या ठिकाणी रेल्वे सुविधाही
पलब्ध असुन कसारा हे मध्यरेल्वेचे अंतिम उपनगरीय
ानक आहे.

**शोधनाची उद्दीष्टे :**

१) जागतीकीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे.

२) आदिम समाजाची संकल्पना स्पष्ट करणे.

३) जागतीकीकरणाचा आदिम समाजावरील
रिण ंवर चर्चा करणे.

**शोधन पद्धती :**

सदर शोध निबंधासाठी दुय्यम स्वरूपाच्या
धनांद्वारे माहीती संकलीत केली असुन पुस्तके,
सीके, वृत्तपत्रे, इत्यादींचा उपयोग केला आहे. तसेच
वीध शासकीय संकेत स्थळांचा देखील उपयोग
केला आहे. प्रभावी सादरीकरणाकरीता नकाशे, तक्ते
माध्यमांचा वापर केला आहे.

**हितके :**

१) शहापूर तालुक्यातील आदिम जमातींवर
गतीकीकरणाचा परीणाम झालेला आहे.

२) शहापूर तालुक्यातील आदिम समाजाच्या
र्थिक, सामाजीक व सांस्कृतिक वातावरणात बदल
लेला आहे.

**विवेचन :**

शहापूर तालुक्यातील आदिवासी जमातींवर
ातीकीकरणाचा झालेला परीणाम अभ्यासण्यापूर्वी
ातीकीकरण व आदिम जमाती या संकल्पना समजुन
आवश्यक आहे.

**ातीकीकरण :**

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात
ातीक अर्थव्यवस्थेत मोठे बदल घडुन आले.
ारणत: १९८५ नंतर या बदलास वेगाने सुरूवात
ी व परीणामी सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेवर मुलगामी
णाम झाले. यास जागतीकीकरण असे संबोधले
. सामान्य भाषेत जगातील विवीध राष्ट्रीय
व्यवस्थांना परस्पर जोडणारी, त्यांच्यात वस्तु—सेवा,
वल, तंत्रज्ञान, श्रमशक्ती यांचा मुक्त प्रवाह सुरू
याची एक प्रक्रीया म्हणजे 'जागतीकीकरण' होय.
ातीकीकरणाच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे

१) ''जगातील राष्ट्रीय अर्थव्यवस्थांना एका आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा अभिन्न भाग बनविण्याचे धोरण म्हणजे जागतीकीकरण होय.''— प्रा. जगदीश भगवती.

२) ''भांडवल, वस्तू, तंत्रज्ञान, विचार आणि लोक यांचा मुक्त संचार म्हणजे जागतीकीकरण होय. यापैकी 'लोक' हा घटक वगळला गेल्यास ते जागतीकीकरण निरंतर न ठरता अपूर्ण ठरेल.'' — प्रा. ब्रोको मिलॅनोव्हिक

थोडक्यात जागतीकीकरण म्हणजे जगातील मुक्त अर्थव्यवस्थेची रचना होय. ज्यात व्यापाराकरीता कोणत्याही प्रादेशिक सीमांचे बंधन अडसर ठरत नाही. व्यापाराचे जागतीक स्तरावरील स्वातंत्र्य म्हणजे जागतीकीकरण होय.

**आदिम जमाती :**

आदिवासी अथवा आदिम या शब्दाचा अर्थ मुळ निवासी असा होतो. जगातील अतिशय दुर्गम, जंगलांच्या व डोंगराळ दऱ्याखोऱ्यांच्या प्रदेशात वर्षानुवर्षे विकसीत समाजापासुन दुर असलेला दुर्लक्षीत समाज हा आदिवासी समाज म्हणुन ओळखला जातो. या समाजाची स्वत:ची अशी खास वैशिष्टयपूर्ण भाषा, संस्कृती, परंपरा, श्रद्धा, व्यवसाय पहावयास मिळतात. आर्थिक, सामाजीक विकासाच्या दृष्टीने असा समाज मागासलेला आढळतो.

**शहापूर तालुक्यातील आदिवासी समाज व जागतीकीकरण :**

शहापूर तालुक्यात आदिम समाजाची संख्या फार जास्त आहे. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ३५.७% लोकसंख्या ही आदिम आहे. त्यामुळे हा तालुका 'आदिवासी तालुका' म्हणुन ओळखला जातो. तालुक्यात वारली, कातकरी, महादेव कोळी, भिल्ल, पारधी, कोकणा, धोंडीया, ठाकूर या सारख्या आदिवासी जमाती वास्तव्य करतात. या प्रत्येक जमातीची स्वतंत्र अशी ओळख आहे.

**शहापूर : जातीनीहाय लोकसंख्या**

| जात | एकूण | पुरूष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| SC | [illegible] | ९,२१८ | ८,८९० |
| ST | [illegible] | ५६,५७४ | ५५,५८९ |

प्रदेशातील आदिवासी हे दुर्गम—दऱ्या खोऱ्यांच्या वा घनदाट अरण्यांच्या प्रदेशात राहतात. संपूर्णत: निसर्गावर अवलंबून असल्याने त्यांचे व्यवसाय घरांची रचना व घरबांधणी साहित्य, पोशाख, अन्न इतकेच काय तर भाषा, संस्कृती, श्रद्धा, रितीरिवाज यावर देखील निसर्गाचा मोठा प्रभाव आढळतो. त्यामुळे विकसीत समाजापेक्षा त्यांचे वैशिष्टयपूर्ण अस्तीत्व पहावयास मिळते.



परंतू अलिकडील काळात जागतीकीकरणाचा परीणाम म्हणून या समाजाचा विकसीत समाजाशी संपर्क वाढला आहे. परिणामी सुख सुविधांबरोबरच आचार—विचारांत व एकूणच आर्थिक, सामाजिक—सांस्कृतीक वातावरणात बदल घडुन आल्याचे आढळते. यामुळे एकीकडे हा समाज विकसीत होत चालला आहे तर दुसरीकडे देशाचा एक वैशिष्टपुर्ण समाजिक, सांस्कृतीक



ठेवा प्रभावीत होत चालला आहे. उदा.वारली समाज व त्यांची वैशिष्टयपुर्ण नृत्यकला, चित्रकला ही जगात प्रसिद्ध आहे. कातकरी, पारधी यांची वैशिष्टयपुर्ण बोली भाषा आहे.



परंतू जागतीकीकरणामुळे या समाजाचा इतर विकसीत समाजाशी संपर्क वाढल्याने आज अशा समाजाची ही सांस्कृतीक वैशिष्टये लुप्त होत चालली आहेत. एकीकडे शिक्षण, आरोग्य, व्यवसाय यादृष्टीने आदिम समाज विकसीत होत आहे. तर दुसरीकडे त्यांचे पारंपारीक व्यवसाय, भाषा, सण, नृत्य, वाद्यवृंद, साहित्य व संस्कृती ज्यास जगात विशेष ओळख आहे. त्यांचा अस्त होत असल्याचे आढळते. जागतीकीकरणामुळे शहरी भागांशी संपर्क वाढल्याने या समाजाचे अनुकरण करण्याची प्रवृत्ती आदिम समाजात वाढलेली दिसते. परिणामी त्यांची स्वत:ची वेगळी अशी असलेली ओळख नष्ट होत आहे. व ज्यांनी विकसीत समाजास अंगीकारले नाही. त्यांना अनेक आर्थिक—समाजिक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे जागतीकीकरणाचे अनुकूल व प्रतीकूल असे दोन्ही परिणाम या आदिम समाजावर झालेले दिसतात. शहापूर तालुक्यातील आदिम समजाावरही जागतीकीकरणाचे असेच परीणाम झालेले पहावयास मिळतात ते पुढीलप्रमाणे :

**आदिम समाजावरील अनुकूल परीणाम :**

१) शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात प्रगती

२) उदरनिर्वाहाच्या साधनात बदल

३) विकसीत जगाच्या संपर्कने सामाजिक बदल

४) अंधश्रद्धा, गुन्हेगारी, अनैतिकता यांवर आळा.

५) स्वत:ची नवी ओळख निर्माण करण्याची संधी.

६) आचार—विचारांचे आदान—प्रदान

७) राहणीमानाच्या दर्जात बदल

८) सर्व प्रकारच्या आधुनीक सेवा व सुख—सुविधांची उपलब्धता.

९) आर्थिक, सामाजीक, सांस्कृतीक व राजकीय विकास

**आदिम समाजावरील प्रतीकूल परिणाम :**

१) परंपरागत व्यवसाय, उद्योग यांचा ऱ्हास.

२) प्राचीन बोलीभाषा, सण—उत्सव, नृत्यप्रकार, वाद्ये, लोकगीते इत्यादींचा विसर

३) विकसीत समाजाशी वाढते मतभेद, कलह.

४) विस्थापीत समाजाच्या पुनर्वसनाची समस्या

५) विकसीत समाजाचे अंदाधुंद अनुकरण

६) अवास्तव अपेक्षा व त्यातून वाढणारी



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

गुन्हेगारी प्रवृत्ती

७) देशाच्या सांस्कृतीक वारसाचा ऱ्हास.

८) अर्थव्यवस्थेतील प्रतीकूल बदल व पर्यावर्णीय अवनती

९) अर्थकारण व समाजकारणाशी निगडीत राजकीय राजकारणाचा प्रभाव.

१०) आर्थिक—सामाजिक दुरावस्था.

वरील मुद्दंयावरून असे लक्षात येते की, जागतीकीकरणाचा आदिम समाजावर जरी अनुकुल परीणाम होत असला तरी प्रतीकूल परीणांमांच्या तुलनेने त्याचा लाभ कमी प्रमाणात आहे. व यामुळे आदिम समाजाची आर्थिक—सामाजीक पिळवणूक वाढली आहे. विकासाच्या नावाखाली आदिवासींच्या जमीनी हस्तांतरीत केल्या जात आहेत. जंगलातून त्यांना हद्दपार केले जात आहे. परीणामी अशा समाजाच्या उदरनिर्वाहाचाच नव्हे तर एकूणच अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. उदा. आज कातकरी समाज हा लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. वारली संस्कृती नाममात्र शिल्लक राहीली आहे. पारधी समाज हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. आणि या सर्वास सबब पुढे केली जाते ती जागतीकीकरणाच्या नावाखाली विकास योजना अंमलात आणण्याची.

याचबरोबर आदिम समाजाच्या अवास्तव अपेक्षा, विकसीत—शहरी समाजाचे अंदाधुंद, अनुकरण, अपूर्ण जनजागश्ती अथवा माहीती अशा अनेक कारणाने हा समाज आज अनेक आर्थिक सामाजीक प्रश्नांना सामोरा जात आहे.

**शिफारसी :**

समाजातील प्रत्येक घटकाचा विकास होणे हे गरजेचे आहे. परंतू त्याचबरोबर आपल्या समाजिक व सांस्कृतीक परंपरांचे वैशिष्टयांचे जतन करणे देखील आवश्यक आहे. याकरीता प्रशासकीय स्तरावर उपाय योजना करणे, प्रोत्साहन देणे यासारखे मार्ग अवलंबीता येतील. जेणेकरून विकास व संस्कश्तीचे जनत समतुल्य प्रमाणात होईल.

**निष्कर्ष :**

जागतीकीकरणाचा शहापूर तालुक्यातीलच नव्हे तर एकंदर सर्वच भागातील आदिवासींच्या समाज जीवनावर अनुकूल—प्रतीकूल परीणाम झालेला आढळतो. परीणामी एकीकडे हा समाज विकसीत होत आहे. तर दुसरीकडे त्यांचा अमुल्य असा सांस्कृतीक ठेवा लुप्त होत आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. महाराष्ट्राचा भूगोल : डॉ. सुरेश फूले
२. महाराष्ट्राची आर्थीक पहाणी : २०११
३. शहापूर तालुका : तलाठी कार्यालय—दस्तावेज
४. महाराष्ट्र राज्य— सन २०११ ची जनगणना

**संकेतस्थळे :**

१. http ://cultural.maharashtra.gov.in
२. http ://censusindia.co.in.

❑❑❑

Sandeep Shikshnik Sanstha's Arts, Com. & Sci. College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane 421 601

...UL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue, March 2019

International Multilingual Refereed Research Journal

# Vidyawarta®

## Indian Council And Social Science Research

(Western Regional Center,Mumbai)
And

## Jeevandeep Shaikshanik Sanstha

# Arts, Commerce & Science College, Khardi

Tq.Shahapur, Dist.Thane.
(Affiliated to Mumbai University)



Organized

**Two Day's Interdisciplinary National Conference on**

# Impact of Globalisation on Indian Tribal Community

On Dated : **01 & 02 March, 2019**

**Organized By**
Jeevandeep Shaikshanik Sanstha
**Arts, Commerce & Science College, Khardi,**
**Shahapur,Dist-Thane- 421601**

**Prof. D.M.Bhutale**
Convener

**Prof.K.R. Kalkate**
I/C. Principal

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता™

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचालित व मुंबई विद्यापीठ, मुंबई संलग्नित

**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी, ता. शहापूर जि. ठाणे**

व इंडियन कॉन्सिल अँन्ड सोशल सायन्स रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

## जागतिकारणाचा भारतीय आदिवासी समुदायावर पडलेला प्रभाव

**Patron**
**Hon. Ravindra Ghodvinde**
(President Of Jeevandeep Shaikshanik Sanstha)

Guest Editor
**Prof K R Kalkate**
HOD of Marathi Department & I/ C Principal
Jeevandeep Shaikshanik Sanstha
Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal.shahapur Dist. Thane

**Prof D M Bhutale**
HOD of Sociology Department
Jeevandeep Shaikshanik Sanstha
Arts,Commerce & Science College ,Khardi, Tal. shahapur Dist. Thane

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat**.

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

52) आदिवासी समुदायाची ओळख
अभिषेक बाळू जाधव, पुणे ||192

53) जागतिकीकरण आणि आदिवासी कविता
डॉ. अलका शिंदे (पवार), Shahad (W). ||196

54) जागतिकीकरणआणि स्त्रीवादीसाहित्य
श्री. तुषार प्रकाश भोसले, पुणे ||200

55) जागतिकीकरण संकल्पना आणि परिणाम — समाजशास्त्रीय अध्ययन
डॉ. ज्योती अरविंद पोटे, अंबरनाथ ||202

56) जागतिकीकरणाचा भारतीय जमातींवरील विविध परिणामांच्या संबंधित साहित्याच्या ...
डॉ.सौ. सीमा नरेश परटोले & प्रा. अश्विनी पाटील, ता. भिवंडी ||207

57) जागतिकीकरण आणि कंवर आदिवासी जमात
सौ. जयश्री अभिमन्यू डंके, पुणे ||212

58) जागतिकीकरण आणि आदिवासी मराठी कविता
प्रा. कैलास कळकटे., जि. ठाणे ||215

59) जागतिकीकरण आणि आदिवासी समाजातील चळवळ
प्रा. कांबळे रावसाहेब हरिबा, औरंगाबाद ||218

60) जागतिकीकरण आणि आदिवासी मराठी साहित्य
प्रा. संजय तुकाराम निचिते, जि. ठाणे ||220

61) शहापूर तालुक्यातील आदीवासी जमातींवर जागतिकीकरणाचा झालेला परिणाम ...
प्रा. विशाल संपत भोसले, जि. ठाणे ||224

62) आदिवासी समाजातील स्त्रियांचा दर्जा : एक समाजशास्त्रीय अध्ययन
डॉ.श्वेतांबरी पी. कनाकेदांडे & मोहिनी प्र.कनकदंडे, नांदेड ||228

63) जागतिकीकरणाचा आंध अदिवासीवर झालेला परिणाम
कु. आरती बस्वराज शेटटी, पुणे ||230

64) जागतिकीकरण : आदिवासी साहित्य
रश्मी शेटये — तुपे ||233



http://www.printingarea.blogspot.com www.vidyawarta.com/03

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

58

# जागतिकीकरण आणि आदिवासी मराठी कविता

प्रा. कैलास कळकटे
मराठी विभाग प्रमुख,
वनदीप शैक्षणिक संस्था संचलित, कला,वाणिज्य
विज्ञान महाविद्यालय खर्डी, ता. शहापूर, जि. ठाणे

***********

खाऊजा म्हणजेच खाजगीकरण, उदारीकरण जागतिकीकरण याचा स्विकार भारताने १९९० च्या ारास केला. परंतु या धोरणाचे चांगले—वाईट परिणाम ून येण्यासाठी एक दहा वर्षाचा काळ गेला. या लखंडानंतर या धोरणाचे दुरगामी परिणाम दिसून ू लागले.मूठभर लोकांच्या कल्याणासाठी असणा—या धोरणाने मात्र भारतीय समाज जीवनासमोर अनेक न उभे केले. कारण भारतीय समाजव्यवस्था ही ्तरात विभागलेली आहे.




या धोरणाचा चांगला परिणाम वरील तीन वर्गाला भोगता आले पण खालच्या तीन वर्गाच्या समोर या णामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. या धोरणाच्या गल्या—वाईट परिणामांचे प्रतिबिंब साहित्यात देखील ू लागले.कारण साहित्य हा समाजसापेक्ष सर्जनशील विष्कार होय(१)

प्रस्तुत लेखात विनोद कुमरे यांच्या २०१४ ली प्रकाशित झालेल्या 'आगाजा' या कवितासंग्रहाच्या आधारे आदिवासी मराठी जागतिकीकरणाला आपल्या कवेत कशा प्रकारे पकडले याचा शोध घेण्याचा प्रयत्न असेल.

## आदिवासी मराठी कविता

साठोत्तरी कालखंडातील एक महत्त्वपूर्ण प्रवाह म्हणून आदिवासी साहित्याचा उल्लेख करावा लागतो. आदिवासी हा संदर्भ असलेल्या मराठीतील ललित साहित्याच्या अभ्यासकक्षा 'दलित' जाणिवेच्या साहित्यापेक्षा वेगळ्या आहेत. आदिवासींच्या संदर्भातील भौगोलिक,सामाजिक,वांशिक व धार्मिक पृथकतेची जाणीव व्यक्त करणा—या मराठी साहित्यास 'आदिवासी साहित्य' असे म्हणता येईल.(२) या साहित्य प्रवाहाने मराठीतील सगळ्या प्रमुख वाङ्मय प्रकारांना वळसा घातला आहे.त्यात ठळकपणे उठून दिसते.ती 'कविता' पुस्तकरूपाने प्रकाशित कवितासंग्रह मर्यादित असले तरी अनियतकालिके, नियतकालिके, संपादने,आदिवासी साहित्य संमेलनांच्या स्मरणिका इ.माध्यमातून विपूल प्रमाणात काव्य निर्मिती झालेली दिसून येते.१९७६ साली भुजंग मेश्राम यांनी 'आदिवासी कविता' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. त्यानंतर आदिवासी कवींचा पहिला प्रातिनिधिक संग्रह 'मोहोळ' १९८२ साली प्रकाशित झाला. त्यानंतर उत्तमराव धोंगडे, वाहरू सोनवणे,विनायक तुमराम, भुजंग मेश्राम, नीलकांत कुलसंगे, पुरूषोत्तम शेळमाके, वामण शेळमाके, डॉ. गोविंद गारे, सुनिल कुमरे, उषाकिरण आश्राम, डॉ. संजय लोहकरे, विनोद कुमरे इ. कवींनी आदिवासी कवितेला समृद्ध केले.

मराठीत आदिवासी कविता आता चांगलेच मूळ धरून लागलेली आहे. तिच्या प्रेरणा दलित कवितेच्या प्रवाहातच असल्या तरी तिची प्रकृती मात्र दलित कवितेपासून अगदी वेगळी आहे. आदिवासी कविता विस्थापितांच्या वेदनेची कविता आहे.निसर्ग हा तिचा आत्मा आहे. आपण निसर्गावर विजय मिळवणारे 'नायक' नसून निसर्ग आपलाच एक अतूट भाग आहे. निसर्गापासून तूटणे म्हणजे आपल्या अस्तित्वापासूनच ढळण्यासारखे आहे. आधुनिकीकरणातून येणा—या नागरीकरण आणि जागतिकीकरणाच्या झंझावातात आपली [illegible] कशी टिकवून ठेवायची, आपल्या

Jeevandeep Shaikshanik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane 421 601

आस्तित्वाचे विघटन कसे थांबवायचे हा तिच्यासमोरचा तापदायक पेच आहे. अशा मूलभूत प्रश्नांना सामोरे जाण्याचा प्रयत्न विनोद कुमरे यांच्या कवितांतून दिसून येतो.(३)

'आगाजा' हा विनोद कुमरे यांचा कवितासंग्रह लोकवाङ्.मय ग्रहाने 'आरंभ कविता' या मालिकेत सप्टेंबर २०१४ मध्ये प्रकाशित केलेला कवितासंग्रह होय.

'आगाजा' हा गोंडी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ आवाहन असा आहे.८८ पृष्ठांच्या या कवितासंग्रहात २८ कविता असून त्यापैकी बहुतांश कविता या दीर्घ स्वरूपाच्या आहेत. अरण्य, झेल,माड्य, ढोल्या, जंगो, चुहा, पाडा, दंडार, कोया पुंगार इ. कवितेच्या शीर्षकांवर एक नजर टाकली तरी ही या कवितेची नाळ आदिवासी जीवनाशी किती घट्ट जोडली गेलेली आहे.याची प्रचिती येते

अरण्या, तुझ्या अंगाखांद्यावर खेळता
भुकेचे सिद्धांत मांडता मांडता
येऊन धडकलो जागतिकीकरणात
प्रश्नांचं नैमित्य आणि उत्तराच्या उपेक्षेसह(फेसबुक पृ. ७१)

याच प्रश्नांचा आणि उत्तरांचा शोध संपूर्ण कवितासंग्रहात कवी घेताना दिसून येतो.

जागतिकीकरणामुळे आलेल्या उद्योग—धंद्याच्या प्रकल्पामुळे किंवा त्यांना पुरक सोयी—सुविधा उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली अनेक मोठे—मोठे प्रकल्प १९९० नंतर भारतात उभारले गेले.त्यासाठी आदिवासी जमातीचे निवास असणा—या जंगलांना सुरूंग लावण्यात आले. त्यामुळे याविषयीची वस्तुस्थिती व चीड कवी अरण्य या कवितेत व्यक्त करताना कवी म्हणतो.

त्यांनी आरंभलेल्या जागतिकीकरणाच्या पुसट बिंदूपासून
तुझ्या काळजात रूतवताहेत खंजीर
तुला करताहेत रक्तबंबाळ, नि भुईसपाट
आखताहेत वेगवेगळे प्रोजेक्ट तुला घालताहेत कुंपण
रचताहेत तुझ्या कत्तलीचा इतिहास पुन्हा पुन्हा
आणि घडवताहेत जगभर तुझ्या कत्तलीचंच परिज
मांडताहेत ठराव नि प्रस्ताव
(अरण्य,पृ.०२)

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या स्पर्धा टिकण्यासाठी सगळ्याच मानवी समूहांचा अटोका प्रयत्न चाललेला आहे.

त्यात आदिवासी समूहातील सुशिक्षित देखील मागे नाही.पण ही लोकं आपली 'मूळ' विसरली किं त्यांनी मुख्य प्रवाहाशी जुळवून घेण्याच्या नादा सोयीस्करपणे त्याकडे दुर्लक्ष केले आणि आपण क भांडवलवादी व्यवस्थेचा भाग झालो. याविषयीची भाव कवी व्यक्त करतो.

मुख्य प्रवाहाशी जुळवून घेताना
आपण विसरत गेलो आपली दंडार
अंगभर गोंदण किंवा जगण्यातल्या व्यथा
अन् एका भांडवलशाहीचाच एक भाग झालो.
(निसटती,पृ.१४)

'पाडा' या दीर्घ कवितेच्या माध्यमातून आदिवा पाड्यांचे वर्तमान कवीने मांडले आहे. जागतिकीकरणानं बदलेल्या मानवी जीवनात 'दिखाऊ' बाजीला जे मह आले आहे. त्यामुळे 'पाडा' हा पांढरपेशी लोकांच्य दृष्टीने 'म्यूझियम' झाला आहे याविषयी चीड क मांडतो.तर दुस—या बाजूला पाड्यावरील लोकांच्य जगण्याचे प्रश्न, नक्षलवाद त्यात सहभागी करू घेण्यासाठी केले जाणारे प्रयत्न किंवा धळ,पाड्यावरी शाळा, पांढरपेशी लोकांना पडणारे प्रश्न, पाड्याच विकासासाठी येणारे कल्याण आश्रम इ. विषयी क या कवितेतून व्यक्त होतो.आणि त्यातील दिखाऊपणाव भाष्य करतो.

आमच्याच जमिनीवर बांधलेल्या कल्याण आश्रमात
खेळवतात, नाचवतात मनसोक्त पाहुण्यांसमो
काळे—गोरे सफेदपोश येत असतात
आमच्याच कल्याणासाठी आमच्याच वस्तीवर
(पाडा, पृ.५२)

जागतिकीकरणानंतर धर्मांतरचे एक पेव देशा आले आहे.गरजू लोकांना ओळखून त्यांना मदती हात देऊन धर्मांतरासाठी त्यांचे मतप्रर्वतीत करण्या प्रयत्न सुरू आहे.त्यासाठी काही लीडर लोक का करताना दिसतात अशा लीडर लोकांना 'भाषण' कवितेतून कवी सल्ला देतो.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

लीडर
तेवढं धर्मांतराचं सोडा
आहे तोच आधी जमातीजमातीत जोडा
पाण्यावर काठी मारल्यानं फाकत नाही म्हणतात पाणी
आपल्या मी धर्मात काय आहे वाईट सांगा ?

जागतिकीकरणाचा अरण्यावर पर्यायाने आदिवासी समाजावर काय परिणाम झाला यावर अतिशय मार्मिक भाष्य कवीने केलेले आहे.

हे अरण्यबेट
बदलतंय परिवर्तनाच्या चळवळीत
घडवत नेतं माणसांच्या प्रवृत्तीचं स्खलन
आता जंगलात माणसं कुढंच नाहीत शिल्लक
मोठी हेडलाईन भूकबळी अथवा नक्षलबळी
महारोगासारखं पसरलेलं हे विचाराचं ग्लोबलायझेशन,
अरण्यबेट सोडत राहतं आर्त किंकाळ्या
झाडापानांवर पेरलेली अवकाळी सुरंगफळं
आणि परिवर्तनाच्या चळवळीत रापलेलं अरण्यबेट
(अरण्य, पृ.०६)

या लेखाच्या मर्यादेमुळे या ठिकाणी फक्त आगाजा या कवितासंग्रहातून व्यक्त झालेल्या जागतिकीकरणाविषयीच्या कवीच्या भावनांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.परंतु या कवितासंग्रहाचे स्वरूप खूप व्यापक अशा स्वरूपाचे आहे.कारण ही कविता फक्त आदिवासी जगणे मांडत नाही किंवा दु:खही मांडत नाही.ती मांडते ती वस्तुस्थिती. आदिवासी समाजातील एक शिकलेला मुलगा 'भान' आल्याच्या नंतर आपल्या समाजावर एक दृष्टिक्षेप टाकतो आणि तो टाकल्यानंतर त्याला जे काही दिसते त्याविषयी तो 'आगाजा' करतो.

या कवितांच्या माध्यमातून आलेले प्रतीके व प्रतीमा ह्या जशा आपल्या आदिम परंपरेशी नाते सांगणा—या आहे. तशाच त्या आधुनिकतेशी जोडून घेणा—या ही आहेत. कवी फक्त दु:खच व्यक्त करत नाहीतर तो दु:खाच्या मुळाशी जाऊन त्यावर भाष्य करण्याचा प्रयत्न करतो.त्यामुळेच ही कविता भाष्यात्मक वाटत नाही.तर ती गोंडी भाषेतील, संस्कृतीतील अनेक शब्द या कवितासंग्रहात जागोजागी पसरलेले आहे. तसेच अनेक इंग्रजी शब्दही आपणास दिसून येतात. थोडक्यात चंद्रकांत पाटील म्हणतात त्याप्रमाणे आपल्या पहिल्याच संग्रहात कुमरे यांनी आशय अभिव्यक्ती आणि रूपबंधावर मिळवलेला ताबा निश्चितच प्रशंसनीय आहे.

**संदर्भसूची—**

(१) रा.ग.जाधव साहित्य व सामाजिक संदर्भ. पृ.०३ तृतीयावृत्ती २००३ कॉन्टिनेन्टल प्रकाशन,पुणे.

(२) डॉ.मुनघाटे प्रमोद,आदिवासी मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या. संपादक—डॉ.प्रमोद मुनघाटे.पृ. ०३.प्रथमावृत्ती २००७.प्रतिमा प्रकाशन,पुणे.

(३) पाटील चंद्रकांत,मुलपृष्ठ, आगाजा, विनोद कुमरे. दुसरी आवृत्ती जानेवारी २०१५ लोकवाङ्मय गृह, मुंबई.

❑❑❑

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 Special Issue- 111 (B)

# साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर



अतिथी संपादक :

**डॉ. व्ही.बी. गायकवाड**

प्राचार्य

मराठा विद्याप्रसारक समाजाचे

के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

विशेषांक संपादक :

**डॉ. दिलीप पी. पवार**

विभाग प्रमुख व समन्वयक, मराठी संशोधन केंद्र

मराठा विद्याप्रसारक समाजाचे

के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर** (येवला)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

Jagdeep Shaikshnik Sanstha's Arts, Com & Science College
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue – 111 (B)

## साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर

अतिथी संपादक
डॉ. व्ही. बी. गायकवाड
प्राचार्य,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

विशेषांक संपादक
डॉ. दिलीप पी. पवार
विभाग प्रमुख व समन्वयक, मराठी संशोधन केंद्र,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर (येवला)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 800/-

Jeevandeep Shaikshanik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal

ISSN : 2348-7143
January-2019

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/ लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | साहित्य आणि संस्कृती | डॉ.शिरीष लांडगे | 05 |
| 2 | आदिवासी समाज, संस्कृती आणि इतिहासाच्या पाऊलखुणा | डॉ. तुकाराम रोंगटे | 09 |
| 3 | साहित्य, समाज आणि समकालीन संदर्भ | डॉ.वेदश्री थिगळे | 14 |
| 4 | कामगार कविता प्रवृत्ती (कालखंडानुसार) | डॉ.दिलीप पी.पवार | 21 |
| 5 | साहित्य आणि सामाजाचे अनुबंध | डॉ.शंकर बोऱ्हाडे | 30 |
| 6 | दासबोध ग्रंथातील समाजदर्शन | डॉ. सुरेश जाधव | 33 |
| 7 | साहित्याचे सामाजिक अवलोकन | डॉ.गोविंद रामदिनवार | 36 |
| 8 | साहित्याचे समाजशास्त्रीय संशोधन | डॉ.पौर्णिमा बोडके | 41 |
| 9 | शाहिरी वाङ्मयातील समाज चित्रण | प्रा.माधव खालकर | 44 |
| 10 | मराठी साहित्य आणि समाजपरिवर्तन | डॉ.अशोक लिंबेकर | 50 |
| 11 | लोकसाहित्याचे कलात्मक सौंदर्य | डॉ.शांताराम चौधरी | 53 |
| 12 | साहित्य आणि समाज : परस्पर संबंध | डॉ.अरुण पाटील | 64 |
| 13 | साहित्य आणि समकालीन संदर्भ | डॉ.समिता जाधव | 69 |
| 14 | साहित्य आणि सामाजिक शास्त्रे : अनुबंध | डॉ.किरण पिंगळे | 73 |
| 15 | माध्यमांतर होऊ शकणारी मराठीतील साहित्यकृती : भूमी कादंबरीसंदर्भात | डॉ. सायली आचार्य | 77 |
| 16 | पसायदानातील समाजप्रबोधन | डॉ.छाया शिंदे | 82 |
| 17 | साहित्याचे समाजशास्त्र | डॉ.कार्तिकी नांगरे | 86 |
| 18 | साहित्याचे समाजशास्त्र | डॉ.प्रतिभा घाग | 89 |
| 19 | मराठी साहित्यकृतीचे माध्यमांतर :एक अभ्यास | प्रा.एम.एल.भुसारे | 92 |
| 20 | आदिवासी साहित्य : समाज आणि संस्कृती अनुबंध | अनिल वळवी व डॉ.राजेंद्र ठाकरे | 95 |
| 21 | साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध | श्री.तुषार भोसले | 105 |
| 22 | साहित्य व समाज परस्परसंबंध | प्रा.स्वाती निकम | 109 |
| 23 | ठाणे जिल्ह्यातील आदिवासी मणांचे साहित्य | डॉ.सुनिलदत्त गवरे | 113 |
| 24 | समकालीन साहित्य आणि कथा वाङ्मय | सारिका मोहिते | 116 |
| 25 | बदलते ग्रामीण साहित्य आणि कृषीजीवन | डॉ.अशोक भवर | 120 |
| 26 | साहित्य, समाज, भाषा आणि संस्कृती परस्परसंबंध | डॉ.दत्तात्रय वेलजाळी | 125 |
| 27 | संतांची सामतेची गुढी | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 129 |
| 28 | साहित्याची सामाजिकता | प्रा.कैलास कळकटे | 133 |
| 29 | साहित्य व समाज परस्परसंबंध (आदिवासी कादंबरीच्या संदर्भात) | प्रा.सुलतान पवार | 136 |
| 30 | शाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजदर्शन | प्रा.महेश बनकर | 139 |
| 31 | फुले, शाहू,आंबेडकर : साहित्य आणि शिक्षण | डॉ.कैलास खोंडे | 143 |
| 32 | साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध | प्रा.शरद आंबेकर | 147 |
| 33 | आदिवासींचे सांस्कृतिक रुपांतर : स्वरूप आणि साहित्य | प्रा.सुदाम राठोड | 151 |
| 34 | साहित्याचे समाजशास्त्र | प्रा.अनुराधा मोरे | 155 |
| 35 | साहित्य व संस्कृती परस्पर संबंध | श्री. दत्तात्रय शिंदे | 159 |
| 36 | आदिवासी साहित्यातून प्रकट होणारे समाजजीवन | श्रीम.सारिका गांगुर्डे | 169 |


Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane. 421 601

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# साहित्याची सामाजिकता

**प्रा. कैलास कळकटे**
मराठी विभागप्रमुख
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
खर्डी, ता. शहापूर, जि. ठाणे.
९९२३९९२३९०

साहित्य हा मर्यादित अर्थाने का होईना समाजजीवनाचा आरसा असतो. समाजमाच्या मानसिकतेचे व गरजेचे प्रतिबिंब कमी अधीक प्रमाणात साहित्यात उमटत असते. प्राचीन कालखंडापासून आजपर्यंतच्या साहित्याचा आढावा घेतला की, ही गोष्ट पटकन लक्षात येते. त्यामुळेच "साहित्याचा निर्मितीमध्ये अभ्यासाला, गांभिर्याला जसे अतिशय महत्त्व असते; तसेच आणखी एक बाब वादतीतपणे स्वीकारली जाऊ शकेल आणि ती म्हणजे साहित्यकृतीतील वास्तवाचे महत्व साहित्यकृतीचा सारा डोलारा उभा असतो तो समाज वास्तवावरच"[१] आणि म्हणूनच साहित्य आणि समाज यातील परस्परसंबंध स्पष्ट करण्यासाठी अनेक संकल्पना मांडल्या गेल्या आहेत. "आपल्याकडे भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात येणारा लोकधर्मीचा उल्लेख किंवा नाटक हे लोकावृत्तानुकरण असते ही भरतमुनींची कल्पना साहित्य व समाज यांचा संबंध सुचविणारी आहे; तर पाश्चात्य साहित्यशास्त्रात प्लेटोच्या 'अनुकृती सिध्दांत' साहित्य समाजसंबंध गृहीत धरला गेला आहे."[२] याचा अर्थ साहित्य आणि समाज यांच्या परस्पर संबंधाचा शोध प्राचीन काळापासूनच घेतल्या जात आहे. इ.स. १७२५ मध्ये व्हिको या इटालियन विचारवंताने New Science या ग्रंथात होमरच्या साहित्याचे सामाजिक अर्थनिर्णयन केले आहे. तर इ.स.१८०० मध्ये 'मादमा द स्ताईल' या अभ्यासकाने साहित्य आणि सामाजिक संदर्भ यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. तेन या फ्रेंच समीक्षकाने वंश, काळ, वातावरण या आपल्या प्रसिध्द सिध्दांतातून साहित्य आणि समाज यांचा संबंध अधिक ठळकपणे स्पष्ट केला . साहित्य आणि समाज यांचे संबंध स्पष्ट करणारी एक सुसूत्र पध्दती पहिल्यांदा तेननेच मांडली.

रा.ग.जाधव म्हणतात त्याप्रमाणे "साहित्याच्या सामाजिकतेचा विचार दोन प्रकारे करता येणे शक्य असते. एक प्रकार म्हणजे वर्णनात्मक रितीने व दुसरा प्रकार म्हणजे मूल्यात्मक रितीने; वर्णनात्मक पध्दतीने साहित्याच्या सामाजिकतेचा विचार करताना आपणास समाज, लेखक, वाचक, प्रकाशक, भाषा यांसारख्या घटकांचा मागोवा घ्यावा लागतो. मूल्यात्मक दृष्टीने साहित्याच्या समाजसापेक्षतेचा वेध घेताना कलात्मक मूल्ये, बांधीलकी सारखी जीवनमूल्ये, साहित्याची वैश्विक प्रत्ययकारिकता यांसारख्या बाबींचा परामर्श घ्यावा लागतो. यावरून साहित्याचे सामाजिकतेचे स्वरूप किती व्यापक व गुंतागुंतीचे आहे हे दिसून येते."[३]

साहित्याच्या सामाजिकतेचा शोध घेताना पहिल्यांदा साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधाचा मागोवा घ्यावा लागतो. कारण साहित्य हे समाजात निर्माण होते. आणि समाजात निर्माण होणाऱ्या प्रत्येक गोष्टीच्या मागे काहीतरी कार्यकारण भाव असतो. अभिव्यक्तीच्या तीव्र जाणिवेतून साहित्याची निर्मिती होते. परंतु अभिव्यक्त होण्याची जाणीवच समाजात घडणाऱ्या अनेक चांगल्या वाईट घटना, वृत्ती—प्रवृत्ती,मनातल्या भावना शब्दांतून व्यक्त कराव्यात, बदलत्या जीवनाचे प्रतिबिंब मांडावे, आपल्या आवती—भवतीचे प्रश्न मांडणे. मानवी जीवनातील चिरंतन मूल्यांना केंद्रस्थानी मांडावे इ. निर्माण होते. साहित्य निर्मितीचे केंद्र व प्रकार सातत्याने बदलत राहत असतात कारण आपला समाज एक जिनसी नाही. येथे अनेक स्तर आहेत. त्यामुळे साहित्य



Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

आणि समाज यांचा परस्परसंबंध नाकारता येत नाही. त्यामुळेच "कला समाजाच्या प्रभावापासून मुक्त राहू शकत नाही. मानव समाजाचा इतिहास जेवढा प्राचीन आहे. तेवढाच कलेचाही आहे."असे ॲडाल्फ वॉजकेज यांनी आपल्या 'आर्ट ॲण्ड सोसायटी' ग्रंथात म्हटले आहे.समाज नेहमी साहित्याकडून अनेक प्रकारच्या अपेक्षा करीत असतो. स्वातंत्र्योत्तर काळात व्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व मान्य करूनही समाजाला जी गोष्ट मान्य नाही ती दडपण्याचे किंवा त्यावर बंधने घालण्याचे काम समाज करत असतो.उदा.आनंद यादव यांच्या'संतसूर्य' या कादंबरीच्या संदर्भातील वाद. समाजातील ज्या मूलकल्पना आहेत त्या वाढीस लावण्यासाठी साहित्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे.असेच समाजाला वाटत राहाते.साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधाची दुसरी बाजू आहे ती 'सांस्कृतिक, "एका दृष्टीने समाजाची एक उपसंस्कृती म्हणजे वाङमयीन संस्कृती होय...' साहित्याच्या इतिहासाच्या वस्तुस्थितीने व साहित्य परंपरेच्या मूल्यकल्पनांनी समाजातील वाड.मयीन उपसंस्कृती घडत जाते.ही घडणप्रक्रिया अखंडपणे चालू असते.या वाड.मयीन उपसंस्कृतीशी साहित्यनिर्मितीचा अर्थपूर्ण संबंध असतो.या संबंधातूनच साहित्यातीलच नवे व जूने प्रतिगामी व पुरोगामी , स्थितिवादी व परिवर्तनवादी, प्रयोगवादी व क्रांतिवादी असे संप्रदाय निर्माण होतात. त्यांचा संबंध वाड.मयीन व सामाजिक असा दुहेरी स्वरूपाचा असतो."[४] मराठा साहित्यामध्ये आधुनिक काळात निर्माण झालेल्या प्रत्येक प्रवाहाचा याच स्वरूपातून अभ्यास करावा लागतो कारण ग्रामीण दलित,आदिवासी स्त्रीवादी,जनवादी इ.साहित्यप्रवाहांना ते केवळ वाङमयीन जाणीवेतून निर्माण झाले आहे.असे म्हणता येत नाही.कारण त्या प्रत्येकाचा मागे काहीना काही सामाजिक पार्श्वभूमी आहे.

साहित्याच्या सामाजिकतेचा विचार करताना लेखकालाही विचार करावा लागतो.कारण फक्त सामाजिक पार्श्वभूमीच्या बळावर कोणताही लेखक किंवा प्रतिभावंत श्रेष्ठ ठरू शकत नाही. कारण त्या विशिष्ट सामाजिक पार्श्वभूमीच्या बळावर एखादा लेखक जेव्हा लेखन करतो तेव्हा त्याच्याजवळ असणाऱ्या प्रतिभा शक्ती व अभ्यासाच्या बळावर तो साहित्यकृतीला जन्माला घालत असतो. म्हणून या प्रतिभाशक्तीच्या बिंदुजवळ लेखकांच्या सामाजिकतेची व्याप्ती संपते. या शक्तीच्या बळावरच तो अभिव्यक्त होत असतो. या शक्तीमुळेच एकाच समाजात जन्माला व एकाच प्रश्नावर लिहिणाऱ्या लेखकांच्या कलाकृती भिन्न असू शकतात. किंबहुना त्या असतातच.

मराठी वाङमयाचा इतिहासाचा विचार करताना त्याचे प्रामुख्याने मध्ययुगीन व आधुनिक असे दोन कालखंड मानले जातात. त्यात मध्ययुगीन वाङमयाचा इतिहास संत–पंत–तंत या टप्प्यात विभागला जातो तर आधुनिक कालखंडाचा इतिहास १८१८ ते १८७४, १८७५ ते १९२०, १९२० ते १९४५, १९४५ ते १९६०, १९६० ते १९९०, १९९० ते आजपर्यंत या टप्प्यात विभागला जातो. या प्रत्येक कालखंडाला एक नाव देखील आहे. उदा. नवसाहित्याचा कालखंड, परंतु या "सर्वच कालखंडातील सामाजिकतेचे साहित्याशी असलेले नाते सारखे नाही. मराठीच्या वाङमयपरंपरेत अनेक वाटा–वळणे आहेत. काही टप्प्यांवर सामाजिकतेचे परिणाम अधिक झालेले दिसतात; तर काही वेळा व्यक्तिनिष्ठेला महत्व मिळालेले दिसते. कधी पलायनवादी वृत्ती तर कधी विद्रोही वृत्ती प्रगट झालेली दिसते. याचाच अर्थ मराठी वाङमयपरंपरेतील सामाजिकता एकाच स्वरूपाची नाही आणि तशी ती असणे शक्यही नाही."[५] त्यामुळेच एकाच कालखंडात भिन्न–भिन्न प्रवृत्तीचे लेखन करणारे साहित्यिक आहेत. मराठी वाङमयाच्या इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यातील सामाजिकतेचा स्वंतत्रपणे आढावा घेणे शक्य आहे.



Shaikshanik Sanstha's Arts, Com. Science College, Kinhavali/Shendi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

**संदर्भ सूची**

१. नागनाथ कोत्तापल्ले, साहित्याचा अन्वयार्थ, तिसरी आवृत्ती, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, २०१३, पृ. ०३
२. दिगंबर पाध्ये, साहित्य, समाज आणि संस्कृती, चौथी आवृत्ती, लोकवाङमय गृह, मुंबई, पृ.०७
३. रा.ग.जाधव, साहित्य व सामाजिक संदर्भ, तृतीय आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३, पृ.७२
४. तत्रैव, पृ.७४
५. वि.शं.चौगुले, 'साहित्य आणि समाज', साहित्य आणि समाज, संपा. डॉ.सुनंदा गोसावी, विलास खोले, नाशिक,
६. १९९१, पृ.४१

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College, Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601 ★ Jeevandeep

I N T E R N A T I O N A L R E S E A R C H F E L L O W S A S S O C I A T I O N

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2019 Special Issue – 201(B)

## Nature Resources Based Sustainable Development
### With Special Reference to Tribal Community Rights



**Guest Editor :**
Dr. N. K. Phadke
Principal
Dr. S. D. Devsey Arts College & Commerce &
Science College, Wada,
Dist. Palghar (M.S) India

**Executive Editors -**
Dr. Dilip Telang
Dr. Surendra Khandekar
Dr. Rajendra Mane
Mr. Anup Pansare

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science
Khardi,
Tal Shahapur,
Dist. Thane,
421 601

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **मराठी विभाग** | | |
| 1 | पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या शाश्वत विकासातील आदिवासी सेवा मंडळाचे योगदान | डॉ.बळीराम चव्हाण | 5 |
| 2 | दळणवळणाच्या साधनात सागरी मार्गाचे महत्त्व | डॉ.एस.एल.म्हात्रे | 16 |
| 3 | वाढत्या शहरीकरणामुळे आदिवासी समाजावर होणाऱ्या दुष्परिणावर भाष्य करणारे नाटक : 'राणी माशी' | डॉ. संदिप बनसोडे व सुनील कांबळे | 19 |
| 4 | आदिवासी जमातीच्या हक्क आणि अधिकारासंदर्भात आंबेडकरी चळवळीची भूमिका | सुनिता सावरकर | 23 |
| 5 | आदिवासी समुदायाच्या शाश्वत विकासात कला, लोकसाहित्य, नृत्य, लोकगीते, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची भूमिका | प्रा. उद्धव खोमणे | 27 |
| 6 | आदिवासी समाज आणि शिक्षण | डॉ.व्ही.पी.फाळके | 34 |
| 7 | आदिवासी वर्गाच्या विकासाचे प्रयत्न | डॉ. वासुदेव डोंगरदिवे | 38 |
| 8 | तारपा वाद्याचे अस्तित्व : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. विनोद सोनवणे | 43 |
| 9 | समाज माध्यमांचा पालघर जिल्ह्यातील आदिवासी जीवनावर पडलेला प्रभाव : एक भौगोलिक अभ्यास | श्री. विशाल सोनकांबळे व श्री. मुकेश कुलकर्णी | 48 |
| 10 | सहकारातून आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास | सौ.योगिनी पाटील | 54 |
| 11 | आदिवासी जमातींच्या शाश्वत विकासात आदिवासी लोकसंस्कृतीची भूमिका | प्रा. कैलास कळकटे | 58 |
| 12 | आदिवासींच्या हक्कांच्या संदर्भात 'निसर्ग संसाधन आधारीत शाश्वत' आदिवासी धोरणे व त्यांची अंमलबजावणी | डॉ. रवींद्र बागस | 62 |
| 13 | महादेव कोळी जमातीच्या स्त्रियांची आर्थिक स्थिती – विशेष संदर्भ –देगलूर तालुका | स्वप्ना संगमवार | 68 |
| 14 | पर्यटक निघाले आदिवासींच्या भेटी करिता | डॉ. सौ. हेमलता मुकणे | 73 |
| 15 | कृषी पर्यटनातून आदिवासी लोकांचा चिरस्थायी विकास विशेष संदर्भ : पालघर जिल्हा | डॉ. जयवंत पाटील | 79 |
| 16 | आदिवासींच्या विकासात शासकीय योजनांचे योगदान | डॉ. ज्योती पोटे | 83 |
| 17 | महाराष्ट्रातील आदिवासींचे वैविध्यपूर्ण नृत्य प्रकार | डॉ. ज्योती रामोड | 92 |
| 18 | सेंद्रीय शेती काळाची गरज | श्री. कांतीलाल पाटील व डॉ. अनिल पाटील | 96 |
| 19 | आदिवासी स्त्री सक्षमीकरण : सामाजिक स्थिती | कविता लोखंडे व डॉ. विनायक शिंदे | 101 |
| 20 | आदिवासींच्या शाश्वत विकासासाठी कला, लोकसाहित्य, पर्यटन, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची भूमिका व सरकारचे धोरण | प्रा. किशोर चौरे | 105 |
| 21 | आदिवासी रामायण : एक लोककथा | डॉ. अंजली मस्करेन्हस | 110 |
| 22 | नैसर्गिक शेतीतून आदिवासी समाजाच्या शाश्वत विकासाचा अभ्यास (संदर्भ : पालघर जिल्हा) | अंकिता वर्तक | 115 |
| 23 | आदिवासी वारली चित्रकलेचे महत्त्व | प्रा.बाळासाहेब चकोर | 121 |
| 24 | आदिवासींचे जीवन व विवाहसंस्था | डॉ.संजय बेंद्रे | 124 |
| 25 | आदिवासी (कोळी) बोली भाषेतील शब्द | डॉ.एस.एस.भैरगुंडे | 127 |
| 26 | आदिवासी कलांची वैश्विकता | डॉ.भीमराव वानोळे | 133 |




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 201(B) : Nature Resources Based Sustainable Development With Special Reference to Tribal Community Rights | October-2019

# आदिवासी जमातींच्या शाश्वत विकासात आदिवासी लोकसंस्कृतीची भूमिका

**प्रा कैलास कळकटे**
मराठी विभाग प्रमुख,
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित,
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , खर्डीता.शहापूर जि .ठाणे
९९२३९९२३९०

**प्रस्तावना :**

निसर्गावर प्रेम करणारा ,द-या खो-यात राहाणारा,वेगळी भाषा बोलणारा , जंगल व जमीन यावर आपला अधिकार सांगणारा समुदाय म्हणून आदिवासी समुदाय ओळखला जातो.भारतीय संविधानाच्या कलम ३४२ (१) नुसार आदिवासींना ' अनुसूचित जमाती' असे संबोधले आहे.भारतीय समाज जीवनाची विभागणी ही शहरी , ग्रामीण व आदिवासी या तीन प्रमुख विभागात केली जाते. आजमितीला भारताच्या एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ ८.८ % इतकी लोकसंख्या आदिवासी समुदायाची आहे. जागतिकीकरणाच्या या कालखंडातही हा समुदाय विकासापासून कोसो दूर आहे.त्यामुळेच या समुदायाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या आहेत.तरीही हा समुदाय शाश्वत विकासापासून आजही वंचित आहे.शासकीय योजना , विविध संस्था, घटनात्मक विशेष तरतुदी या सगळयांच्या मदतीने आदिवासी समुदायाचा विकास झपाट्याने होणे अपेक्षित होते.परंतु वास्तव वेगळे आहे.कारण आजही आदिवासी समुदायाचे प्रश्न संपलेले नाहीत.त्यामुळेच आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास करावयाचा असेल तर त्यासाठी त्यांच्या लोकसंस्कृतीची व विकासाची सांगड घालावी लागेल.कारण हा समुदाय परंपरा प्रिय आहे.त्यांना त्यांच्या परंपरांचा प्रचंड अभिमान आहे.तो सहजासहजी परंपरा मोडायला तयार होत नाही.त्यामुळे त्यांच्या परंपरांच्या माध्यमातून त्यांचा शाश्वत विकास साधता येईल.तो कशाप्रकारे साधता येईल याचा शोध घेणे हाच प्रस्तुत लेखाचा हेतू आहे.हा शोध स्थूल पातळीवर घेतल्या जाईल.

**आदिवासी समुदयाची लोकसंस्कृती :**

आदिवासी समुदायाची खरी ओळख म्हणजे त्यांची लोकसंस्कृती. या लोकसंस्कृतीचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे प्रगत , शिक्षित समाजापेक्षा अत्यंत वेगळी अशीही संस्कृती आहे. महाराष्ट्रात कोकणा,म.ठाकूर,म.कोळी,वारली , कातकरी,ठाकर, माडीया गोंड, कोरकू, अंध्र,गोंड,पावरा, इ. जवळपास ४० ते ४५ जमाती राहातात.या प्रत्येक जमातीने स्वत: ची अशी संस्कृती जतन करून ठेवलेली आहे. आदिवासी समुदायाचा नागर जीवनाशी फारसा संबंध आलेला नसल्याने त्यांच्या लोकसंस्कृतीतून आदिमतेचे प्रतिबिंब ठळकपणे जाणवते.त्याबरोबरीनेच त्यात वापरलेल्या जाणा-या सगळया गोष्टी या निसर्गातूनच उपलब्ध केल्या जातात किंवा निसर्गतः मिळणाऱ्या गोष्टी त्यात साधन म्हणून वापरल्या जातात. प्रामुख्याने भाषा,चित्रकला,नृत्य , लोकगीते , लोकपरंपरा ,राहाणीमान इ. यात समावेश होतो. आदिवासी लोकसंस्कृतीचे ठळक उदाहरण म्हणून डोळया समोर येत ते म्हणजे वारली चित्रकला व तारपा नृत्य. याच लोकसंस्कृतीची व जागतिकीकरणाची सांगड घालून आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास करणे शक्य आहे.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

**वारली चित्रकला :**

वारली चित्रकला ही आदिवासी समुदायच्या आयुष्याचे एक विभाज्य अंग आहे. डॉ गोविंद गारे म्हणतात " एक सहजगत्या उमलणारी भावभिव्यक्ती आहे.भोळया भाबड्या आदिवासींच्या खडतर आयुष्यातला तो एक आनंदाचा क्षण आहे.त्यांचं वेगळं जग, रितीरिवाज,सण उत्सव दैनंदिन जीवनातील अनेक प्रसंग ,नकळत हळुवारपणे त्यांच्या कुडाच्या भिंतीवर साकार होत जातात." आज वारली चित्रकला ही फक्त आदिवासी पाड्यांपर्यंत मर्यादित राहिलेली नाही तर ती सातासमुद्रापार पोहोचली आहे.आज अनेक ठिकाणी चित्ररूपाने तिला मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.त्याबरोबरीनेच वारली चित्रकलेची वस्त्रप्रावरणे उच्चभ्रू समाजही ' फॅशन ' म्हणून वापरली जाते.व या कलेने सजविलेल्या अनेक शोभिवंत वस्तूंना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ निर्माण झाली आहे.

याचे श्रेय जाते ते पद्मश्री जिव्या सोमा मशे यांच्याकडे . इंदिरा गांधी यांनी हा हिरा हेरला आणि त्यास जगापुढे आणले. जिव्या मशे यांनी संधीचे सोने केले.जिव्या मशे स्वत: चे नाव चित्रावर लिहीत असे चित्रावर नाव लिहिणारे ते पहिले वारली चित्रकार आहे.वारली चित्रकलेची पारंपारिकता जपत त्यांनी वारली चित्रकलेत अनेक प्रयोग केले . आदिवासी पाड्याच्या भावजीवनाचे प्रतिबिंब असलेल्या वारली चित्रकलेला त्यांनी त्यातून मुक्त करून आधुनिक जीवनाचे संदर्भ दिले त्यामुळेच त्यांच्या चित्रात रेल्वे ,ट्रक किंवा आजुबाजुला होणारी वृक्षतोड इ . प्रतिबिंब दिसते.

वारली चित्रकला आज अपरिचित राहिलेली नाही. किंबहुना ' अतिपरिचयात अवज्ञा ' या उक्तीप्रमाणे काहीशी स्थिती वारली चित्रकलेबाबत झालेली दिसते.कारण आज मोठ्या प्रमाणात वारली चित्रकलेला बाजारपेठ निर्माण झाली आहे.त्यामुळे चित्रकलेचे शिक्षण घेऊन वारली चित्रांच्या नकला करून देणारे सजावटकार जागोजागी दिसत आहे.काव्या सारखा रंग आणि पांढ-या रंगाने भिंती रंगविताना दिसतात.अनेक संस्था , चित्रकार यांच्या माध्यमातून वारली चित्रकलेचे क्लासेस घेताना दिसतात .परंतु यातून वारली चित्रकलेचे नकलाकार निर्माण होताना दिसत आहे.कारण वारली चित्रकला म्हणजे फक्त रेषा किंवा रंग संगती नाही तर त्याला आदिवासी भावजीवनाचे संदर्भ आहेत.किंबहुना तोच वारली चित्रकलेचा आत्मा आहे.

त्यामुळेच आदिवासी समुदायातील तरूणांनी पुढे येऊन ही कला सातासमुद्रापार नेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे.त्यांनी शाश्वत विकासासाठी त्यांच्यांकडे या कलेच्या रूपाने असलेले हे 'सोने' बाजारपेठेत विकले पाहिजे. अॅमेझॉन किंवा फ्लिप कार्ट या सारख्या अॉनलाईन विक्री करणाऱ्या वेबसाईटवर एक नजर टाकली तर काही हजार रूपायांना तिथे वारली चित्र विकत मिळतात. परंतु ते चित्र आदिवासी समुदायाच्या वैयक्तिने विक्री साठी ठेवलेली नसतात.त्यामुळेच जागतिकीकरणाच्या या काळात आदिवासी तरूणांनी या नव्या माध्यमातून आपली चित्र विकली पाहिजे.

आज मोठ्या प्रमाणात जागातून वारली चित्रकला शिकण्याची मागणी केली जात आहे.परंतु शिकविण्यासाठी योग्य असे लोक नाहीत . त्यामुळे आदिवासी पाड्यातील तरूणांनी पद्मश्री जिव्या सोमा मशे यांचा व त्यांच्या मुलांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून ही चित्रकला नागर लोकांना शिकविली पाहिजे . जिव्या सोमा मशे यांच्या मुलाकडे जापानहुन लोक वारली चित्रकला शिकण्यासाठी येतात. यासाठी आदिवासी तरूणांनी आधुनिक माध्यमाच्या वापर केला पाहिजे उदा. अॉनलाईन शिकविणे ,यु ट्यूब च्या माध्यमाचा प्रभावी वापर करून. यातून आदिवासी समुदायाच्या शाश्वत विकासाला गती प्राप्त होईल असे वाटते.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

**आदिवासी लोकनृत्य :**

आदिवासी लोकनृत्य हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.जीवनाच्या आनंदाच्या क्षणी प्रथम हुंकार बाहेर पडतो तो नृत्यातूनच . प्रत्येक आदिवासी जमातीची स्वत : ची अशी लोकनृत्य आहेत उदा.वारली जमातीचे तारपा नृत्य ,कातकरी जमातीचे झिंगीनृत्य आधुनिक काळात या नृत्यांना देखील मोठ्या प्रमाणात मागणी आहे . परंतु या नृत्याच्या मुळ परंपरेची जान व भान असणारी आदिवासी समुदाय पुढे येण्यासाठी घाबरतो त्यामुळे ही कला नागर समाजापर्यंत पोहचत नाही.आज विद्यापीठांच्या युवक महोत्सवात किंवा अनेक राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय पातळीवरील महोत्सवात लोकनृत्याला मोठ्या प्रमाणात मागणी आहे.परंतु या मध्ये आदिवासी समुदाय मागे पडताना दिसतो .

**पारंपारिकतेचे जतन करून शाश्वत विकास :**

' जुनं ते सोनं ' याची प्रचिती जागतिकीकरणाच्या पंचवीस वर्षे नंतर लोकांना येत आहे.त्यामुळे आधुनिक गोष्टींना नकार देत लोक पुन्हा मोठ्या प्रमाणात पारंपरिक गोष्टी कडे वळताना दिसत आहे.हायब्रिड खाद्याचा त्याग करून लोकांना गावरान खाद्य लोकांना पाहिजे आहे . तसेच जंगलातून मिळणा-या काही वस्तुंना मोठ्या प्रमाणात मागणी आहे.त्यामुळे 'सीड मदर' राहीबाई पोपरे यांचा आदर्श डोळयांसमोर ठेवून आदिवासी समुदायाने आधुनिकतेचे अंधानुकरण न करता आपल्या परंपरांचे जतन करून त्यांना जगासमोर आणल्या पाहिजेत.जेणे करुन त्यांच्या रोजगाराचा प्रश्न देखील सहजरीत्या सुटू शकेल.

**आदिवासी महोत्सव व पर्यटन :**

जागतिकीकरणाच्या या काळात ब्रँडिंगला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे.त्यामुळेच जागतिकीकरणाच्या प्रभावाने 'आदिवासी पर्यटन' ही नवीन संकल्पना उदयास आली आहे. शासनाच्या आदिवासी विभागाच्या माध्यमातून व विविध आदिवासी संघटनांच्या माध्यमातून आदिवासी कला, संस्कृती ,कैशल्य , लोकजीवन या संदर्भात महोत्सवाचे आयोजन करून आदिवासी समाजाची नव्याने ओळख निर्माण केली जात आहे.आदिवासी व्यवहार मंत्रालयाच्या वतीने फेब्रुवारी २०१५ पासून प्रतिवर्षी 'वनाज' आयोजित केले जाते . महाराष्ट्रातील डहाणू येथे ' तरफ' आदिवासी महोत्सवाचे आयोजन होते . मुंबईमध्ये प्रतिवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या ' कालाघोडा' महोत्सवात आदिवासी युवा शक्ती संघटनेच्या माध्यमातून आदिवासी वस्तुंचे प्रदर्शन लावून देश विदेशातील पर्यटकांना आकर्षित केले जाते.याबरोबरच अनेक छोटे मोठे महोत्सव वप्रदर्शन सतत होत आहेत.

आदिवासी पर्यटन व महोत्सवाला राजमान्यता देऊन अधिक गतीशील करणे गरजेचे आहे.आदिवासी समुदायाचा शाश्वत विकास करावयाचा असेल तर , आधुनिकीकरण त्यांच्यावर लादण्या ऐवजी त्यांच्यां पारंपारिक गोष्टींचा आधार घेतच ते केले पाहिजे. त्याबरोबरीने आदिवासी समुदायाने देखील आपल्या परंपरांची सांगड एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आधुनिकतेशी घातली पाहिजे.व त्यातून आपला शाश्वत विकास साधला पाहिजे.



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

संदर्भ ग्रंथ सूची :

1. आगलावे प्रदीप , आदिवासी समाजाचे समाजशास्त्र , साईनाथ प्रकाशन, नागपूर
2. गुरव धनाजी , आदिवासी साहित्य ,वाङ्मय सेवा प्रकाशन
3. गावित पुष्पा , आदिवासी संस्कृती भाषा व साहित्य ,अर्थव पब्लिकेशन्स , धुळे
4. गारे गोविंद ,वारली चित्र संस्कृती , श्री विद्या प्रकाशन ,पुणे
5. गारे गोविंद , महाराष्ट्रातील आदिवासी जमाती , कॉन्टिनेन्टल प्रकाशन ,पुणे
6. जाधव सुधाकर , भारतातील आदिवासी समाज ,चिन्मय प्रकाशन , औरंगाबाद



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College ★ Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

श्ब्दाली प्रकाशन
पुणे-५८.

(Peer Reviewed Journal)

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

वर्ष : ९ वे अंक : तिसरा

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

संपादक : प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन

# डॉ. रंगनाथ पठारे साहित्य विशेषांक



वितरण क्षेत्र : दिल्ली, पश्चिम बंगाल (कलकत्ता), उत्तर प्रदेश (वाराणसी), कर्नाटक, गोवा, गुजरात (बडोदा), तेलंगणा (हैदराबाद), बंगलोर, पुणे, नगर, नाशिक, मुंबई, ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, गुहागर, यवतमाळ, कोल्हापूर, सातारा, सांगली, कराड, सोलापूर, लातूर, परभणी, जालना, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, अकोला, नांदेड, जळगाव, धुळे, नंदुरबार, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, भंडारा, वर्धा.

Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College ★
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

■ एसडीएम/पुणे/एसआर/६१/६/४/२०१३ ■ आयएसएसएन : २२३१-४३७७

शब्दाली प्रकाशन पुणे-५८.

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

■ संपादक :
प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन
(एम.ए., एम.फिल., पीएच.डी. - मराठी)

■ वर्ष : ९ वे ■ अंक : तिसरा ■ ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

■ प्रकाशक, मालक, मुद्रक :
सुनिता शैलेश त्रिभुवन (एम.ए. - मराठी)

■ पत्र व्यवहाराचा पत्ता : शब्दाली प्रकाशन
बी-५/२०६/दुसरा मजला, राहुलनिसर्ग, अतुलनगर,
वारजे-माळवाडी, पुणे - ४११ ०५८.

■ मो. : ९९२२१ ३०१५७, ७८८८२ ६२३१०

■ Email : dr.shailesh.tribhuwan@gmail.com

■ टाईपसेटिंग : गणेश ग्राफिक्स, पुणे.

■ मुद्रक : गणेश ग्राफिक्स, पुणे. मो. ९०११७७३३२२

■ मुखपृष्ठ : संपादक

■ मुद्रित शोधन : प्रा. सुरेखा पंडित, मो.९९२२२६५७३३

■ वर्गणी : वार्षिक: व्यक्ती: रु.४००/- संस्था : रु.४५०

■ पाच वर्षे : व्यक्ती: रु.२,०००/- संस्था: रु.२,२५०

■ लेख : ७०८ श्रीलिपीमध्ये व ओपन फाईलमध्ये पाठवावेत.

■ वार्षिक व पंचवार्षिक वर्गणी :
आपल्या स्थानिक बँकेत - बँक ऑफ महाराष्ट्र,
कर्वेनगर, पुणे.
(IFCS Code - MAHB 00 00 970)
'शब्दाली प्रकाशन' पुणे. (खाते क्र. : 60058138435)
या खात्यावर जमा करून सदर पावती
शब्दाली प्रकाशनाच्या पत्त्यावर पाठवावी.

■ सल्लागार मंडळ (Adviser Committee)

| | | |
|---|---|---|
| डॉ. नागनाथ कोत्तापल्ले | (पुणे) | - मो. : ८८८०५७७०८८ |
| डॉ. रावसाहेब कसबे | (नासिक) | - मो. : ९८५०५४७५७८ |
| डॉ. यशवंत मनोहर | (नागपूर) | - मो. : ८००७१५५५७७ |
| डॉ. निशिकांत मिरजकर | (पुणे) | - मो. : ९९७०१८४५६२ |
| प्रा. दत्ता भगत | (औरंगाबाद) | - मो. : ९८८१२३००८४ |
| प्रा. उत्तम कांबळे | (नासिक) | - मो. : ९८८१०९९१४३ |
| प्रा. डॉ. मनोहर जाधव | (पुणे) | - मो. : ८७९६६४३८६४ |

■ परीक्षण समिती (Review Committee)

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. संजय करंदीकर | (गुजरात) | - मो. : ९९०९११६९७८ |
| प्रा. डॉ. अनिल सपकाळ | (मुंबई) | - मो. : ८३५५९३१०९२ |
| प्रा. डॉ. सुधाकर शेलार | (अ.नगर) | - मो. : ९८९०९१३२३६ |
| प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे | (नागपूर) | - मो. : ८१४९३१२१३४ |
| प्रा. डॉ. प्रभाकर देसाई | (पुणे) | - मो. : ९८८१९०८०२० |

■ संपादक मंडळ (Editor Committe)

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. सुनिल चंदनशिवे | (कोल्हापूर) | - मो. : ९८२२२०९४८९ |
| प्रा. डॉ. सारिपुत्र तुपेरे | (सोलापूर) | - मो. : ९८२२९८४३१३ |
| प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर | (नांदेड) | - मो. : ७५८८४१२१५३ |
| प्रा. डॉ. तुषार चांदवडकर | (नासिक) | - मो. : ९४२२९४३६५२ |
| प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे | (रत्नागिरी) | - मो. : ९९२१८४६१९८ |
| प्रा. विनय मडगावकर | (गोवा) | - मो. : ८३०८४७७६६४ |
| प्रा. डॉ. संजय कांबळे | (कर्नाटक) | - मो. : ९१६४३५८४८९ |
| प्रा. डॉ. सुमेघ रणवीर | (प. बंगाल) | - मो. : ७५८५९५०३६५ |
| प्रा. डॉ. ताहिर पठाण | (उ. प्रदेश) | - मो. : ९९२२०२६६९८ |
| प्रा. डॉ. अरुण कुलकर्णी | (तेलंगणा) | - मो. : ८१२१७४७५४४ |

■ *या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी सल्लागार मंडळ, संपादकीय मंडळ, संपादक, मालक मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

■ *या त्रैमासिकात लेख, शोधनिबंध, कविता छापण्यासाठी कोणतीही रक्कम स्वीकारली जात नाही. परंतु सभासदत्व अनिवार्य आहे.*

■ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

■ या अंकातील लेख करारबद्ध असून इतरत्र पूर्व परवानगी शिवाय छापता येणार नाहीत. (संपादक)



Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601



# अं|त|रं|ग


| | | |
|---|---|---|
| * संपादकीय (मनोगत) | प्रा. डॉ. शैलेश त्रिभुवन (पुणे)............. | ०२ |
| २. आस्थेच्या प्रश्नांचा धांडोळा | प्रा. डॉ. अरुण ठोके (नाशिक)............ | ०४ |
| ३. स्त्री–पुरूष प्रतिमाभंजनाचा कॅलिडोस्कोप: हारण | प्रा. डॉ. संजय नगरकर (पुणे)............... | ०८ |
| ४. एका आरंभाचे प्रास्ताविक | प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर (अहमदनगर) ... | ११ |
| ५. दुःखाचे श्वापद – रंगनाथ पठारे एक मानसशास्त्रीय आकलन | प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे (रत्नागिरी) ... | २७ |
| ६. टोकदार सावलीचे वर्तमान : एक आकलन | प्रा. डॉ. वैशाली भालसिंग (अहमदनगर) ... | ३० |
| ७. मराठी कादंबरीच्या कक्षा विस्तारणारे चोषक फलोद्यान | प्रा. विजय चोरमारे (मुंबई) ............... | ४१ |
| ८. 'समाज संस्कृती'तील फोलपणा मांडणारा कथा लेखक रंगनाथ पठारे | प्रा. डॉ. कैलास कळकटे (शहापूर) ....... | ४३ |
| ९. 'दिवे गेलेले दिवस' समकालीन राजकीय घडामोडींचे व्यामिश्र चित्रण | प्रा. डॉ. सतीश कामत (सिंधुदुर्ग).......... | ४६ |
| १०. रंगनाथ पठारे यांच्या साहित्यातील तत्त्वविचार | प्रा. डॉ. बाळकृष्ण लळीत (पुणे) ........ | ४८ |
| ११. उदाहरणार्थ नामुष्कीचे स्वगत : पठारी शैली | प्रा. डॉ. संजय बोरुडे (अहमदनगर) ....... | ५४ |
| १२. सातपाटील कुलवृत्तांत: स्त्रीत्त्वाची महती सांगणारी पुरुषार्थाची गाथा! | प्रा. प्रतिक पुरी (पुणे) ...................... | ५९ |
| १३. भर चौकातील अरण्यरूदन | प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर (अहमदनगर) ... | ७४ |




Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601



# समाज संस्कृती'तील फोलपणा मांडणारा कथा लेखक रंगनाथ पठारे




प्रा. कैलास कळकटे
जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, खर्डी ता. शहापूर जि. ठाणे.
दूरभाष : ९९२३९९२३९०


१९८० नंतरच्या कालखंडातील अत्यंत महत्त्वाचे कथाकार म्हणून रंगनाथ पठारे यांचा उल्लेख करावा लागतो. या कालखंडातील कथेचा चेहरा मोहरा बदलविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.या कालखंडात समाज जीवनात जे परिवर्तन झाले, त्याचे प्रतिबिंब ठळकपणे त्यांच्या कथासंग्रहात दिसून येते. ' अनुभव विकणे आहेत ' ( १९८४), ' स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग ' ( १९८२), 'ईश्वर मृतात्म्यास शांती देवो ! ' (१९९६), ' गाभ्यातील प्रकाश ' (१९९८),'चित्रमय चतकोर ' ( २०००), 'तीव्रकोमल दु : खाचे प्रकरण '( २००८ ) ,'शंखातला माणूस' ( २००८ ), हे पठारे यांचे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

रंगनाथ पठारे यांनी कथालेखनातून समाज संस्कृतीतील बहुकेंद्री वास्तव मांडतात.हे वास्तव मांडत असताना माणूस त्याच्या केंद्रस्थानी आहे .पण त्या बरोबरच माणसाला नियंत्रित करणाऱ्या राजसत्तेपासून ते धर्मसत्तेपर्यंतच्या याविषयी देखील ते मांडणी करतात. मानवाला संस्कृत करण्यासाठी जी शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तिचे आजचे वास्तव रंगनाथ पठारे आपल्या कथालेखनातून मांडताना दिसतात . हे सगळे वास्तव त्यांनी उपाहासत्मक पध्दतीने मांडलेले आहे. यामुळेच त्यांच्या कथालेखनाची नाळ थेट चि.वि जोशी यांच्या पर्यंत जाते. आपल्या समग्र कथालेखनातून १९८० नंतरच्या बदलत्या जाणिवा त्यांनी मांडलेल्या आहेत. या कालखंडात भारताला स्वातंत्र्य मिळून २५ वर्ष पूर्ण झाले, देशावर आणीबाणी लादली गेली, औद्योगिकीकरण झपाट्याने होऊ लागले, विविध कारणांनी जातीय दंगली मोठ्या प्रमाणात झाल्या, १९९० नंतर ' खाउजा' धोरण स्विकारले गेले, अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाली या सगळ्या घटनांचा परिणाम मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात झाला. माणूस माणुसकी ऐवजी पैशाभोवती केंद्रीत झाला. माणसाच्या जगण्याला यंत्राचे स्वरूप प्राप्त झाले. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर पठारे यांच्या कथालेखनातून येते. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर त्यांच्या कथालेखनात येत नाही तर या जाणिवा अशा का? झाल्या याचा शोध ही निवेदकाच्या माध्यमातून ते घेण्याचा प्रयत्न करतात. तर कधी कधी प्रश्न उपस्थित करून त्या माध्यमातून या वास्तवाची उकल करताना ते दिसतात.

फक्त समाज संस्कृती चे वास्तवच ते मांडत नाही तर मानवी नातेसंबंधाचा शोध ही ते घेताना दिसतात. हा शोध घेताना ते त्याच्या तळाशी जातात. हा शोध घेत असताना अतिशय सरळ पध्दतीने अनुभव कथन करतात. सरळ असणाऱ्या या अनुभवात कुठेतरी उपरोधिक पध्दतीचे एखादे वाक्य ते वापरतात त्यामुळे मुळात अतिशय सरळ असलेला हा आशय नंतर तिरकसपणे आपल्यासमोर येतो. याचे कारणही त्यांच्या लेखन विषयक भूमिकेत सापडते कारण ते म्हणतात, माझ्या जगण्याचे वर्तमान हा मला माझ्या कुतूहलाचा कणा वाटत आलेला आहे. भूत आणि भविष्याचा जेव्हा जेव्हा मी विचार केला असेन तोही वर्तमान समजावून घेण्यासाठीच. जगण्यातल्या गुंतागुंतीचा वेध घेताना पुष्कळ ठेचा बसतात. पुष्कळ धडपडावे लागते, पुष्कळ भ्रमनिरास होतात. ते सारे लेखनात येते. आपल्या भोवतालची विराट रानटी व्यवस्था आपल्याला समजा खूप तापदायक होत असते व


" १९९० नंतर ' खाउजा' धोरण स्विकारले गेले, अस्थिर राजकीय परिस्थिती निर्माण झाली या सगळ्या घटनांचा परिणाम मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात झाला. माणूस माणुसकी ऐवजी पैशाभोवती केंद्रीत झाला. माणसाच्या जगण्याला यंत्राचे स्वरूप प्राप्त झाले. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर पठारे यांच्या कथालेखनातून येते. या बदललेल्या जीवन जाणिवांचे प्रत्यंतर त्यांच्या कथालेखनात येत नाही तर या जाणिवा अशा का? झाल्या याचा शोध ही निवेदकाच्या माध्यमातून ते घेण्याचा प्रयत्न करतात. तर कधी कधी प्रश्न उपस्थित करून त्या माध्यमातून या वास्तवाची उकल करताना ते दिसतात. "





Jeevandeep Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane, 421 601

ती बदलण्यासाठी वा तिच्यावर घाव घालण्यासाठी सरळपणे आपण काही करू शकत नाही तेव्हा एक प्रकारच्या आत्मनिंदेचा व आत्मटीकेचा स्वर लावत आपण तिरके होतो. आपली सारी प्रतिक्रियाच तिरकस होते. यामुळेच रंगनाथ पठारे यांचे एकूण लेखनच तिरकसपणातील सरळता ठरते.

सगळ्या व्यवस्थेसमोर माणूस कसा हातबल झाला आहे याचे चित्रण त्यांच्या कथालेखनातून येते. या व्यवस्थेचा बळी माणूस कसा ठरत आहे याचे चित्रण ते कथेच्या माध्यमातून करतात. शासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचार किती खालच्या पातळीला गेला आहे. याची मांडणी 'कॉ. गोपीनाथ यांच्य विषयी एक आठवण' या कथेतून त्यांनी केली आहे.तीन 'म' भोवती फिरणारी सरकारी यंत्रणेची मानसिकता व त्याच्या समोर हतबल झालेला माणूस 'देवराम खाडे' या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून ते उभा करतात.मग ही कथा फक्त देवराम खाडे व त्याच्या पत्नीची न राहता, समस्त शेतकरी वर्गाची होते. पहार हाताने वाकविणारा हा माणूस या यंत्रणेसमोर कसा हातबल झाला आहे, गरजेपोटी आपल्या बायकोला दुसऱ्याच्या स्वाधीन कसे करावे लागते व त्याच्या गरजेचा किंवा दबलेपणाचा ही सरकारी यंत्रणा कसा फायदा घेते याचे चित्रण ते करतात.कथाकाराच्या भूमिकेतून ही कथा इथेच संपते पण पठारे यांना या व्यवस्थेतील फोलपणा अधोरेखित करावयाचा आहे. म्हणून सरकारी यंत्रणेतील ज्या लोकांना या तीन 'म' जुळवून घेता आले नाही त्यांचे जीवन व जे या तीन 'म' शी जुळवून घेऊन जीवन जगले त्यांचे जीवनही ते निवेदकाच्या माध्यमातून मांडतात.

गोपीनाथ एकटा आला आणि एकटा गेला चार माणसं त्याचं नाव घेतील आणि त्याला विसरून जातील. बाकी काय?

पण शंकरने या सगळ्या परिस्थितीशी जुळवून घेतले मी मात्र पुर्ण सुरक्षित आहे. माझं सगळं ठीक झालंय पैसा आहे. घर झालंय मुलं रांगेला लागलीयेत अखेरीस आयुष्यात काय पाहिजे ?

यासारखे निवेदकाचे भाष्य त्यांच्या कथालेखनात जागोजागी सापडते. रंगनाथ पठारे यांच्या निवेदकाविषयी प्रभाकर बागले यांनी नोंदविलेले निरीक्षण अतिशय महत्त्वाचे आहे ते म्हणतात, या निवेदकाची प्रकृती समाजाभिमुख आहे. अंतर्मुख होण्याच्या प्रचंड क्षमता असूनही त्याला आधी बहिर्मुख व्हावेसे वाटते. आणि हे स्वाभाविक आहे.कारण बहिर्मुख होऊन तो जी निरिक्षणे नोंदवतो, ती त्याच्या अंतर्मुख होण्याला आशय पुरवित असतात. नुसते अंतर्मुख होणे म्हणजे स्वत:लाच कोरणे असते.हा निवेदक वास्तवाला कोरतो आणि अंतर्मुख होऊन भाष्य करताना दिसतो. तो सुशिक्षित सुसंस्कृत व प्रगल्भ असल्यामुळे त्याची संवेदनशीलता अतिशय तरल आहे या प्रमाणेच 'जनसेवक मंडळी', 'सटाणा ते सटाणा' यासारख्या काही कथांमधून त्यांनी शिक्षण क्षेत्रातील राजकारण, संस्था संचालकाचा स्वत:च्या स्वार्थासाठी या संस्थाचा कसा वापर केल्या जातो, शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून आपले नातेवाईक व कार्यकर्त्यांचे हितसंबंधाची जोपासना कशाप्रकारे केली जाते याचे चित्रण ते करतात.

रंगनाथ पठारे यांच्या सम्रग कथालेखनावर एक दृष्टीक्षेप टाकला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे समाज संस्कृतीतील प्रत्येक घटकावर ते प्रकाश टाकतात. माणसाच्या जगण्याला आलेले शुद्रपण ते त्यातून अधोरेखित करतात. ही सगळी व्यवस्था शेवटी पैशाच्या भोवती कशी केंद्रीत होते याचे चित्रणही ते करतात. पैसाजवळ आल्यानंतर सामान्य माणूसही कसा बिघडतो याचे चित्रण त्यांनी ' काही खरं नाही' या कथेतून केले आहे. जातीयता वाढविण्यासाठी श्रीमंत लोक कसे जबाबदार आहेत याचे चित्रण 'मजहबची वस्ती ' मध्ये येते.

रंगनाथ पठारे हे ज्यापध्दतीने समाज संस्कृती मधील फोलपणा मांडतात त्याचप्रमाणे मानवी जीवनात झालेले बदल व आजच्या मानवी जीवनाचे चित्रण ही ते करतात व हे करीत असताना पात्राच्या संवादातून तर कधी निवेदनातून येते . उदा एकतर हल्लीच्या काळात प्रेम वगैरे या अगदी हास्यास्पद गोष्टी झालेल्या आहेत. कोणासाठी जीव टाकणं वा कुढणं असलं काही करायला हल्ली वेळ कोणाला? आणि गरजच नाही त्याची? प्रेम कशासाठी करायचं? त्याचा अंतिम हेतू काय? तर बाई बरोबर झोपणं त्याच्यासाठी हल्ली इतक्या



Shaikshnik Sanstha's Arts, Com. & Science College
Khardi, Tal Shahapur, Dist. Thane, 421 601

कटकटी करण्याची गरज भासत नाही. माझ्यासारख्या अनेकांचा अनुभव आहे हा किंवा किती सरळसोट जमाना आहे, त्याचा सरळ फायदा घ्या ना! जुन्या कादंबऱ्या खांडेकर वगैरे यांचं हळवं ध्येयवादी प्रेम झुरणं हे आता इतिहासात गेलंय .त्याची गरज संपली प्रेमासंबंधी ज्या पध्दतीने चित्र लेखकाने उभे केले त्याचपध्दतीने लालसा, स्वार्थी, नवरा बायको यांच्यातील संबंध प्रियकर - प्रेयसी यांचे संबंध याचे वास्तवही ते मांडतात. 'शरद पवार एक खानदानी भिंत' व 'काही खरं नाही' या दोन कथांमधून त्यांनी मराठा समाजातील खानदानीपणातील फोलपणा मांडतात. मानवी जीवनाची सर्वांगीण चिकित्सा करताना पठारे यांची कथा, कथनाचे सगळे सामर्थ्य जोखते, कथन गुणांच्या बाबतीत चिरनूतन ठरते, आपल्या काळावर व हासावर उपरोध-उपहासाचे शस्त्र उगारते, संवेदनक्षम बनवते.

कथालेखनाच्या माध्यमातून ज्यापध्दतीने 'समाज संस्कृती' तील फोलपणा त्यांनी मांडला त्याचप्रमाणे कथालेखनाचे विविध प्रयोग करून त्यांनी आपले 'प्रयोगशीलतत्व' ही त्यांनी सिध्द केले. ज्या पध्दतीने त्यांनी कथालेखनासाठी विविध विषय हाताळले त्याच पध्दतीने विविध प्रयोग ही कथा लेखनात केले. ना. सी. फडके यांनी सांगितलेल्या लघुकथालेखनाच्या उलट कथा त्यांनी लिहिली. तोच प्रयोग त्यांनी' ईश्वर मृतात्म्यास शांती देवो' याकथेत ना. सी. फडके यांनी सांगितलेल्या मंत्राच्या विरोधात ही कथा त्यांनी लिहिली. 'प्रारंभ' 'मध्य' आणि 'शेवट' या शीर्षकाखालीच त्यांनी कथा लिहिली तसेच' चोखोबाच्या पाठी' या कथेमध्ये कथालेखनात चोखोबाचे अभंग घेऊन चोखोबा सोबत घेऊन पंढरपूर मध्ये चोखोबाचा फोटो घेण्यासाठी जातात व तिथे आजच्या पंढरपूरचे वास्तवदर्शी चित्र उभे करतात तसेच पददलित समाजाचे आजचे चित्र व तत्कालीन समाजाचे चित्र मांडतात हे सगळे करीत असताना चोखोबाचे अभंगमध्ये पेरतात.

ज्यापध्दतीने लेखनात विविध प्रयोग करतात त्याचप्रमाणे निवेदन पध्दतीचे विविध प्रयोग ते करतात. उदा. 'मोडलेल्या नायकाची स्वप्ने' या कथेतील निवेदक 'पूर्वी एकदा' अशी सुरूवात करून बालपणीच्या घटना सांगतो तर 'परवा एकदा' अशी सुरूवात करून वर्तमान सांगतो पूर्वी एकदा नंतर परवा एकदा नंतर पुन्हा पूर्वी एकदा पुन्हा परवा एकदा अशा पध्दतीने कथा पुढे जाते.

प्रयोगशीलतेच्या दृष्टीने 'स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग' 'तीव्र कोमल दुःखाचे प्रकरण हे दोन कथासंग्रह पाहण्यासारखे आहेत.

वरील सर्व गुण वैशिष्ट्यांमुळेच रंगनाथ पठारे यांनी मराठी कथेत आपले स्वतः चे स्थान निश्चित केले आहे.

संदर्भ सूची : १. पठारे रंगनाथ ,सत्त्याची भाषा,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, आवृत्ती दुसरी, २०१४ ,पृ.क्र १६४. २.बागले प्रभाकर, साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर ,पहिली आवृत्ती,२०१४,पृ.क्र २६६ ३.पगार एकनाथ ,संपा.कोंभालगतचा प्रवास ,लोकवाङ्.मय गृह, पहिली आवृत्ती , सप्टें २००९ , प्रस्तावना पृ.क्र ५३

शब्दाली प्रकाशन पुणे अंतर्गत प्रकाशित होणारे सक्षम समीक्षा त्रैमासिक

अशी पाठवा वर्गणी

मनी ऑर्डर / धनादेश / धनाकर्ष संपादक 'शब्दाली प्रकाशन' या नावाने किंवा मेल ट्रान्सफरने जमा करावयाची असल्याची 'बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर, पुणे' या शाखेत जमा करावी.
खाते संपादक : शब्दाली प्रकाशन, खाते क्र. : 60058138435/IFCS Code - MAHB 0000970

वार्षिक वर्गणी : ४००/- (व्यक्ती), ४५०/- (संस्था),
पंचवार्षिक : २०००/- (व्यक्ती), २२५०/- (संस्था)



Shaikshnik Sanstha's Arts, Com.& Science College
Khardi, Tal. Shahapur, Dist. Thane. 421 601
* Jeevandeep